म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध.
सं. क्र. १९८३

# नवी घडी - नवे जीवन

श्री. वा. काळे



REFBK-0017291

৬৩৫৪৯
৫।৩।৬৭
৭৫-৮৩

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रमांक 123668 विभाग निबंध
क्रमांक 9553 नोंद दि. 4/3/07

# नवी घडी – नवे जीवन

श्री. वा. काळे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 96299

REFBK-0017291

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०

किर्लोस्कर प्रेस प्रकाशन

□ मुद्रक व प्रकाशक :
मु. शं. किर्लोस्कर,
किर्लोस्कर प्रेस,
वीर सावरकर नगर,
पुणे ९.

□ पहिली आवृत्ती : जून १९६९

□ किंमत ४ रुपये

## नवी घडी-नवे जीवन


| | | |
|---|---|---|
| १. | जोडपे दिसावे लक्ष्मीनारायणासारखे ! | १ |
| २. | ह्या देणगीला अैपतीची आवश्यकता नाही ! | ४ |
| ३. | टेलिफोन आणि शेजारधर्म | ७ |
| ४. | आधी झोप अुडालेली, त्यात हा कर्कश गजर | १० |
| ५. | पर्यटनाचे पाअीक आणि नाअीक | १३ |
| ६. | बांडगुळे माजल्यावर वृक्ष वठणारच ! | १६ |
| ७. | नाव मोठे आणि लक्षण खोटे ! | १९ |
| ८. | मिळवत्या लक्ष्मीनारायणाची भागीदारी | २२ |
| ९. | सुखसाधनांचा सदुपयोग | २५ |
| १०. | पावसाची नक्षत्रे थोडीच ! | २८ |
| ११. | आधी पोटोबा, मग विठोबा ! | ३२ |
| १२. | मिळकतीला गुंतवणुकीची जोड हवी | ३५ |
| १३. | पैसे गुंतवण्याच्या प्रयोगशाळा | ३८ |
| १४. | महागाअीच्या भस्मासुराला शह ! | ४१ |
| १५. | विसाव्या शतकाच्या अुत्तरार्धातले आम्ही ! | ४४ |
| १६. | अनिष्ट हव्यासाची फॅशनेबल प्रतिष्ठा | ४७ |
| १७. | चेक लिहिताना सावध असा | ५० |
| १८. | काळचा कातडीच्या पाहुण्यांची अुपेक्षा | ५३ |
| १९. | छोट्या डायरीची मोठी किमया ! | ५६ |
| २०. | नव्या वर्षासाठी नियम : कामाचे नियोजन | ५९ |

२१. घाओ नको, पण गती हवीच ! ६२
२२. तक्रार सांगायला पुढे या ! ६५
२३. सुट्टीत शेतकऱ्यांचे पाहुणे व्हा ! ६८
२४. अंध परंपरेच्या यात्रेत सुशिक्षितही सामील ! ७१
२५. सत्यनारायण– पूजा आणि समारंभ ७४
२६. आओच्या कडेवरील मुलाची खाऊकडे झेप ! ७७
२७. विवाह-समारंभाला लग्नसराओच कशाला ? ८०
२८. सब घोडे बारा टक्के नसतात ! ८३
२९. शिकवी नातू आजोबाला ८६
३०. परीक्षांचा फास आणि काळाची पावले ८९
३१. नियमभंगाचे बाळकडू पाजू नका ! ९२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १७२९७
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

: ९ :

# जोडपे दिसावे लक्ष्मीनारायणासारखे !

सुरेखा अेका कचेरीत स्टेनो-टायपिस्ट आहे. संध्याकाळी घरी येण्यासाठी तिने नेहमीप्रमाणे बस पकडली. अुभ्याने प्रवास करावा न लागता, लागलीच बसायला मिळाल्याच्या आनंदात आज ती होती. बसमध्ये पुढच्या बाजूला तिचा पती बसलेला होता. त्याने तिला पाहताच खूण करून आपल्या जवळच्या रिकाम्या सीटवर बसायला बोलावले. त्याप्रमाणे ती लागलीच अुठून त्याच्याकडे गेली, पण पुढच्या स्टॉपवर बस थांबताच चट्कन ती खाली अुतरली आणि त्यानंतरच्या बसने घरी गेली. आधी घरी पोचलेला तिचा पती तिची वाटच पाहात दारात अुभा होता. त्याने तिला ह्या चमत्कारिक वागणुकीचा जाब विचारला. "अेकदा स्वतःला आरशात नखशिखान्त पाहिल्यावर समजेल कदाचित." असे तिने फणकाऱ्याने अुत्तर दिले.

अशी अुदाहरणे वरचेवर घडलेली आढळत नाहीत, हे खरे आहे; परंतु आपल्या पतीबरोबर वावरण्यात लाज वाटणाऱ्या, निदान धन्यता न मानणाऱ्या स्त्रिया काही कमी नाहीत. त्यांची संख्या वाढतच असणार. त्यांच्या अप्रीतीला अजून फारशी वाचा फुटलेली नाही, म्हणून त्यांची व्यथा पुरुषांच्या सहजी लक्षात येत नाही. परंतु, किरकोळ वाटणाऱ्या अशा गोष्टींतून पुढे काय निर्माण होअील ह्याचा नेम नसतो.

स्त्रियांनी आपल्या पुरुषांना सतत आकृष्ट करीत राहिले पाहिजे, ही जुनीच शिकवण अजनही चालू आहे. आपली पत्नी जेव्हाजेव्हा आपल्या दृष्टीस पडेल, तेव्हातेव्हा ती आपल्याला आकर्षक वाटावी, अशी पतीची अपेक्षा असते आणि ती पुरी पाडणे पत्नीच्या हिताचेच असते. आपला पती दुसऱ्या कुणाच्या मोहात पडू नये ह्या दृष्टीने पत्नीला स्वतःची कमनीयता राखण्याची दक्षता घ्यावी लागते.

देशकालमानाप्रमाणे, नवरा सांभाळण्यासाठी वापरावयाची मोहनास्त्रे बदलत जातील, अेवढेच ! सुंदर, लांब केस असणाऱ्या कित्येक तरुणी, पतीला आवडते म्हणून बॉब-कट करतात ते अुगीच नाही. पतीला आपले आकर्षण वाटत राहावे, म्हणूनच स्त्रिया बारीक होण्यासाठी अेवढे प्रयत्न करतात ना? पतीला अितर स्त्रियांतले कायकाय आवडते, त्याची पत्नीला चाहूल लागायला वेळ लागत नाही; चतुर असतील त्या स्वत:मध्येच बदल घडवून आणतात.

स्त्रीचे पुरुषावरील परंपरागत अवलंबन ह्या सर्वांच्या मुळाशी आहे. बेकार पतीसुद्धा आपल्या कर्तबगार, सुशिक्षित, कुटुंबाच्या पोषणकर्त्या पत्नीला दुय्यम स्थान देतो. मग अितर पुरुषांनी आपल्या गृहिणीकडे दुर्लक्ष केले, तिच्या भावनांची जपणूक केली नाही, तर नवल नाही.

आता स्त्री-पुरुषांचे अेकत्र येणे व वावरणे पुष्कळच वाढले आहे. अेकत्र वावरण्याची संधी ते बहुधा सोडीत नाहीत; आणि अशी कित्येक जोडपी सर्व ठिकाणी आढळतात. त्यामुळे, त्यांना पाहणाऱ्या अितरांच्या दृष्टीलाही महत्त्व प्राप्त होते. अशा वेळी, स्त्रियांना आपली भूमिका व्यवस्थित पार पाडायला सांगावे लागत नाही. पण पुरुष मात्र स्वत:ची नवी भूमिका कित्येक वेळी विसरतात असे म्हणावे लागते. आपला पती अितरांत अुठून दिसला नाही तरी, निदान तो अितरांपेक्षा कमी प्रतीचा दिसू नये, अशी प्रत्येक स्त्रीची अिच्छा असते. अशा पुरुषाची पत्नी म्हणून मिरविण्याचा आनंद तिला हवा असतो, पण कितीतरी स्त्रियांना हा आनंद मिळू शकत नाही.

घरी काय आणि बाहेर काय, स्त्रियांच्या राहणीपेक्षा पुरुषांची राहणी बहुधा कनिष्ठ दर्जाची असते. लक्ष्मीच्या मानाने नारायण फिक्काच पडतो, हे तिच्या-समवेत तो चारचौघांत असताना सहज लक्षात येते. त्याच्यामुळे तिला लाजल्यासारखे होते. सार्वजनिक रस्त्यावरून, वाहनातून तिच्याबरोबर जात असताना त्याने पान खाणे, सिगारेट ओढणे अित्यादी गोष्टी तिला पसंत पडत नाहीत. बाहेर निघायच्या वेळी पत्नी दोनतीन साड्या निवडून त्यांतील पतीच्या पसंतीची साडी अभिमानाने परिधान करते. पण तिने त्याला स्वत: त्याचे पकडे कपाटातून काढून घालायला दिले तरी त्यांकडे दुर्लक्ष करून तो मुद्दाम तसाच तिच्याबरोबर बाहेर पडेल. ह्या बाबतीत तक्रार करून अुपयोग होत नाही, कटुता मात्र वाढते, असा कित्येक स्त्रियांचा अनुभव असेल. पत्नीच्या कपड्यांच्या खर्चिकपणाबद्दल, लाँड्रीच्या वाढत्या बिलाबद्दल, नापसंती व्यक्त करण्यासाठी पतीचा हा आडमुठा सत्याग्रह असावा; निदान आपल्या-मुळे पत्नीला अुत्तेजन मिळू नये म्हणून दरिद्रनारायणाचे हे सोंग असावे, अशी शंका वाटते.

ते काहीही असो, स्त्रिया त्याला दाद देणाऱ्या नाहीत ! पतीला सांगूनसांगून कंटाळल्यावर त्याच आता त्याच्यासाठी परस्पर कापड खरीदून शिंप्याकडे त्याची पँट शिवायला टाकू लागल्या आहेत. आपल्या पतीच्या पँटवरून आपली सामाजिक किंमत केली जात असल्याच्या प्रत्ययाचा तो परिणाम असावा. काही नवरे ह्याचे

अितरांसमोर कौतुक करतात. पण वास्तविक ही त्यांच्या शरमेची गोष्ट असते; पत्नीने त्यामार्गे आपली अप्रीती व्यक्त केलेली असते. कित्येक स्त्रिया आपल्या पतीबरोबर बाहेर पडण्यास संकोच करतात; आपल्या मैत्रिणींना घरी आणीत नाहीत त्यामुळे पतिराज पत्नीच्या मैत्रिणींच्या परिचयाचा आणि सुखसंवादाचा आनंद गमावून बसतात. पुरुषांनी वेळीच आत्मनिरीक्षण करून, आपल्या पत्नीचा सहचर म्हणून वागण्यात सुधारणा घडवून आणली पाहिजे. तिच्या आवडी-निवडीस मान दिला पाहिजे.

घरी सत्यनारायणासारखा छोटासा समारंभ असतो; आणि त्यासाठी अुभयतांच्या मित्र-मैत्रिणींना आमंत्रण केलेले असते. त्या वेळी गृहिणीची सुंदर केशभूषा आणि वेषभूषा सर्वांना प्रसन्न करते. तिच्याकडे मित्र-मैत्रिणी डोळे भरून पाहतात. पण पतीकडे पाहणारांचे नाक-डोळे मुरडले जातात! त्याच्या त्या गबाळी पायजम्यावरील तो विनबाह्यांचा गंजिफ्रॉक नको ते दर्शन घडवीत असतो. आपल्या कचेरीतील, क्लबातील मंडळींना बोलावले नसते, तर बरे झाले असते असे तिला होअून जाते, अुत्साहावर विरजण पडते. ती खट्टू होअून जाते. बिचारीने आपल्या चेहऱ्यावरील अगतिकता कितीही लपविण्याचा प्रयत्न केला तरी ती प्रकट झाल्याशिवाय राहात नाही.

सुशिक्षित—विशेषत: मिळवत्या स्त्रीला विशिष्ट भावना असतात. त्यात सामाजिक मान्यतेची आता भर पडत आहे. त्याचाच परिणाम म्हणजे आपण संपादन करीत असलेल्या सामाजिक प्रतिष्ठेला पतीने निदान बाधक होअू नये, अशी तिची अिच्छा असते. पुरुषांनी स्त्रियांअितके सुंदर दिसण्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता नाही. तसे करणे मूर्खपणाचे ठरेल. परंतु पति-पत्नींच्या दर्शनीयत्वामध्ये सध्या दिसून येणारी वाढती तफावत कमी व्हायला हवी हे निश्चित. पुरुष काळासावळा असला तरी तो नीटनेटका का नसावा?

: २ :

# ह्या देणगीला अैपतीची आवश्यकता नाही !

पुण्यातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी अेका वृत्तपत्राने अुभारलेल्या फंडाची रक्कम त्या वेळचे महाराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांच्या स्वाधीन करण्याचा समारंभ मुंबअी येथील ताजमहाल हॉटेलात साजरा झाला "जनतेने केलेली मदत खरोखर अपूर्व अशीच आहे, पण निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी आणखी फार मोठ्या रकमेची आवश्यकता आहे," असे मुख्य मंत्री म्हणाले.

कुठलीही अडचण वा आपत्ती म्हटली, की पैशाचा प्रश्न अुपस्थित होतो. साहजिकच, ज्याच्याजवळ पैसा आहे तोच गरजवंतांच्या मदतीला धावू शकतो. मदतीच्या रकमेला महत्त्व प्राप्त होते, आणि देणगी देणाराचे जाहीर आभार मानले जातात. आपली सद्भावना आणि सामाजिक जबाबदारी ह्यांची जाणीव देणगीच्या रूपाने व्यक्त केली जाते; त्याला प्रसिद्धी मिळावी अशी देणगीदाराची अपेक्षाही असते.

दुःखाचे मूळ आर्थिक दुर्बलतेमध्ये आहे. पैसे मिळाले म्हणजे बाकी काही कमी पडत नाही अशी सर्वसाधारण समजूत आहे. पण पैशाने माणसाच्या सर्व गरजा भागू शकत नाहीत. त्याला अितरही कित्येक गरजा असतात, आणि त्या भागवायला पैशाची आवश्यकता नसते. देणग्या देणे हे मुख्यतः धनिकांचे काम असते, पण ह्या अितर गरजा भागविण्यास प्रत्येकजण समर्थ असतो, हे सहजी लक्षात येत नाही. माणसाला मानसिक गरजा असतात; आणि त्या पैशाने भागूही शकत नाहीत. मनुष्यप्राणी केवळ भाकरीवर जगला तरी त्याची बाकीची भूक त्याने भागत नाही; तो धन्यवादाचा, प्रशंसेचा, अुत्तेजनाचाही भुकेला असतो. त्याच्या प्रयत्नांबद्दल अितरांनी जाणीव दाखविली, की त्याला बरे वाटते, हुरूप येतो. त्याच्यातला चांगुलपणा टिकून राहतो, वाढीला लागतो. कौतुक करायला पैसे पडत नाहीत, तरीसुद्धा त्या बाबतीत किती चिक्कूपणा, अंगचोरपणा केला जातो !

परगावचे दोन मित्र, विद्याधर आणि विजय पुण्याला आले होते, तेव्हा ते दोघे संभाजी पार्कमध्ये फिरायला गेले. तेथे त्यांना त्यांचा अेक वर्गमित्र सदानंद भेटला. तो विद्याधरला म्हणाला, "पुराच्या वेळेला ह्या विजयच्या मदतीचा मला अतिशय अुपयोग झाला. माझा धीर पार खचला होता. पण त्याच्यामुळेच मी सावरलो. त्यानं माझी आठवण ठेवून विचारपूस केली. ती मदत मी कधीच विसरणार नाही."

हा वर्गमित्र निघून गेल्यावर विद्याधर विजयला म्हणाला, "मी फंडाला दहा रुपये पाठविले होते. त्याची पोचही छापून आली होती. माझ्या ओळखीचे कितीतरी लोक बेघर झाल्याचं मला कळलं. पण मला कुठं तुझ्यासारखी अैपत आहे?"

"मी तरी कुठं जास्त पैसे पूरग्रस्तांच्या फंडाला दिले? मी फक्त पुण्यातल्या माझ्या ओळखीच्या लोकांची विचारपूस केली, खुशालीची चौकशी केली. सदानंदानं अितर पूरग्रस्तांच्या घरांतला चिखल काढण्यासाठी मेहनत घेतली, असं मला समजलं. मी त्याला पत्र पाठवून धन्यवाद दिले. त्याच्या सेवावृत्तीची प्रशंसा केली. स्वतःच्या प्रकृतीकडे लक्ष देण्याचं महत्त्व सांगितलं. कितीतरी बायाबापड्यांनी त्याला दुवा दिला असेल, शुभाशीर्वाद दिले असतील. त्यांच्या तोंडावरचं समाधानाचं तेजच किती आनंददायक आहे, तू पाहिलंस ना?" विजयनं आपल्या 'देणगी' चा खुलासा केला. विद्याधरच्या दहा रुपयांच्या देणगीचा निश्चित अुपयोग झाला असेल; पण विजयची देणगी किती प्रभावी ठरली! चेकपेक्षा पत्र अधिक कामगिरी करू शकले!

मनुष्य कार्य करीत राहायला पैशाप्रमाणेच किंवा त्याहीपेक्षा कौतुकाची, प्रोत्साहनाची, दुसऱ्यांच्या जाणिवेची अधिक आवश्यकता असते. आपण जे काही करतो, ते अितरांनी निदान पाहावे आणि बरे म्हणावे, अशी त्याची अपेक्षा असते. परिस्थितीमुळे, अडचणीमुळे, अितरांच्या विरोधामुळे, औदासीन्यामुळे मनुष्याचा विरस होतो. अशा वेळी त्याला अेखाद्या सुंदर पत्राचे टॉनिक मिळाले, की त्याच्यात पुन्हा अुत्साह संचारू लागतो.

पत्रच कशाला पाहिजे? अितका औपचारिकपणा कशाला हवा? समक्ष भेट झाल्यावर सांगून नाही का चालणार? टेलिफोन करायला काय हरकत आहे? पत्र लिहिण्यापेक्षा हे बाकीचे मार्ग सोपे आहेत. पत्र लिहिण्याची 'मेहनत' बहुधा कुणी घेत नाही, म्हणूनच पत्र पाठवायचे! पत्रातला मजकूर पुनःपुन्हा वाचला जातो; ते पत्र अितरांना दाखविले जाअून त्याचा आनंद वृद्धिंगत होतो. तोंडभर केलेल्या अभिनंदनापेक्षा लेखी अभिनंदनाची चव न्यारीच. कितीतरी वेळ ती टिकून राहते. लेखी शब्दाची जादू काही वेगळीच असते. प्रीतीच्या माणसाने आपली पाठ थोपटल्यामुळे होणाऱ्या रोमहर्षणाशीच त्याची तुलना होअू शकेल.

डॉ. विमलाबाअी आपला परदेशचा दौरा आटोपून विमानाने स्वदेशी परत आल्या, तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी ठिकठिकाणची मंडळी वेळ आणि भाडे खर्चून सांताक्रूझ विमानतळावर हारतुरे घेअून अुपस्थित होती. विमलाबाअी विमानातून

अुतरताच त्यांच्या हातात त्यांच्या अेका मैत्रिणीची तार देण्यात आली. 'सुस्वागतम्'च्या ह्या तारेची डॉ. विमलाबाअींना अजूनही आठवण आहे. त्या तारेचा अुल्लेख करायची अेकही संधी त्या दवडीत नाहीत. विमानतळावर जे प्रत्यक्ष गेले होते, त्यांच्यापेक्षा स्वागताचा हा लेखी पुरावा त्यांना अधिक महत्त्वाचा वाटतो. अशी आहे लेखी शब्दाची किमया ! जाणते लोक अुगीच नाही संदेश पाठवायची आठवण ठेवत !

सर्वसाधारण माणसांची प्रवृत्ती चांगले म्हणण्यापेक्षा नावे ठेवण्याची असते. अेकाने अेक चूक काढली, तर दुसरा दुसरी चूक शोधून काढतो; चांगली गोष्ट माहीत असली तरी ती न सांगता अनिष्ट गोष्टींची वाच्यता करणेच लोकांना आवडते. गुणांपेक्षा दुसऱ्याचे अुणे काढलेले अैकायलाच श्रोते जास्त मिळतात, म्हणून तर चांगली गोष्ट आवर्जून सांगणारांची अतिशय आवश्यकता आहे. अेखाद्याविषयी आपला अनुभव चांगला असला, तर त्याविषयी मौन राखणे हा सामाजिक गुन्हा आहे; त्यामुळे अनिष्ट गोष्टींनाच प्राधान्य मिळून कित्येकांचे नुकसान होअू शकते.

अेका बस-कंडक्टरने अेका म्हातारीचा खिसेकापूपासून बचाव केला,हे बसमधील अेका अुतारूने पाहिले. त्याने कंडक्टरचा नंबर टिपून घेअून हे सत्कृत्य मॅनेजरला पत्र लिहून कळविले. "बस-कंडक्टर कितीही चांगले वागले, तरी त्याबद्दल कुणी सहसा कळवीत नाही, म्हणून आपणास विशेष धन्यवाद !" असे मॅनेजरने आपल्या आभाराच्या अुत्तरात लिहिले. अुतारूच्या पत्राच्या त्याने छापील प्रती करून घेतल्या. आणि डेपोत ठळक ठिकाणी लावल्या. त्या कंडक्टरला बक्षीस देअून त्याचा गौरवही करण्यात आला. त्यामुळे त्याच्या अंगावर किती मास चढले असेल, आणि अितरांनाही किती प्रेरणा मिळाली असेल ह्याची सहज कल्पना येअील.

तक्रार करायची संधी सोडायची नाही; पण धन्यवाद मात्र कधीच द्यायचे नाहीत, ह्या वृत्तीमुळे सत्प्रवृत्त मनुष्यही कंटाळतो. आपल्याला जर अेखादा चांगला अनुभव आला, तर गप्प न बसता त्याला प्रसिद्धी द्यायला हवी; त्यामुळे दुसऱ्या अेखाद्याला बरे वाटते. अितकेच नव्हे, तर त्याचा सामाजिक परिणामही अतिशय चांगला होतो. आपल्या कामाचे कौतुक करणारे आहेत, हे समजले तर कामात लक्ष लागते, अुमेद वाढते, अुत्साह टिकून राहतो आणि सामाजिक सुखात भर पडते. तक्रारी किती सहजतेने केल्या जातात, पण धन्यवादाचे शब्द किती मुष्किलीने तोंडाबाहेर पडतात ! अशा परिस्थितीत पत्र लिहून आपली भावना व्यक्त करणारे विरळाच ! म्हणून, रास्त कौतुक आणि प्रशंसा अव्यक्त न ठेवता ती लिहून कळविण्याचा प्रत्येकाने आपल्या मनाशी निश्चय केलेला बरा.

पत्र लिहायला फार वेळ लागत नाही; खर्चही फार येत नाही. पण त्यामुळे केवढी तरी मोठी सामाजिक कामगिरी घडून येते ! हाताशी थोडी कार्डेपाकिटे ठेवण्याचा हा साधा प्रश्न आहे. आनंदनिर्मितीला किती थोडी किंमत पडते ! आजूबाजूचे जीवन सुखाने समृद्ध झाले म्हणजे आपलाही आनंद दुणावतो. दहा पैशांच्या कार्डावरील पाच ओळींनी केवढा मोठा चमत्कार घडून येअू शकतो ह्याची प्रचीती आली की त्याची गोडी लागलीच म्हणून समजावे !

: ३ :

# टेलिफोन आणि शेजारधर्म

"आमचा आता फोन आला आहे तेव्हा तुम्ही त्याचा जरूर तेव्हा, केव्हाही येअून अुपयोग करायला हरकत नाही. चांगली सोय असताना, संकोच बाळगून विनाकरण स्वत:ची गैरसोय करून घेअू नका—" असे रामभाअूंनी आपल्या शेजाऱ्यांना मोठ्या आपुलकीने सांगितले. पण थोड्याच दिवसांनी त्यांच्यावर पस्तावण्याची पाळी आली. अितकेच नव्हे, तर वाअीटपणाच त्यांच्या पदरात पडला !

स्थानिक टेलिफोन कॉल्सचे पैसे स्वीकारावयाचे नाहीत, असे रामभाअूंनी ठरविले होते. विनाकारण आणि तेही फुकट फोन करायला फार कुणी येणार नाही, ज्यांना खरोखरच तातडीची गरज आहे तेवढेच येतील, अशी त्यांची कल्पना.

पण रामभाअूंचा अंदाज सपशेल चुकला. शेजारीपाजारी वेळी-अवेळी फोन करायला येअू लागले, वाटेल तितका वेळ फोनवर बोलत बसू लागले, टेबलावरची मासिके अुचलून नेअू लागले, "मुख्य पिक्चर किती वाजता सुरू होणार?" "काल मी वेणी आणली होती, त्याचे फुलवाल्याचे पैसे द्यायचे राहिले आहेत ते ऑफिसातून येताना द्या." "माझी मोलकरीण अजून आली नाही, तुमची आली का?" अशा प्रकारच्या विचारणा आणि बोलणी करणारांची रामभाअूंच्याकडे ये-जा वाढू लागली. काहीजण तर रामभाअूंच्या घरची चहाची वेळ साधूनच टेलिफोन करायला येत !

हे सर्व लोक दुसरीकडून पैसे देअून असले फोन पूर्वी खासच करीत नव्हते. त्यांनी आता आपल्या मित्रमैत्रिणींना आणि नातेवाअिकांना रामभाअूंचा फोननंबर देअून ठेवला. त्यामुळे ह्या शेजाऱ्यांसाठी फोनवरती निरोप येअू लागले, ते ज्याचे त्याला पोचवणे टाळता येअीना. तो अेक अुद्योगच होअून बसला. अखेर रामभाअूंनी आपल्या टेलिफोनपाशी अेक पेटी ठेवून तिच्यावर पाटी लावली, "प्रत्येक कॉलचे

२५ पैसे आत टाकावे." त्यामुळे टेलिफोन करायला येणारांची संख्या कमी झाली. पण काही शेजारी मुद्दामच नोट घेअून यायचे आणि 'मोड आहे ना?' म्हणून विचारायचे. पेटीत खोटी नाणी आढळू लागली. कांहीजण कुणाचे लक्ष नाही अशा वेळी गुपचूप फोन करून निघून जात. ट्रंककॉलला रात्री कमी पैसे पडतात, त्यासाठी रात्री-बेरात्री शेजारी येअून थांबू लागले. "बिल आल्यावर लागलीच कळवा बरं का" असे बजावून जाअू लागले. अखेर पिसाळून जाअून, रामभाअूंनी टेलिफोन करण्याची सर्वांनाच बंदी करून टाकली. त्यामुळे अडीअडचणीच्या वेळीही शेजाऱ्यांना टेलिफोनचा अुपयोग करणे कठीण होअून गेले, आणि बिचारे सत्प्रवृत्त रामभाअू अप्रिय होअून बसले.

टेलिफोन डिरेक्टरीत टेलिफोनच्या यंत्राचा वापर कसा करावा ह्यासंबंधी तपशीलवार सूचना छापलेल्या असतात. पाहिजे असलेला नंबर कसा जोडावा, कसे सुस्पष्ट बोलले असताना अैकणाराला चांगले अैकू येते, टेलिफोनच्या नंबरांचा अुच्चार कसा करावा अित्यादींविषयी माहिती त्यात आढळते. टेलिफोनचे यंत्र नाजुक असते, त्याची रचना गुंतागुंतीची असते, तेव्हा त्याचा अुपयोग काळजीपूर्वक केला तरच ते चांगले काम देते, हेही समजावून सांगितलेले असते. पण त्याबरोबरच दुसऱ्याच्या घरचा टेलिफोन वापरायचा असल्यास काय काय दक्षता घ्यावी, टेलिफोनच्या मालकाची तब्येत कशी सांभाळावी ह्याची आचारसंहिता डिरेक्टरीत दिलेली नसते. ज्याचे त्यानेच ते शिकावे लागते. शेजाऱ्यांपासून आपल्या टेलिफोनचे संरक्षण कसे करावे, हे तरी डिरेक्टरीत कुठे सांगितलेले असते?

वाड्यात, चाळीत, गल्लीत, वसाहतीत, फक्त अेखाददुसऱ्याच्या घरीच टेलिफोन असला, म्हणजे जे घडते तीच गोष्ट मोटारगाडी, रेफ्रिजरेटर, रेडिओ अित्यादींच्या बाबतीत कमीअधिक प्रमाणात आढळते. अेखाद्याने हौसेने काही गुलाब लावले, तर त्याची फुले त्याला कधी पाहायलाही मिळत नाहीत. ते गुलाब अुपटून टाकावेत असे मग त्याला वाटू लागते. अेखाद्याकडे चांगली पुस्तके, मासिके असली म्हणजे तोही असाच वैतागून जातो.

समृद्धतेबरोबर गरजांत विविधता येअून त्या वाढत जातात; आणि मग मोर नाचतो म्हणून लांडोरही नाचते. ह्या गरजा भागविणारी साधने आणि अुपकरणे बाजारात विपुल असतात. पण कुठलाही मनुष्य त्यातील घेअूनघेअून किती घेणार? ह्याला स्वाभाविकच मर्यादा पडते. मग त्याच्या सामाजिक वर्तुळात देवाणघेवाण चालते. ते अेकमेकांची सोय बरोबरीच्या नात्याने करू शकतात. अुदाहरणार्थ, अेखादा स्वतः बिअर किंवा व्हिस्कीच घरी ठेवीत असला आणि त्याच्याकडे शौकीन पाहुणे आले, तर त्यांतील स्त्रियांसाठी तो आपल्या वर्तुळातील दोस्ताकडून जिन आणि पोर्टवाअिन सहज आणू शकतो. कारण ह्या दोस्तालाही अशाच अुसनवारीची अधून-मधून गरज भासतच असते. ज्याच्याजवळ दुसऱ्याला देण्याजोगे काहीतरी असते त्यालाच हवे असेल ते सुलभतेने मिळवता येते. त्यांच्यातही शेजारधर्माचे प्रश्न निर्माण

होतात, पण त्यांचे स्वरूप वैयक्तिक स्वरूपाचे असते– स्नेह, लोभ, वैर ह्यावर ते अवलंबून असते. काही संपन्न लोक आणि बहुसंख्य गरजवंत ह्यांच्या शेजारधर्माचा प्रश्न त्यापेक्षा कितीतरी मूलभूत असतो. त्यांच्यातील आर्थिक व सामाजिक पातळीमधील फरक त्याला कारणीभूत होतो. आर्थिक विषमता जोपर्यंत अमलात आहे तोपर्यंत त्यातूनच मार्ग काढायला हवा.

समृद्ध देशातील सामान्य माणसाचाही राहणीचा दर्जा चांगला असतो. जवळजवळ प्रत्येकालाच स्वतःच्या किमान गरजा भागविता येतात, काही किमान सुखसोयी अुपभोगता येतात. त्यांपैकी काहींच्या जवळील साधने अितरांपेक्षा अधिक चांगले काम देणारी असतील, अेवढेच. अुदाहरणार्थ, काहींची मोटार अेअरकंडिशण्ड असेल, तर काहीना पाच वर्षांपूर्वीच्याच मॉडेलवर भागवावे लागत असेल. प्रत्येकानेच अेकतरी दैनिक घेतल्यावर शेजाऱ्याच्या दरवाज्याजवळ पहाटे येअून पडलेली वृत्तपत्रे परस्पर लांबविण्याचे कारणच राहात नाही.

भारतातील परिस्थिती अगदी वेगळी आहे. आपल्या लोकांच्या गरजा आणि अपेक्षा द्रुतगतीने वाढत आहेत. नव्यानव्या साधनांचा व जिनसांचा अुपयोग-अुपभोग हवा, पण ती स्वतः विकत घेणे मात्र बहुसंख्य लोकांना परवडत नाही. काही थोडे अैपतवान लोक आणि बहुसंख्य गरजू लोक यांची सरमिसळ झाली म्हणजे अैपतवाल्यांवर बाकीचे झडप घालू पाहतात. त्यांच्या सोयी-गैरसोयींचा विचार न करता, त्यांच्याजवळील सर्व गोष्टींचा विनासायास हक्काने फायदा अुपटू लागतात. कित्येक सधन लोक आपल्याजवळील सामग्रीचा गरजूंना रास्त वापर करू देण्यास तयार –नव्हे, अुत्सुक असतात; पण त्याचा गैरफायदा घेणारे फार लोक निघाले म्हणजे हा चांगुलपणा टिकत नाही, आणि ते समाजहितास बाधक ठरते. आपल्या संपन्नतेचा वाजवी प्रमाणात अितरांना लाभ देण्यास बहुतेकांना आवडते, पण अितरांना तो लाभ गोडी राखून मिळवता आला पाहिजे. जगात कोणतीच गोष्ट फुकट मिळत नाही. तेव्हा दुसऱ्याचा थोडा फायदा हवा असेल, तर त्याला जाणतेपणाने भलाअी तरी द्यायला हवी. हा साधा व्यवहार आहे.

रामभाअूंनी आपला टेलिफोन वापरण्यास सर्वांना बंदी केली, तरी विजयला ती बंदी लागू नव्हती, कारण तो व्यवहारचतुर होता. अगदी जरुरीच्या वेळीच फोन करणे, रामभाअूंच्या कौटुंबिक दिनचर्येत कुठलाही व्यत्यय येणार नाही अशाच वेळी फोन करावयास जाणे, टेलिफोनवर कमीत कमी वेळ बोलणे, अगदी हळूहळू आवाजात बोलणे, प्रत्येक वेळी 'मी टेलिफोन करू का ?' असे विचारूनच टेलिफोनला हात लावणे, परतताना न चुकता आभार मानणे, हे सर्व जर विजय करू शकतो तर अितरांनाही ते का साधू नये ? विजयसारख्या जाणत्यांची संख्या मोठी झाली, म्हणजे रामभाअूंच्या सारखेही वाढतील आणि भिन्न पातळीच्या लोकांच्या शेजारधर्माला अिष्ट असे वळण लागेल.

: ४ :

# आधी झोप उडालेली, त्यात हा कर्कश गजर!

विजयादशमी हा रामभाऊंचा वाढदिवस. त्यानिमित्त त्यांनी आपल्या काही मित्रांना घरी भोजनास बोलाविले होते. जेवणाचा बेत अगदी फक्कड होता. श्रीखंड स्वादिष्ट होते आणि भजीही मस्त झाली होती. पाहुण्यांनी स्वयंपाकाची खूप स्तुती केली, तशी रामभाऊ म्हणाले, "तुम्हांला मी बोलावलं त्याच दिवशी मेनू ठरविला. पण गेल्या चारपाच दिवसांत श्रीखंडाचा भाव किलोमागे अेका रुपयानं वाढला. तेलसुद्धा महाग झालं. तरी म्हटलं, भजीच होअूद्यात. तुमच्या निमित्तानं मलाही मिळतील. कारण मला ती फार आवडतात. घ्या ना, आणखी वांग्याची भाजी. वाटेल तेवढी घ्या. बाबूरावांनी धाडली आहेत त्यांच्या बागेतली वांगी, तेव्हा संकोच करायचं कारण नाही."

पाहुण्यांनी विषय बदलण्याचा प्रयत्न केला, तरी रामभाअूंचे चऱ्हाट संपेना. आपण काय नामी विनोद करीत आहो, अशी त्यांची कल्पना. पण बिचाऱ्या मित्रांना अगदीच शरमल्यासारखे झाले.

महागाअीची झळ कोणाला लागलेली नाही? प्रत्येकजणच आपला खर्च आटोक्यात ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे; प्रत्येकालाच ते अशक्य होत आहे. अशाही परिस्थितीत काही ठिकाणी खर्च करणे भागच असते; काही हौस करावीच लागते. प्रत्येकच गोष्ट महागाअीमुळे आपण आखडती घेअू लागलो, तर महागाअीला तोंड देण्यास आवश्यक तो अुत्साह आणि त्राण अुरणारच नाही. महागाअीच्या ओझ्याखाली आपण पार गाडले जाअू. महागाअी सुसह्य करण्यासाठी काही बाबतीत हात थोडा सैल करणे श्रेयस्करच असते. पण अशा वेळीही महागाअीची आठवण अेकसारखी देत राहून, भरपूर खर्च करूनही त्याचे चीज पदरी न पाडणारे रामभाअूंच्या-

सारखे कित्येक महाभाग असतात. त्यामुळे जीवनाची अुरलीसुरली गोडीही नष्ट होअून जाते.

आपल्याप्रमाणे अितरांनाही महागाअीला आपल्यापेक्षाही कठीण रीतीने तोंड द्यावे लागत आहे, हे पुष्कळ वेळा विसरले जाते; आणि त्यामुळे माणुसकीही नष्ट होअून जाते. मोलकरणीला भांडी घासण्याबद्दल दरमहा सहा रुपये ठरले; आणि अेखाद्या दिवशी आजारपणामुळे ती येअू शकली नाही, तर खाडा धरून तिचे २० पैसे कापल्यामुळे तिचे जेवढे नुकसान होते, त्यामानाने मालकिणीचा फायदा होत नाही. मोलकरणीला महिना किती थोडी प्राप्ती होत असते ह्याचा विचार करणारीचे मन २० पैसे कापायला तयारच होणार नाही. वास्तविक मोलकरीण लवकर बरी झाल्याबद्दल आनंद व्यक्त करून मालकिणीने तिला थोडा गरम चहा देणे, हेच श्रेयस्कर. ज्यांना आपल्या मोलकरणीसाठी अेवढेही करता येत नाही त्यांनी आपली भांडी स्वतःच घासलेली बरी. फासे अुलटे पडले असते, तर काय घडले असते ह्याचा विचार मोलकरणीच्या मनात येतो,तसा मालकिणीच्याही मनात आला तर किती बरे होअील !

जुन्या काळच्या स्वस्ताअीचा जाता-येता अुल्लेख करण्याची कित्येकांना खोडच असते. "आमच्या लहानपणी रुपयाला चार शेर दूध मिळत असे; रुपयाला अेक शेर लोणी मिळायचं; सव्वा रुपयाला पाच शेर साखर मिळायची. अेका पैशाच्या कोथिंबिरीत सगळ्यांची भाजी व्हायची. तुमच्या नशिबातच नाही हे सगळं खायला मिळायचं. सिनेमे बघून का कुठं पोट भरणार आहे ?"– असे वयस्क लोक नव्या पिढीला अुद्देशून अैटीत बोलत असतात.

पण सध्याच्या महागाअीला तरुण पिढी थोडीच जबाबदार आहे? "तुम्ही आम्हांला अेवढ्या मोठ्या संख्येनं जन्म दिला, हे आमचं दुर्भाग्य." असे तरुण पिढीने अुत्तर दिले तर ? नवी पिढी नव्या वातावरणातच वाढत आहे; तेव्हा तिला जुन्या गोष्टी सांगण्यात काय बडेजाव आहे ?

अेखादा मनुष्य विशेष आजारी असला, तरी आपण त्याबद्दल बोलण्याचे टाळतो, अनुकूल गोष्टींवरच भर देतो. वातावरण अुदास होअू नये ह्याची दक्षता घेतो. डॉक्टरांच्या फीचा आणि औषधांच्या किमतीचा पेशंटला पत्ताही लागू देत नाही. महागाअीच्या बाबतीतही असेच वागायला हवे. तिच्या गंभीरपणावर अेकसारखा भर दिल्याने काहीही फायदा होत नाही; अुलट तात्कालिक विरंगुळाही नाहीसा होतो. महागाअीमुळे झोप अुडालेल्यांच्या कानाशी आणखी कर्कश गजर कशाला ? त्यांची गरज आहे थोडा डोळा लागण्याची.

दिवाळीच्या सणाच्या वेळी थोडा जास्त खर्च होणारच. जाता-येता त्याची चर्चा केल्याने तो कमी होणार नाही, मिळणारा आनंद मात्र नष्ट होअील, हे लक्षात ठेवण्याचे तारतम्य आवश्यक आहे. भावाने नेहमीपेक्षा कमी ओवाळणी घातली, तरी बहिणीने त्याला त्याची जाणीव न देणे योग्य. बहिणीने नेहमीसारखे गोड पक्वान्न केले नाही, म्हणून भावाने नाराजी दाखवून तिच्या दुःखात भर घालणे अनिष्ट.

जी काटकसर करावयाची, ती प्रथम मुख्यतः स्वतःच्या बाबतीत केलेली बरी. पण अितरांच्या बाबतीत ती करावी लागली, तर त्यामुळे त्यांच्या भावना दुखावणार नाहीत ह्याची दक्षता घेणे अगत्याचे आहे. महागाअी जेवढी अधिक तेवढी गोड शब्दांची, हसतमुखाची, तारतम्याची, संयमाची आवश्यकताही अधिक. आगत-स्वागतामधील खाद्य-पदार्थांची अुणीव आस्थेने आणि आपुलकीने भरून काढावयाची. जरा अधिक वाकायचे, जरा अधिक कष्ट करावयाचे, मानसोपचाराने आर्थिक यातनांची तीव्रता कमी करावयाची.

महागाअीचा प्रश्न सोडविणे फार कठीण आहे. त्याला व्यापक, सर्वंकष अुपायांची आवश्यकता आहे. जिनसांचा तुटवडा, लोकसंख्येची वाढ हे प्रश्न सोड-विण्याला आपल्या अेकमेकातील बडबडीने काहीही अुपयोग होणार नाही; त्यामुळे सर्वांचा मानसिक ताण मात्र अधिक तीव्र होतो. अगोदरच भेसळ होत चाललेल्या सामाजिक आणि कौटुंबिक जीवनाच्या दुधात हा मिठाचा खडा कशाला? महा-गाअीची जाणीव प्रत्येकाला आहे; मग त्याच्या तीव्रतेत कर्णकटू शब्दांची भर कशाला?

महागाअीच्या निष्फळ चर्चेत सर्वांचे अेकमत होते तेच अुपयुक्त कार्यासाठी घडवून आणता आले तर? पुढील पिढीच्या हितासाठी, प्रत्यक्ष कृतीसाठी, लोक अेकत्र येतील तर? वाचाक्षमतेच्या तोडीची कार्यक्षमता असेल तर? लक्ष्मीच्या पूजकांनी प्रथम आपले संघटित प्रयत्न रुजू करून नंतरच तिचा आशीर्वाद मागावा, स्वतःपुरते आयते मागणारांवर आधुनिक लोकशाहीतील लक्ष्मी प्रसन्न होणार नाही; ती प्रसन्न झाली तरी तिची प्रसन्नता टिकणार नाही, असेच तिची बहीण सरस्वती सर्वांना सांगत आहे.

☘ ☘

: ६ :

# पर्यटनाचे पाअिक आणि नाअिक

पावसाळा संपून थंडीला सुरवात झाली म्हणजे सहलीपर्यटनांचा मोसम येतो. कुठे जायचे, कुणाकुणाला बरोबर घ्यायचे, खर्चाची व्यवस्था कशी करायची, कार्यक्रम कसा आखायचा वगैरे गोष्टींची चर्चा चालू होते. प्राणिशास्त्र. कीटकशास्त्र, वनस्पतिशास्त्र, भूगर्भशास्त्र, स्थापत्यशास्त्र अित्यादींच्या अभ्यासाला मदत व्हावी ह्या दृष्टीने शाळा-कॉलेजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहलींची आखणी केली जाते. युद्धशास्त्र, अितिहास ह्यांच्या अभ्यासाला किल्ले पालथे घालणे फायद्याचे ठरते. प्रवासाचा अनुभव मिळावा, स्वावलंबनाची सवय लागावी, वेगवेगळ्या प्रदेशांचा आणि लोकांचा प्रत्यक्ष परिचय व्हावा अित्यादी हेतू सर्वच सहलींच्या मुळाशी अर्थातच असतात.

अशा सहली नित्याच्या अभ्यासक्रमाचा भागच झालेल्या आहेत. हायकिंग, सायकलीवरून किंवा स्कूटरवरून लांबचे प्रवास, डोंगरांचे कडे चढण्यासाठी गिरि-कंदरांतून भ्रमंती अित्यादी छंदांची लोकप्रियता वाढत आहे. अधिकाधिक तरुणतरुणी रोमांचकारक साहसांचा अनुभव घेत आहेत. शाळा-कॉलेजातील विद्यार्थ्यांचा शैक्ष-णिक विहार आणि शिस्तबद्ध, साहसी मुशाफरी ह्यांत बराच फरक आहे. तेवीस तरुण आणि अेक तरुणी अशा चोवीसजणांच्या तुकडीने दहा दिवसांची दहा किल्ल्यांची यात्रा केली, तिचे नेते श्री. गो. नी. दांडेकर ह्यांनी निवेदन केलेल्या वृत्तान्तावरून तो फरक सहज ध्यानात येअील.

साधी सहल असो, प्रवास असो, पर्यटन असो, शिकार असो किंवा गिर्यारोहण असो, त्यासाठी जाणाऱ्या तुकडीतील सर्व घटकांच्या गुणांवरच अुपक्रमाचे खरे यश अवलंबून राहणार, हे अुघड आहे. ह्या अुपक्रमात साहसाचा भाग जितका जास्त,

तितकी अेकजुटीची आवश्यकताही जास्त. अशा तुकडीचा नेता नेतृत्व करण्यास विशेष पात्र असावा लागतो; अेखाद्या कमिटीच्या अध्यक्षाप्रमाणे वागणारा असून चालत नाही. खुद्द नेत्याला अितरांमध्ये आत्मविश्वास निर्माण करता आला नाही, त्यांचा आत्मविश्वास टिकवता आला नाही, तोच अितरांचा विश्वास आणि आदर गमावून बसला, त्याला प्रसंगावधान आणि तारतम्य नसेल, तर त्याच्या नेतृत्वाखालील अुपक्रम यशस्वी होणे कठीण आहे.

१९५३ साली अेव्हरेस्टचे शिखर काबीज करण्यासाठी निघालेल्या तुकडीतील अेडमंड हिलरी आणि तेनसिंग नोर्के ह्यांनी ते शिखर प्रत्यक्ष गाठले, ते दोघे अजरामर झाले. शेवटची काही फुटांची अवघड चढण चढून जाण्यास त्या वेळी तेच अितर सर्वांपेक्षा युक्त वाटल्यामुळे त्यांचीच निवड तुकडीचे नेते जॉन हंट ह्यांनी केली. हंट स्वत: जाअू शकले असते, पण तो मोह त्यांनी टाळला. म्हणूनच त्यांची थोरवी अधिकच खुलून दिसली. स्वत: अेव्हरेस्टविजेते होण्याअैवजी ती संधी त्यांनी हिलरी आणि तेनसिंग ह्यांना दिली; आणि नेतृत्वाचा अेक आदर्श हिमालयाच्या शिखरावरून सर्व जगाला दाखविला.

सर्वच क्षेत्रांतील सच्चे नेते ह्याच पद्धतीने वागतात. त्यांनी तसे वागावयास हवे. धोका पत्करायला,–प्राण द्यायला अितरांना लावून, श्रेय घेण्याच्या वेळी मात्र आपण पुढे जाणारे खरे नेतेच नव्हेत. क्रिकेटच्या सामन्यात बॅटिंगचा अनुक्रम बदलून अितरांचा बळी द्यावयाचा, आणि सामना जिंकणारा टोला मारून स्वत: नाबाद राहण्यास मिळावे म्हणून आपण खाली राहावयाचे. अशा प्रकारचा स्वार्थी कप्तान निघाला, तर तो क्रिकेटच्या खेळाचे नुकसानच करील.

गिर्यारोहणास निघणाऱ्या तुकडीतील गिर्यारोहक कसे असावेत, ह्याचे सर जॉन हंट ह्यांनी नुकतेच केलेले विवेचन व्यापक क्षेत्रांतही मार्गदर्शक आहे. स्वत: शिखर काबीज करण्याची अीर्ष्या प्रत्येकात असायला हवी; त्याला आवश्यक तो कणखरपणा आणि जिद्द त्याच्यात असायला पाहिजे. त्याचबरोबर, प्रत्यक्ष शिखरावर जाण्याची संधी अेखाददुसऱ्यालाच मिळू शकेल, आपल्याला ती मिळणारही नाही ह्याची प्रत्येकाने खूणगाठ बांधलेली असायला हवी. नियोजित शिखरावर जाण्यासाठी कुणाची निवड करायची, अशासारख्या अत्यंत महत्त्वाच्याच नव्हे, तर अितर सर्वच लहानमोठ्या बाबतींतही नेत्याचा निर्णय अंतिम समजला पाहिजे. तो चर्चेचा विषय बनता कामा नये, सामुदायिक हिताशी आणि अुद्दिष्टाशी अेकनिष्ठ होणे अगत्याचे असते. तुकडीतील अेखाद्याने जरी कच खाल्ली तरी त्याचे दुष्परिणाम अितरांवर होतात. त्याचप्रमाणे शिखर चढून जाण्यासाठी प्रत्येकजण हट्ट धरून बसला तरीही विचका होतो. निघण्यापूर्वीच मुख्य मानकरी ठरवून टाकले, तर बाकीच्यांचे सहकार्य मिळविणे आणि टिकविणे अशक्य होअून बसते.

कुठल्याही कॉलेजात किंवा समाजात अेखादे नाटक करायचे योजिले, तर दिग्दर्शक नेमला जातो. नाटकात काम करू अिच्छिणारांना आपली नावे बिनशर्त

द्यावी लागतात. नाटक यशस्वी होण्याच्या दृष्टीने दिग्दर्शक पात्रांची निवड करतो. कधीकधी कॉलेजक्वीनला नाटकात मोलकरणीचे काम दिले जाते, महिला मंडळाच्या अध्यक्षीणबाओंच्या मुलीला किंवा सुनेला दुय्यम काम पत्करावे लागते. कोण कोणत्य कामास लायक आहे, हे दिग्दर्शकाने ठरवावयाचे असते. कारण, त्याला ती दृष्टी असते "झाले तर हिरॉअिनच होअीन, नाहीतर अितर पात्रेही फोडीन" अशा वृत्तीच्या हौशी लोकांना वाव दिला, तर नाटकाचा निकाल लागणार, हे ठरलेलेच असते.

अुपक्रम कोणताही असो, सर्वांचे अेकमेकांशी नाते अखेरपर्यंत खेळीमेळीचे सहकार्याचे टिकून राहायला हवे. सहल, सफर, नाटक संपल्यावरही ते नाते तसे राहिले तरच त्याचे साफल्य. अेखादी गोष्ट पार पाडणे हे तात्कालिक अुद्दिष्ट असते; त्यातून सर्वांना नव्यानव्या गुणांचे वळण लागते किंवा नाही, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. शिक्षणाच्या पदव्या, सामाजिक किंवा आर्थिक पातळी, कौटुंबिक वारसा अित्यादींना नसते महत्त्व दिले जाते, ते अगदी चुकीचे आहे. सर्वांचे अुद्दिष्ट समान असले, वृत्ती पोषक असली, तर बाकीच्या गोष्टींना काहीच स्थान अुरत नाही. सर जॉन हंट आणि शेरपा तेनसिंग ह्यांची मैत्री जमणे, गट्टी होणे, ह्यातच गिर्यारोहणाचे सार आहे. भारताच्या नागरिकात अेकजूट निर्माण होअून ते पराक्रमशील होण्यास अशा प्रकारची पर्यटने निश्चितच साहाय्यकारक होतील.

: ६ :

## बांडगुळे माजल्यावर वृक्ष वठणारच !

काही सुशिक्षित स्त्रियांचा पत्ते खेळण्याचा अेक क्लब आहे. त्याचा महिन्यातून अेकदा सामुदायिक भोजनाचा कार्यक्रम असतो. आधी ठरवून घेतलेले पदार्थ प्रत्येकीने करून आणावयाचे आणि कुणाच्यातरी घरी सर्वांनी जमून त्यांचा आस्वाद घ्यावयाचा, त्यानंतर थोडे पत्ते खेळून आणि चहा पिअून घरी परतावयाचे. आपल्या स्वतःच्या घरी क्लबाची बैठक बोलविण्यापेक्षा अितरजणींच्या कडेच जाण्यास कित्येक सभासद अुत्सुक असतात. आणि कमीत कमी कष्टात होणारे जिन्नस करायला घेण्यासाठी त्यांची धडपड चालते. त्यामुळे काही ठराविक सभासदांकडेच जास्त बैठकी होतात आणि काही ठराविक भगिनींच्याच वाटयाला नेहमी कष्ट अधिक येतात.

फ्रुट सॅलड खायला सर्वांना हवे, पण ते करून आणण्यास कोणीच अुत्सुक नसते. पुऱ्या तळून आणायलाही बहुतेकींची तयारी नसते. दहा-बारा सभासदांपैकी अेखादीतरी पूर्वसूचना न देता गैरहजर राहते, आणि तिच्या वाटयाचा जिन्नस भोजनातून वगळला जाअून जेवणाचा विरस होतो. आपण जाअू शकलो नाही, तर निदान आपण पत्करलेला जिन्नस तरी करून वेळेवर पाठवावा, हा साधा शिष्टाचारही पाळला जात नाही. घरच्या पाहुणीला आयत्या वेळी अशा भोजनास नेण्यास मात्र काही सभासदांना मुळीच संकोच वाटत नाही !

कुठल्याही क्लबात, मंडळात, समाजात जा, अशी स्वार्थी व बेजबाबदारीची वृत्ती थोडयाफार प्रमाणात आढळते. वाटेल तर नि वाटेल तेव्हा जावे, वाटेल तेव्हा अुठून यावे, अितरांच्या सोयीकडे दुर्लक्ष करावे, असाच प्रकार चालतो. अेकमेकांच्या सहकार्यामुळे सामुदायिक कार्यक्रम यशस्वी होअू शकतात, हे कुणीच लक्षात घेत नाही. अेखाद्या मंडळाने व्याख्यानमाला योजिली, तर तिच्या यशस्वितेसाठी आपण

शक्य तेवढ्या व्याख्यानांना गेलेच पाहिजे, असे सभासद मानीत नाहीत. नट-नटींच्या व्याख्यानांना गर्दी अुसळते,पण जिव्हाळ्याच्या चर्चांना फारच थोडी अुपस्थिती असते त्यामुळे चालकांची परिस्थिती अतिशय बिकट होअून बसते. क्लबच्या सामन्यांत भाग घेणारे अितरांचा खेळ पाहण्यास किंवा पंच म्हणून काम करण्यास तयार नसताता. वक्षीससमारंभाला विजयी खेळाडूंखेरीज फारसे कुणी थांबतच नाहीत !

"संस्था अुत्तम रीतीने चालविण्याची जबाबदारी चालकांचीच आहे आमची नाही," अशी बहुसंख्य सभासदांची विचारसरणी असते. त्यामुळे निष्ठावंत कार्यकर्ताही लवकरच कंटाळून जातो. त्याची जागा घेण्यास कुणीच पुढे येत नाही. बहुतेकांना काम नको असते; फक्त फायदा आणि अुपभोग हवा असतो. साहजिकच. जुन्या नामवंत संस्थाही निष्क्रिय बनत चालल्या आहेत; आणि संधिसाधू त्यांचा गैरफायदा घेत आहेत. व्यवस्थापक मंडळाचे सदस्यही जर फोटोपुरतेच तोंड दाखवू लागले, तर सामान्य सभासदांनी तरी लक्ष का घालावे ? अशा परिस्थितीत, सामाजिक संस्थांत आणि जीवनात काहीच राम अुरत नाही.

भोजनानंतर आचवल्यावर आपल्या मागील माणसाच्या हातात पाणी भरून तांब्या देण्याची, त्याचप्रमाणे बंबातील कढत पाणी घेतल्यावर बंबात भर घालण्याची जुनी पद्धत आहे, ती अत्यंत अर्थपूर्ण आहे. आधीच्या पिढीचा वारसा निदान चालू ठेवला पाहिजे. कुटुंबधारणेस आणि समाजधारणेस ते अत्यावश्यक आहे. म्हणून तर नवी झाडे लावावयाची, नवी धरणे अुभारावयाची, नवी घरे बांधावयाची, नव्या पिढीला अुत्कृष्ट शिक्षण द्यावयाचे. समाज हा व्यक्तींचाच बनलेला असतो. समाजाची समृद्धी व्यक्तींच्या कर्तव्यतत्परतेवरच अवलंबून राहते, आणि मग त्या समृद्धीचा फायदा पुढील सर्व व्यक्तींना मिळत जातो. ह्याचा अर्थ, स्वतःची सामाजिक कर्तव्ये टाळू पाहणारे लोक समाजाचे म्हणजे अखेर स्वतःचे व स्वकीयांचे नुकसान करीत असतात.आपण समाजाला जेवढे देअू त्यापेक्षा जास्त मिळविणे नीतीलाही धरून नाही.

अितरांनी कष्ट आणि त्याग करून अुपलब्ध केलेल्या गोष्टींचा मनमुराद फायदा घ्यावयाचा, पण त्याची समाजाला परतफेड करावयाची नाही, ह्या वृत्तीची जोपासना विरक्तीच्या आणि परमार्थाच्या आवरणाखाली केली गेली, प्रतिष्ठा पावली; त्याची कटू फळे आपण आज भोगत आहो. सामाजिक हिताच्याद्वारा वैयक्तिक हितसंवर्धन साधण्याच्या शिकवणीस आता प्राधान्य दिले पाहिजे.करचुकवे धनपती, कामचुकार कामगार, धडधाकट भिक्षेकरी ह्यांच्यापेक्षा समाजावर चरणारांची जात वेगळी नाही. पण असे अप्पलपोटेच साव पुढारी बनल्यावर समाजाचे काय होणार हे स्पष्टच आहे.

बँकेच्या ऋणकोंनी आपले ऋण फेडून वरती आणखी भरपूर व्याज दिले तरच तिची गंगाजळी समृद्ध होते; आणि अडचणीत सापडलेल्यांना ती हात देअू शकते. ह्याअुलट, बँकेकडून पैसे काढणारेच माजले; आणि त्यांनी परतफेड केली नाही, तर बँकेचे दिवाळे वाजल्याविना राहात नाही; आणि मग त्यात बँकेचे ठेवीदार धनकोही

नुकसान पावतात. समाजाचेही असेच आहे. त्याचे घटक प्रामाणिकपणे ऋण स्मरणारे व फेडणारे असतील, तरच तो समृद्ध होऊन सर्वांची पातळी वाढविण्यास समर्थ होतो. आपल्या विविध सामाजिक संस्थांच्या द्वारा ही शिकवण प्रसृत व्हायला हवी.

अशा अेका संस्थेच्या अध्यक्षाने सभासदांना अुद्देशून अेक पत्रक काढले.ते सर्वांना मार्गदर्शक होणारे आहे म्हणून त्याचा सारांश येथे देत आहे –

"गेल्या शनिवारी अुपस्थितांची संख्या फारच निराशाजनक होती. क्लबाच्या कार्यक्रमाबाबत आपले काहीच कर्तव्य नाही; ते ठरविणे आणि पार पाडणे हे फक्त सेक्रेटरीचेच काम आहे, असे तुम्हास वाटते की काय? का त्या आधीचे कार्यक्रम तुम्हाला पसंत पडले नाहीत, म्हणून ह्या शनिवारीही आला नाहीत?

"आवश्यकता, अिष्टता आणि अुपलब्धता ह्यांच्या तडजोडीतूनच कार्यक्रमांची निर्मिती होत असते,आणि ते सादर केले जातात. त्यात अुत्साहाने भाग घेअून आपणच रस निर्माण करावयाचा आहे.

"आम्ही, म्हणजे कार्यकारी मंडळातील लोकांनी तुमचे विनोदन करावयाचे असते, अशी कल्पना करून घेअू नका! आमची तुमच्याकडून फार माफक अपेक्षा आहे. कोणताही पूर्वग्रह न बाळगता तुम्ही शरीराने आणि मनानेही अुपस्थित राहात जा,आणि कार्यक्रमात आपुलकीने भाग घेत जा. कार्यक्रमातील कुठलीही बाब तुम्हाला पसंत पडली नाही, तर कृपा करून पुढे येअून तसे सांगा, सूचना करा. तुम्हाला वाटत असलेले दोष सुधारण्याचा तुम्हीही स्वतः प्रयत्न करा.

"आपल्या क्लबाचे वार्षिक संमेलन जवळ आले आहे. त्या वेळी करावयाच्या नाटकाच्या तालमी सध्या चालू आहेत. त्यांच्या दिग्दर्शनासाठी आपले केशवराव मुद्दाम वेळ काढून आपुलकीने येत असतात. ते अत्यंत वक्तशीर आहेत, पण नाटकातील पात्रे क्वचितच वेळेवर हजर असतात. आज अेक गैरहजर, तर अुद्या दुसरा गैरहजर! अशा परिस्थितीत नाटक यशस्वी कसे होणार;आणि केशवरावांना त्यांच्या परिश्रमांचे फळ काय मिळणार?

"केवळ प्रेक्षकाची, अलिप्ततेची आणि तुच्छतेची भूमिका सोडून द्या. सहभागी होण्याच्या हेतूने येत जा. प्रत्येक कार्यक्रम, प्रत्येक संध्याकाळ जास्तीत जास्त चांगल्या रीतीने पार पाडण्यासाठी आपणही काही हालचाल करायला हवी, हे लक्षात बाळगा."

☘ ☘

: ७ :

## नाव मोठे आणि लक्षण खोटे !

दिल्ली येथे आंतर-विद्यापीठ युवक महोत्सव साजरा झाला. त्यात भारता-तील २२ विद्यापीठांच्या सुमारे ७०० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. त्या प्रसंगी अेक परिसंवाद झाला. त्याचा विषय, 'भारतीय संस्कृतीचे प्रतीक काय असावे ?' असा होता. परिसंवादात भाग घेणाऱ्या बहुतेकांना भारतीय संस्कृतीची व्याख्या करता आली नाही, मग तिचे प्रतीक सांगणे दूरच राहिले !

धर्म, जात, भाषा, अितिहास अित्यादींच्या वैचित्र्यातून आणि विविधतेतूनही भारतीय संस्कृतीचे अुत्कृष्ट दर्शन घडते, असे आवर्जून सांगण्यात येते; परंतु त्या संस्कृतीचे निश्चित स्वरूप मात्र सांगता येत नाही. शब्दांच्या अवडंबराचा आश्रय घ्यावा लागतो, अशी विद्वानांचीही परिस्थिती आहे.

भारतीय ह्या नावाबद्दल आणि भारताच्या प्राचीनत्वाबद्दल आपल्याला अभिमान वाटत असला तरी त्यात अस्पष्टता फार आहे. वस्त्रप्रावरण, बोलणेचालणे-वागणे, विचारसरणी, धार्मिक व सामाजिक परंपरा, चालत आलेले संस्कार ह्यांच्याद्वारे संस्कृती व्यक्त होत असते. ह्या सर्व बाबतींत जुन्या-नव्याची सरमिसळ होत चालली असून त्यात चांगले, जुने नावापुरतेच शिल्लक आहे; चांगले, नवे रक्तात भिनून गेलेले नाही.

पाश्चिमात्य पाहुणे येथे आले, म्हणजे ते प्रथम आपल्या भारतीयांच्या वैशिष्टयांची रीतिरिवाजांची, श्रद्धास्थानांची आस्थेने चौकशी करतात. हेतू हा, की त्यांचा अनादर होअू नये ; परंतु त्यांना काय आढळते ? येथे कुणालाच कशाचीच पर्वा-फिकीर नाही. कशाचेही, कोणतेही बंधन नसणे, ही आपली संस्कृती बनू पाहात आहे.

मंदिरात जावे, तर तेथे काही लोक आरामात झोपलेले असतात, चकाट्या पिटीत असतात किंवा पत्ते खेळत असतात. पोरे घंटा वडवीत सुटतात. घरात देव असले तरी त्यांना जागा जिन्याखालील कोनाड्यात, पायताणांच्या शेजारी! देव 'घासायला' कुणीच तयार नसते. विवाहसमारंभाच्या ठिकाणी कुलोपाध्यायांच्याच कुचेष्टा चालू असतात. त्यालाच अलबतेगलबते हुकूम सोडीत असतात, फ्रॉक घातलेल्या तरुणी बोहल्यावर चढून मंगलाष्टके म्हणत असतात ; आणि रुजाम्यावरून बूटवाले हिंडत असतात. मग डिनर अँड डान्सच्या वेळी आवश्यक पोषाख 'राष्ट्रीय' 'लाअुंज' किंवा 'ओीव्हिनिंग' सांगितला असला तरी 'राष्ट्रीय' पोषाख तेथे गौणच समजला जाणे आश्चर्यकारक नाही.

अस्वच्छता, अनियमितपणा, गोंधळ, गलबलाट, अनौचित्य, अनास्था अित्यादींचा सर्वत्र अंमल चालतो. स्वातंत्र्य प्राप्त झाल्यापासून भारतीय संस्कृतीची अिकडे अवहेलना चालू असताना वीट येअीपर्यंत तिची प्रशस्ती मात्र चालू आहे. परंतु त्याला साजेशी आपली स्वत:ची वागणूक आहे का, ह्याचा कोणीच विचार करीत नाही. भारतीय संस्कृतीचा आपणच अुदोअुदो करणे ही आत्मगौरवाची प्रथाच पडून गेली आहे. आपल्या संस्कृतीचा अशा रीतीने डांगोरा पिटला जात असताना, ती झपाट्याने नष्ट होअू पाहात आहे. नव्या,पाश्चिमात्य आकर्षक गोष्टींचा अवलंब करताना तारतम्य बाळगले जात नाही. आपले ते सर्व वाअीट; पाश्चिमात्य ते सर्व चांगले, असे म्हणण्याची फॅशनच बनली आहे. भारतीय संस्कृतीला नावे ठेवणारे,पाश्चिमात्य संस्कृती आत्मसात करते तर गोष्ट वेगळी! संस्कृतीचा जीवनाशी जिव्हाळ्याचा संबंध असतो; आणि त्या दोघांची फारकत झाली, तर प्रगतीला संस्कृतीचा आधार नाहीसा होतो. ह्यासाठी संस्कृतीचे संरक्षण नव्हे, संवर्धन करायला हवे. संस्कृती म्हणजे काही पुराणवस्तूंचा केवळ जतन करून ठेवण्याचा अजबखाना नव्हे.

स्वातंत्र्य आणि लोकशाही ह्याचा अर्थ– कुणालाच, कुणाहीबद्दल आणि कशाहीबद्दल आदर नसणे, असा होता कामा नये. अुदाहरणार्थ, वडीलधाऱ्या माणसांशी लहानांनी चारचौघांच्या देखत अुर्मटपणा करणे कोणत्याच संस्कृतीला शोभत नाही. वक्तशीरपणा किंवा शब्द पाळणे हे पाश्चिमात्यांचे गुण न शिकता अितरांची खुशाल गैरसोय करणे कित्येकांच्या अंगवळणी पडले आहे. मंत्री, कुलगुरू अशा स्थानांवरची मंडळीसुद्धा तासतास अुशीर करून समारंभांना येतात ; आणि त्याबद्दल दिलगिरीचा अेक शब्दही न अुच्चारता श्रोत्यांना अुपदेशाचे डोस पाजायला प्रारंभ करतात. पोषाखातील अव्यवस्थितपणा आणि अनौचित्य तर विचारायलाच नको. स्त्रीपुरुषांच्या मिश्र समाजात पुरुषांचा ओंगळपणा स्त्रियांना विशेषच जाणवतो.

आपले अेक नवे वैशिष्ट्य सांगावयाचे राहिलेच; ते म्हणजे भिक्षा मागण्याचे! भारत सरकारपासून ते थेट अगदी सामान्य माणसापर्यंत, सारा कारभार प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष भिक्षेवर चालू आहे. त्यात काही गैर वाटत नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. काहीही कमी पडले तर अुत्पादन करून ते मिळविण्याअैवजी भीक मागून

मिळविणे सोपेच नव्हे, तर प्रतिष्ठेचे झाले आहे. साहजिकच, स्वाभिमानाने स्वयंपूर्ण होण्याचा प्रयत्न करणाऱ्यापेक्षा भिक्षेकरी गलेलठ्ठ आणि मस्त बनले आहेत. 'आज अुधार, अुद्या रोख' ही आमची राष्ट्रीय संस्कृती बनली आहे. भिक्षेची झोळी हीच आमची निशाणी ठरू पाहात आहे.

आवडीनुसार केस बॉब केलेली आधुनिक शेतकऱ्याची मुलगी कुलाचारी, तर डोक्यावरचा पदर ढळू न देणारी शहाण्णव कुळीतील अेखादी मुलगी कुलकलंकही असू शकते. संस्कृती कधीकधी परस्परविरोधी रूपे धारण करू लागते ; आणि पाश्चिमात्य यजमानांना खूष करण्यासाठी सोंगे घेअू लागते. आपल्या मुलींना पाश्चिमात्यांच्या पुढे भारतीय नृत्ये करायला लावणारांना भारतीय संस्कृतीचा अभिमान असतोच का ?

अेका लेखकाने म्हटले आहे, "अुथळपणाला आता अूत आला असून तत्त्व विसरले जात आहे. पाश्चिमात्यांच्या पुढे आम्ही अुगीचच विदूषकी करीत आहो. सरकारची टूरिस्ट खातीही हत्तीवरून फेरफटका, वाघाची शिकार, बैलांची झुंज ह्यांवर लक्ष केंद्रित करू लागली आहेत. त्यांना दाखविण्याजोगे खरेखुरे दुसरे काही आम्हांजवळ नाहीच की काय ?

मातृप्रेम, पितृप्रेम, अेकपत्नीव्रत, बंधुभगिनीप्रेम, नातेवाअीकांविषयी आस्था, पाहुणचार, स्वाभिमान, गुरुभक्ती, अित्यादी भारतीय संस्कृतीच्या कल्पना सनातन सामाजिक हिताच्या आहेत. त्यांची अुजळणी करायला हवी. आपल्या संस्कृतीच्या पुरातन भक्कम पायावर औद्योगिक आणि आर्थिक अुत्क्रांतीला अनुकूल अशी टिकाअू अिमारत बांधणे श्रेयस्कर. भारतातील सर्वांना ती प्रातिनिधिक वाटली पाहिजे ; तिच्याविषयी अभिमान वाटायला हवा. अशी सांगड कौशल्याने घालायला हवी. त्यासाठी दूरदृष्टीच्या, चतुरस्र योजकांची आवश्यकता आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६२९

: ८ :

# मिळवत्या लक्ष्मी-नारायणाची भागीदारी

ज्या कुटुंबात पती आणि पत्नी दोघेही नोकरी करून पैसे कमवितात अशा कुटुंबांची संख्या आता झपाट्याने वाढत आहे. पत्नी मिळवती असणे ही शहरातून नित्याची बाब झाली आहे. ह्याचा अर्थ, अर्थोत्पादनाची जबाबदारी अेकट्या पुरुषावरच अुरलेली नाही. 'वधू पाहिजे' जाहिरातीतून 'ती नोकरी करणारी असावी' अशी अपेक्षाही नि:संकोचपणे प्रकट केली जाते.

जेथे पती हाच अेकटा मिळविता असतो, तेथे आर्थिक सूत्रधार तोच असणे सहज पटण्यासारखे आहे. पत्नीला त्या संसारात त्याच्या संमतीनेच खर्चाची आखणी करावी लागते. पण जेव्हा पत्नीही मिळवती असते, तेव्हा कोणता खर्च कुणाच्या प्राप्तीमधून व्हावयाचा, जी शिल्लक पडेल ती कुणाच्या खात्यात ठेवावयाची, असे मतभेदच नव्हेत तर मानापमानाचे, कुरबुरीचे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असते.

पूर्वीच्या काळी स्वयंपाकघरातील वापराच्या भांड्याकुंड्यांवर गृहिणीला आपले नाव कोरायला मिळाले, तरी ती संतुष्ट असायची. नंतरच्या काळात, पत्नीला पती घरखर्चासाठी दरमहा ठराविक रक्कम देअू लागले. पत्नीने त्यात भागवावे आणि आपल्या हाती आर्थिक सत्ता असल्याचा आभास अुपभोगावा. पतीच्याप्रमाणेच नोकरी करणाऱ्या गृहिणीची गोष्ट वेगळी आहे. ती आता पुरुषापेक्षा प्रसंगी जास्त कष्ट करून त्याच्या बरोबरीने पैसे घरात आणीत आहे. कौटुंबिक गरजांची, अुत्पन्न-खर्चाची येण्या-देण्याची तिला पूर्ण कल्पना असते; ती त्याबाबत जबाबदारी पत्करीत असते. भवितव्याबद्दल तीच अधिक जागरूक असते.

जेव्हा पतीच्या मिळकतीमधून कुटुंबाचा सर्व खर्च भागतो, आणि पत्नीची मिळकत नाममात्रच असते, तेव्हा तिचे कौतुक केले जाते. "तुझ्या अुत्पन्नाचा तू स्वतंत्र हिशेब ठेव आणि त्यातून हवा तो जिन्नस घे." असे पती तिला सांगतो.

दोघेही मिळवते आहेत ह्यावरच संसाराला प्रारंभ झालेला असेल, पत्नीची मिळकत चालू कौटुंबिक खर्चालाच आवश्यक असेल, तर मात्र गोष्ट वेगळी. रेशनपकी गहू पतीच्या पैशाचे आणि तांदूळ पत्नीच्या पैशाचे, दोन खोल्यांपैकी अेका खोलीचे भाडे पतीच्या पगारातून तर दुसऱ्या खोलीचे पत्नीच्या अुत्पन्नातून, असा हिशेब करणे हास्यास्पद होअील. आपली जिंदगी, मेहनत, चातुर्य काही अुद्योगात अेकत्र करून त्यापासून होणारा नफा वाटून घेण्यासाठी भागीदारीचा करार केला जातो; नफ्याप्रमाणे कर्जालाही सर्व भागीदार जबाबदार असतात. तोच नियम पति-पत्नीच्या कौटुंबिक भागीदारीस आता लागू पडत आहे.

विजय आणि प्रतिभा ही दोघेही नोकरी करून आपला संसार अुत्तम रीतीने चालवितात. त्यांचे बँकेत जोडनावाने खाते आहे; सेफ डिपॉझिट लॉकरही दोघांच्या नावाने असून त्याची किल्ली पत्नीजवळच असते. त्यांनी मोटर घेण्याचे ठरविले, तेव्हा प्रश्न आला, की कुणाच्या नावावर घ्यावयाची ? ती काही जोडनावाने घेता यत नाही. मित्रमंडळींनी पत्नीला भरीस घातले आणि तिला पण वाटू लागले की मोटर आपल्या नावावर असावी. पतीला ह्या गोष्टीस विरोध करता येअीना आणि आता मोटरची तीच मालकीण आहे.

"मी जर नोकरी केली नसती, तर अेवढी शिल्लक पडलीच नसती. ह्यांच्या पगारातून अेवढी बचत थोडीच होअू शकली असती ! कौटुंबिक गरजा भागविण्याची जबाबदारी पुरुषाचीच आहे; तेव्हा ही मोटर माझ्यामुळेच शक्य झाली." अशी तिची विचारसरणी झाली.

पतीला हे सर्व पटलेले असले, तरी तो ते वारंवार बोलून दाखवीत नव्हता; "मी नोकरी केली नाही आणि तुमचा भार हलका केला नाही, तर माझ्या शिक्षणाचा काय अुपयोग ?" असे पत्नीने म्हणावे, ही त्याची अपेक्षा. शेवटी होते काय, तर पती आपल्या पत्नीच्या मोटारीत बसण्यासही सहसा तयार नसतो; चालविण्यास तर नाहीच नाही.

जी सालस स्त्री अेरव्ही अेवढी समजूतदार होती तीच आता कान फुंकल्यामुळे किती तारतम्यशून्य बनली ! मिळवत्या स्त्रीने चारचौघांच्या देखत स्वतःच्या द्रव्या-र्जनाची शेखी मिरवून पतीचा पाणअुतारा होण्याची पाळी येअू देअू नये, अशीच प्रत्येक पतीची स्वाभाविक अिच्छा असते. ती पुरी झाली नाही म्हणजे कौतुक संपून असूयेला प्रारंभ होतो. स्वतःच्या पत्नीचे स्वतः कौतुक करणे वेगळे आणि अितरांनी तिला हरबऱ्याच्या झाडावर चढवून बिथरविणे वेगळे.

प्राथमिक अवस्थेत पती हा पत्नीचा मालकच असतो. तिच्या मिळकतीवर तो हक्क सांगतो आणि बजावतो. त्यातच आपले हित आहे असे पत्नीला वाटते. अेकंदर परिस्थितीच तशी असते. सुशिक्षितांत अेवढा रानटीपणा दिसून येत नाही. मिळवत्या पत्नीला वरकरणी तरी बरेच स्वातंत्र्य असते; त्याचा फायदा न घेण्याचे तिला अुपजतच शहाणपण असते; त्यामुळे परीक्षेचा प्रसंग टळतो. पतीची मूळ वृत्ती

अद्याप आमूलाग्र पालटली आहे, असे म्हणता येणार नाही; त्यामानाने पत्नीची जागरूकता मात्र वाढली आहे. पतीच्या गुलामगिरीतून सुटका झाल्याचा आनंद होतो, पण त्याचा गैरफायदा सुसंस्कृत पत्नी घेऊ अिच्छीतच नाही. पतीलाच ती नेहमी मोठेपणा देते. परंपराच तशी आहे मुळी– पतीच्या अपेक्षेची आणि पत्नीच्या अपेक्षापूर्तीची. आपण पत्नीला जरूर महत्त्व देऊ; पण तिने ते प्रकटपणे स्वत: होऊन घेता कामा नये, अितरांत आपण कमी दर्जाचे दिसता कामा नये, असेच पतीला वाटत असते. पत्नीही हे सर्व ओळखून असते.

वास्तविक पतीचा दृष्टिकोन बदलायला हवा. हळूहळू तो बदलत जाअीलही. व्यावसायिक भागीदारीत सर्व भागीदारांना समान हक्क असले, तरी तीमध्ये अेक कुणीतरी श्रेष्ठ असावाच लागतो. तीच गोष्ट कौटुंबिक भागीदारीस लागू आहे. भागीदारीतील थोरल्याअैवजी धाकट्यालाच बाकीचे लोक जास्त मान देऊ लागले, तर त्याला बरे वाटते. पण त्यामुळे त्याच्या वृत्तीत फरक पडला तर भागीदारी टिकण कठीण होते. हा नित्याचा अनुभव कौटुंबिक जीवनातही न आला तरच नवल.

कष्ट, मेहनत, स्वैपाकपाणी, अपत्य-संगोपन, काटकसर, बचत ह्या सर्वांमुळे गृहिणी कौटुंबिक यशास हातभार लावीत असते; पण त्याची जाहिरात होत नाही. नोकरी करणाऱ्या पत्नीने बाहेरून घरात आणलेल्या चलनी नोटा कितीतरी बोलक्या ठरतात! पतीच्या भागीदारीस मोजमाप प्राप्त होते.अशा परिस्थितीत, पति-पत्नीने तुझे-माझे न करता आर्थिक दृष्ट्या अेकरूप होणेच अगत्याचे असते.दोघांची मिळकत, खर्च, शिल्लक– सर्व काही समाअीक मानण्यात आली पाहिजे. पती बेकार असला आणि पत्नीच मिळवती असली, तिच्या पगारामुळेच रेशन घरात येत असले, तरी सुद्धा रेशन कार्डावर पतीचेच नाव कुटुंबप्रमुख म्हणून लिहिले जाते, ह्याचा बोध विसरून कसे चालेल?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 43688 वि. निबंध
क्रमांक 9583 नों. दि. 5/3/07

: ९ :

# सुखसाधनांचा सदुपयोग

माझ्या ओळखीच्या, शिकवण्या करणाऱ्या अेका शिक्षकाने स्वत:साठी स्कूटरेट विकत घेतली आहे. सकाळ-संध्याकाळ शिकवणीसाठी त्यांना कित्येक घरी जावे लागते. सायकलवरून किंवा बसने जाण्या-येण्यातच बराच वेळ वाया जातो, श्रमही होतात. तेव्हा आपण स्कूटरेट घेतली तर वेळ वाचून त्या वेळात आणखी तीन शिकवण्या सहज करता येतील असे त्यांच्या मनाने घेतले. श्रम वाचल्यामुळे ह्या जादा शिकवण्यांचा ताणही जाणवणार नाही, असाही त्यांनी विचार केला. मनातली ही कल्पना त्यांनी हिशेब करून प्रत्यक्षात अुतरविली आहे. आता ते ४८ सी. सी. च्या स्वत:च्या स्कूटरेटवरून शिकवण्यांना जातात.

पेट्रोल, तेल, कर, विमाहप्ता, दुरुस्ती, व्याज अित्यादी सर्व खर्च भागवून त्यांना आता पूर्वीपेक्षा कितीतरी जास्त प्राप्ती होअू लागली आहे. आपल्या बिऱ्हाडापासून दूरच्या बंगल्यातूनही ते आता शिकवणीस सहज जाअू शकतात. त्यामुळे लांब राहणाऱ्यांच्या मुलांची सोय झाली. शिकवणीचा दरही वाढला.,आणि स्कूटरेटमुळे त्यांची प्रतिष्ठाही वाढली.

सहामाही परीक्षेनंतर शिकवण्यांचा खरा मोसम सुरू होतो. म्हणून, प्रारंभी ते पहिल्या सहामाहीत स्कूटरेट बंद ठेवीत असत. त्याप्रमाणे आर. टी. ओ. ला कळवून करही वाचवीत असत. पण लांब अंतरावरच्या बंगल्यातील शिकवण्या वर्षभर चालू असल्यामुळे त्यांची स्कूटरेटही आता वर्षभर चालू राहते. साहजिकच त्यांची प्रकृतीही सुधारली आहे. वाढलेल्या प्राप्तीमुळे घरातही बरेच नवे जिन्नस आले आहेत. नव्या अुपकरणांमुळे गृहिणीचेही श्रम कमी झाले आहेत. तेव्हा गृहसौख्य न वाढले तरच नवल ! लवकरच स्कूटरेटची जागा स्कूटर घेअील आणि मग हे पति-पत्नी सुट्टीच्या दिवशी फिरायला, सहलीला मोठ्या डौलात जाअू लागतील.

पूर्वी परदेशी जाणारे लोक आगबोटीने प्रवास करीत. तेव्हा विमाने नव्हतीच. विमानांची वाहतूक सुरू झाल्यानंतर त्याचे भाडे बरेच जास्त असूनही विमानानेच जाणे आता पसंत केले जाते. विमानाच्या सुमारे ५० पट वेळ आगबोटीच्या प्रवासाला लागतो. आणि हा वेळ वाचविणे कित्येकांना महत्त्वाचे असते; त्यासाठी जादा खर्च करणे त्यांना परवडते. अंतर्गत प्रवासालाही शक्य तेथे व शक्य त्या वेळी अुद्योगी लोक आगगाडीअैवजी विमानच पसंत करतात. परगावाहून मुंबअीला कामासाठी जाणारा मनुष्य तेथे टॅक्सीतूनच ठिकठिकाणी जातो; बसच्या क्यूमध्ये अुभा राहात नाही. मुंबअीला अेक दिवस लॉजिंगमध्ये राहण्यापेक्षा टॅक्सीचे भाडे स्वस्त पडते. वेळ वाचतो तो वेगळाच. काही अुद्योगपतींची स्वतःची विमाने आहेत. ती चालविणाऱ्या वैमानिकाला दीड-दोन हजार रुपये पगार असतो. स्वतःचे विमान असले म्हणजे तो सरकारी आगगाडीच्या किंवा अेअर लाअिन्स कॉर्पोरेशनच्या विमानाच्या वेळापत्रकाने बांधला जात नाही; कमीत कमी वेळात जास्तीत जास्त ठिकाणची कामे स्वतःच्या तंत्राने, कार्यक्षमतेने अुरकू शकतो.

अुद्योगपतींच्या बाबतीत प्रत्येक मिनिट विशेष आर्थिक महत्त्वाचे असते, आणि त्यांची शारीरिक तंदुरुस्तीही व्यापक, आर्थिक मोलाची असते. त्यांच्या स्वास्थ्यावर आणि निर्णयक्षमतेवर लक्षावधी, कोटयवधी रुपयांच्या मालाचे अुत्पादन, विक्री अवलंबून असते ; हजारो लोकांचा चरितार्थ अवलंबून असतो. त्यामुळे त्यांच्या विमानाचा भांडवली व चालू खर्च समर्थनीयच नव्हे, तर अुत्पादक स्वरूपाचा, राष्ट्रीय हिताचा ठरतो. म्हणूनच ज्याप्रमाणे डॉक्टरांचा मोटरखर्च प्राप्तीकराच्या आकारणीच्या वेळी त्याच्या व्यवसायाला आवश्यक खर्च गणला जाअून करपात्र प्राप्तीतून वगळला जातो, तद्वतच अुद्योगपतींचा विमानखर्च मानला जातो ; आणि ते योग्यच आहे. ज्यांचा प्रत्येक क्षण आर्थिक किंवा अितर दृष्टींनी राष्ट्रीय मोलाचा असतो त्यांनी आपली बेडरूम अेअर कंडिशण्ड करून घेण्याला अर्थ आहे. त्यामुळे त्यांना चांगली झोप येण्यास मदत होअून त्यांना अधिक ताजेपणाने अधिक काम करता येअील.

विकत मिळू शकणारी अशी कितीतरी साधने आहेत, की ज्यांच्यामुळे आपली सोय होते, आपल्या सुखात भर पडते, आपली कार्यक्षमता आणि अर्थोत्पादनपात्रता वाढते. मोटरगाडी, फ्रिज, टलिफोन अित्यादी गोष्टी चैनीच्या समजावयाच्या का काटकसरीच्या व लाभदायक समजावयाच्या हे त्यांच्या वापरावर अवलंबून आहे. अितरांना चैनीच्या वाटणाऱ्या गोष्टी योग्य माणसांच्या हाती कार्यक्षमता वाढविणाऱ्या आणि म्हणून आवश्यक ठरू शकतात. वेळ आणि श्रम वाचविणाऱ्या साधनांनी आपल्या आरोग्यात भर घातली, कौटुंबिक स्वास्थ्य राखले, तर तेही हवेच आहे.

माझ्या माहितीच्या अेक वृद्ध बाअी आहेत. त्यांना स्वतःला नीट दिसत नाही. नीट अैकूही येत नाही. पण त्यांना स्वातंत्र्य हवे; कुणावर सतत अवलंबून राहायला

नको. ह्या बाओीच्या मुलाने त्यांना अेक फ्रिज घेअून दिला आहे. सूनबाओी आठवड्यातून दोनदा शिजवलेले जिन्नस घेअून सासूबाओींच्याकडे जातात आणि तेथील फ्रिजमध्ये ठेवून देतात. सासूबाओी आपल्या अिच्छेप्रमाणे, सवडीप्रमाणे ते जिन्नस अून करून आवडीने खातात. ह्या फ्रिजमुळे सासू-सून संघर्ष अुत्कृष्ट रीतीने टळला असून सर्वांनाच सुख लागले आहे. त्यामानाने फ्रिजला येणारा खर्च जाणवतही नाही.

ह्याअुलट, आपल्या मुलाला फार दूर नसलेल्या कॉलेजात जाण्या-येण्यासाठी स्कूटर घेअून देअून वडिलांनी जर त्याचे लाड पुरविले, आणि त्याने ह्या वाहनाचा अुपयोग अभ्यासाचे तास बुडवून केवळ भटकण्याकडे आणि सिनेमाला जाण्याकडे केला, त्याच्या हॉटेलच्या खेपा वाढल्या, तर स्कूटरची खरेदी फारच नुकसानीची ठरेल. कदाचित मुलाच्या नाशासही कारणीभूत होओील. कित्येक ग्रंथालयांतून 'येथे झोपू नका' अशा पाट्या लावलेल्या असतात. अभ्यासकांसाठी टेबल-खुर्च्यांची, पंख्यांची आणि दिव्यांची अुत्कृष्ट सोय करावयाची आणि त्यांचा अुपयोग अभ्यासाअैवजी झोपण्याकडे करावयाचा, आपल्या घोरण्याने अितरांच्या वाचनात व्यत्यय आणावयाचा, हे कसे चालेल ?

सुखसोयी कुणाला नकोत ? द्रव्यार्जनाचा हेतूच मुळी तो असतो. पण आधुनिक साधनांचा वापर आपण अधिक संपन्न व सुखी होण्यासाठी करतो की असलेली संपन्नता त्या वापरामुळे गमावतो ? अधिक कार्यक्षम बनण्याचा आनंद अुपभोगतो की अधिक आरामप्रिय आणि निष्क्रिय बनतो ? पदरात निव्वळ काय पडते, हा खरा प्रश्न आहे

: 90 :

## पावसाची नक्षत्रे थोडीच !

तारावाई आणि कमलाबाई ह्या दोघी मैत्रिणी बरोबरच नर्सिंगच्या परीक्षा देऊन बी. पी. अेन्. अे. झाल्या. ताराबाअींनी शेजारच्या अेका अिस्पितळात नोकरी धरली. तिथे त्यांना दरमहा सुमारे दोनशे रुपये मिळतात. त्यातून आपला घरखर्च भागवून त्या काही शिल्लकही टाकू शकतात. त्यांना जरी चैन करता आली नाही, तरी त्यांना विवंचनाही फारशी नाही. ह्याच्या अुलट कमलाबाअींची परि-स्थिती आहे. त्यांनी नोकरीचे बंधन स्वीकारलेले नाही. त्या खासगी प्रॅक्टिस करतात. दिवसाच्या कामाचे २० रुपये आणि रात्रीच्या कामाचे २५ रुपये असा त्यांचा चार्ज असतो. पण असे काम सतत मिळतेच असे नाही. त्यांचे कित्येक आठवडे, कधीकधी महिनेसुद्धा सुने जातात. तरीसुद्धा त्यांची वार्षिक मिळकत ताराबाअींच्या मिळकती-पेक्षा बरीच जास्त आहे. पण ती नियमित हाती येत नाही. येणे कधीकधी बुडतेही. व्यवसायाचा दर्जा राखण्यासाठी त्यांना काही खर्चही करावा लागतो. अुदाहरणार्थ, त्यांनी आपल्या नावाने टेलिफोन घेतला आहे.अशा कमलाबाअींना अेखाद्या महिन्याला घरभाडे देण्यालाही सवड नसते. ताराबाअींच्याकडून अुसने पैसे घेण्याची पाळी येते, ह्यावर अितरांचा विश्वासही बसणार नाही !

ज्यांना काही ठराविक अुत्पन्न नियमित मिळते अशांना खर्चाच्या आणि बचतीच्या योजना आखता तरी येतात. पण खर्चाच्या नव्या बाबी अनपेक्षित निर्माण झाल्या म्हणजे त्यांचे अंदाज पार चुकतात; आणि पंचाअीत होते हा नित्याचा अनुभव आहे. मग ज्यांची प्राप्ती अनियमित आहे, केव्हा किती पैसे हाती येतील हे ज्यांना सांगता येत नाही अशांची होणारी कुचंबणा विचारायलाच नको. अनियमित प्राप्ती-तून अटळ खर्चही वक्तशीर भागविणे आधीच अवघड. त्याच्या जोडीला अनपेक्षित

खर्च करणे भाग पडले, म्हणजे 'गंडस्योपरि पीटिका' अशी अवस्था होते. कारागीर, कलाकार, साहित्यिक, कवी, शेअर-दलाल, अेजंट, वकील अित्यादींची परिस्थिती अशीच कमी-अधिक प्रमाणात असते.

अेका चित्रकाराने आपल्या परिस्थितीचे वर्णन असे केले आहे, "वर्षातले बारा महिने सारखे नसतात. कधी हात जोडून बसण्याची पाळी येते तर कधी अितकी कामे अेकदम येतात, की काही ऑर्डरी नाकाराव्या लागतात. पण कामाचे पैसे मिळायला कितीतरी महिने थांबावे लागते. तोवर अिकडे देणे तुंबत जाते आणि शिल्लक काहीच अुरत नाही."

अेक नटी म्हणाली, "आम्हाला अेकेका नाटकाला पाअुणशे ते शंभर रुपये सुद्धा मिळतात, हे खरं आहे. पण अशी नाटकं वर्षभर होत नाहीत. त्यांचा सीझन असतो. आम्ही 'नाअिट'ला घेतलेले पैसे डोळ्यांवर येतात, पण आमचा खर्च अितरांना दिसत नाही. सरावात राहण्यासाठी आम्हाला दररोज गाण्याची तालीम करावी लागते. त्यासाठी साथीदारांना पगार द्यावा लागतो. वाद्यं नवी घ्यावी लागतात. ती दुरुस्तही ठेवावी लागतात. पैसे मिळाले नाहीत, तरी प्रतिष्ठेनं राहावं लागतं. किमान मोबदला मिळाला नाही, तर पोटमारा सोसूनही आम्ही नकार देतो. कारण आमची किंमत अेकदा का कमी झाली की ती कायमची कमी होअून बसायची!"

अनियमित अुत्पन्न असणारांनी नियमन कसे करावे, ह्याविषयी तत्त्वज्ञान सांगणे सोपे आहे. तपशीलवार हिशेब लिहावे, खर्च शक्य तेवढा कमी करावा, पुढे पैसे मिळतील म्हणून ते आजच खर्चून टाकू नयेत, बजेटाबाहेर खर्च होअू देअू नये, नियमाने काहीतरी शिल्लक टाकावी आणि ती बाजूसठेवावी, हे काही मुद्दाम सांगण्याची आवश्यकता नाही. आपले अुत्पन्न आणि खर्च ह्यांमध्ये मेळ राखण्याचा प्रत्येकाचाच प्रयत्न असतो ; प्रत्येकाचे तंत्र वेगळे असेल, अेवढेच.

अेजंट लोकांना तीन-चार महिन्यांच्या कमिशनअितके कमिशन अेकाच दिवसात मिळून जाते. तर कधी कित्येक आठवड्यांत अेकही मोठा सौदा होत नाही अेका अेजंटाने आपल्या गृहिणीशी विचारविनिमय करून, प्रत्यक्ष अनुभव घेअून दरमहा घरखर्च किती येतो, हे ठरविले आहे. तो गृहिणीला प्रत्येक महिन्याच्या पहिल्य तारखेला ठराविक रक्कम देतो. अपेक्षेपेक्षा अुत्पन्न जास्त झाले तर शिल्लक पडणारी रक्कम बँकेत सेव्हिंग्ज खात्यात टाकली जाते ; खर्च जास्त झाला, तर बँकेतून पैसे काढावे लागतात. अशा रीतीने काढलेले पैसे कर्ज समजून ते पुढच्या अेक-दोन महिन्यांत बँकेत परत भरण्याचा प्रयत्न केला जातो. ठराविक रकमेची दरमहा सर्टिफिकिटे घेतली जातात; आणि विम्याच्या हप्त्याप्रमाणे ती रक्कमही खर्चांत मांडली जाते.

वक्तशीर अुत्पन्न नसणारे लोक रोखीने व्यवहार करण्याचा कसून प्रयत्न करतात; शक्य तो अुसनवारी आणि अुधारी टाळतात. कारण, त्यांना पुढचा काहीच भरवसा देता येत नाही. त्यांनी आपली पत निर्माण करावी. अधूनमधून मुद्दामच कर्ज काढून

ती पत अजमावावी; वक्तशीर नव्हे, तर वेळेपूर्वी परतफेड करून पत वाढवावी, म्हणजे खऱ्या गरजेच्या वेळी पैसा अुभा करणे अवघड जात नाही. जी गोष्ट कर्जाची तीच गोष्ट अुधारीची. वाणी, कापडवाला, स्टेशनरीवाला ह्यांच्याकडून अधूनमधून जिन्नस वहीत मांडून ठेवायला सांगून आणावे, पण ही अुधारी लागलीच भागवून टाकावी; अितकेच नव्हे, तर आपलेच पैसे त्यांच्याकडे शिल्लक राहू द्यावे म्हणजे जे वळण निर्माण होते ते अडचणीच्या वेळी अुपयोगात आणता येते. ओळख पटलेला मनुष्य हा अपरिचित असलेल्या श्रीमंत असामीपेक्षा जास्त पतीचे व्यवहार करू शकतो. अुत्पन्नाची निश्चिती असणाऱ्या माणसाला बँकेतून ओव्हरड्राफ्ट अधिक सुलभतेने मिळतो, हे खरे असले तरी ज्याला आपली परतफेडीची पात्रता दाखवून देता येते, अशाला बँक कर्ज नाकारीत नाही. जरा तपशीलवार हिशेब त्याने ठेवलेले असले म्हणजे काम सोपे होते.

"आम्ही कुणाचे बांधलेले नोकर नाही." असे सांगणारे लोकही काही किमान अुत्पन्न नियमित मिळत राहावे, ह्यासाठी बंधने पत्करतातच! कित्येक वकील आणि चार्टर्ड अकौंटंट क्लासेस घेतात, बैठकीत गाणाऱ्या गायकांना काही शिकवण्या चालू ठेवाव्या लागतात. शिंप्याच्या दुकानाचे मालक दुपारच्या वेळी घरी जाअून कपडे बेतायला आणि शिवायला शिकवतात. साहित्यिक दुकानांतून कामे करतात. अेका शेअरदलालाने होमिओपाथीचा दवाखाना सुरू केला आहे. त्यातून आपल्या मोटरचे पेट्रोल भागते असे त्याचे म्हणणे.

काही किमान अुत्पन्न वक्तशीर देत राहणारे काम करीत राहणे, अुधारी आणि कर्ज मिळण्याची अप्रत्यक्ष तरतूद करून ठेवणे, हिशेबीपणाने राहणे, हे सर्व करूनही बचतीचा साठा करता आला नाही, तर फारसे स्वास्थ्य लाभणार नाही. पगारदारांना जे साधेल ते अितरांना कष्टसाध्य तरी खास आहे. त्यासाठी अधिक संयमाची आणि जागरूकपणाची आवश्यकता आहे, हे मात्र खरे. हाताशी अेकदम बरेच पैसे आले म्हणजे तारतम्य न राहून, विशेषतः अतृप्त माणसाच्या हातून अुतावळेपणाने अुधळपट्टी होण्याचा संभव असतो. विक्रीची येणारी रक्कम देणी डावलून स्वतःवर खर्चून कितीतरी पढतमूर्ख दुकानदार धंद्याचे भांडवलच खाअून टाकतात. कितीतरी धंदेवाल्यांनी आणि कलाकारांनी खोऱ्याने पैसे ओढले तरी त्यांची ओढगस्ती चालू राहते. ह्यापासून सावधगिरीचा धडा घेतला पाहिजे.

वर्षाची सत्तावीस नक्षत्रे असली, तरी त्यांपैकी पावसाची थोडीच असतात; आणि तीही सर्व पडतातच असे नाही. असे अनियमित पडलेले पाणी वाहून जाअू न देता साठवून ते शेतीला किंवा वीज-निर्मितीला बाराही महिने नियमितपणे पुरविण्यासाठी धरणे बांधली जातात. काही नक्षत्रे दगा देतील, वळवाचे पाअूस पिकांच्या क्षेत्रात पडणारही नाहीत, अुन्हाळा प्रखर होईल, पुढचा पावसाळा कदाचित लवकर सुरू होणार नाही हे सर्व हिशेबात घेअूनच आणि सर्व पूर्व-अनुभव जमेस धरून, दररोज

किती क्युसेक्स पाणी सोडावयाचे, हे ठरवावे लागते. पावसाळा संपल्यावर, दरवर्षी, धरणातील पाण्याचा साठा अंदाजिला जातो. कोणत्या व किती हिवाळी व अुन्हाळी पिकांना पाणी देता येअील ह्याचा विचार केला जातो. काही किमान साठा आणीबाणीची तरतूद म्हणून धरणात शेवटपर्यंत ठेवावा लागतो. अशा रीतीने पावसाच्या अनियमितपणाला वळण लावून पिके आणि अुद्योगधंदे ह्यांना पाणी व वीजपुरवठा अखंड चालू ठेवता येतो. अनियमित अुत्पन्नाच्या बाबतीत असेच नियमन करता येणे शक्य असते. प्रत्येक धरणाप्रमाणे प्रत्येक व्यक्तीची परिस्थिती थोडी भिन्न असणार, आणि त्यामुळे जो काही फरक पडेल, तेवढाच.

☘ ☘

: ११ :

## आधी पोटोबा, मग विठोबा !

डॉ. जे. आर्. बेलमाँट ह्या स्विस कलाप्रेमी गृहस्थाच्या खासगी मालकीच्या काही भारतीय ब्राँझ धातूच्या मूर्ती लंडनमध्ये नुकत्याच लिलावाने विकण्यात आल्या, तेव्हा त्यांच्या मालकाला १४ लक्ष रुपये मिळाले. श्रीगणेश, अय्यंगर, पार्वती, नटराज-पार्वती अित्यादींच्या ११ व्या ते १६ व्या शतकातील त्या सर्व मूर्ती होत्या. त्यांपैकी अेकट्या श्रीगणेशाच्या मूर्तीलाच २ लक्ष रुपये किंमत आली. त्या मूर्ती आता वेगवेगळ्या विलासी होटेलांच्या लाअुंजमध्ये शोभेसाठी मांडून ठेवल्या जातील. श्रीमंत पाश्चिमात्य देशांतून प्राच्य-पुराण वस्तूंबद्दल,त्याचप्रमाणे पुरातन धर्मग्रंथांबद्दल आणि स्वामी व साधू ह्यांच्याबद्दल आदर दर्शविण्याचे वेड पसरत चालले आहे. शास्त्रीय आणि औद्योगिक प्रगतीमुळे अुपलब्ध होणाऱ्या सुखापेक्षा खरे शाश्वत सुख वेगळेच असते, ह्याची त्यांना किंचित जाणीव होअू लागलेली असावी.

पं. रविशंकर ह्यांच्याजवळ मांडी घालून, धडे घेअून, बीटल्सच्या संगीतात सतारीचा समावेश केला गेला. हिंदी सतारींची निर्गत वाढली, तरी तेवढ्यावरून भारतीय संगीताची पाश्चिमात्यांवर मोहिनी पडली आहे, असा निष्कर्ष काढणे धाडसाचे होअील. नावीन्य आणि वैचित्र्य ह्यांच्या छांदिष्टांना संगीताचे मर्म कळायला हवेच असे नाही.

अेक अमेरिकन दंपती भारतात प्रवासाला आले असताना, त्यांनी येथील प्रेक्षणीय सुंदर स्थळे पाहिली, त्याचप्रमाणे झोपडपट्ट्याही मुद्दाम जाअून पाहिल्या. तेथील दुर्गंधी, दारिद्र्य, दैन्य, आजार अित्यादींतूनही त्यांच्या मनावर ठसा अुमटला तो म्हणे त्या गलिच्छ वस्तीत राहणाऱ्या लोकांच्या समाधानी आणि आनंदी वृत्तीचा !

"आम्हा कित्येक अमेरिकनांपेक्षा हे लोक किती सुखात आहेत ! त्यांच्यात काही-तरी आध्यात्मिक, अलौकिक असलं पाहिजे खास. आम्हांला त्यांचा हेवा वाटतो," असे त्यांनी अुद्गार काढले.

हे जोडपे मुंबअीहून थेट न्यूयॉर्कला जेटने गेले., आणि बीव्हर्ली हिल्सवरील आपल्या सुखद अपार्टमेंटच्या प्रांगणातील पोहण्याच्या तलावात जलविहार करीत, पिकनिकच्या मौजा मारीत, पुन्हा पूर्ववत चैनीत दंग झाले. आपल्या घरी पार्टी करून त्या वेळी मित्रमैत्रिणींना भारतात घेतलेली छायाचित्रे व फिल्म्स दाखवून आपल्या प्रवासातील विविध अनुभव, पेयांचे प्याले भरीत ते वर्णू लागले. आपल्या सुखोपभोगात खंड न पाडता, भुकेल्या बेघर अशा पौर्वात्यांबद्दल सहानुभूती दाखविणे बुद्ध-हिंदु-बहाअी धर्मांच्या शिकवणीत रस घेणे हे अमेरिकेतील अुच्चभ्रू वर्तुळातून प्रतिष्ठेचे लक्षण बनू लागले आहे.

ह्या फॅशनचे अनुकरण करणारे लोक भारतातही निघाल्याखेरीज कसे राह-तील ? कित्येक हिंदी बड्या कंपन्यांच्या कॅलेंडरांवरील वन्य जमातीच्या स्त्री-पुरुषांची फाटक्या-मळक्या अपुऱ्या वस्त्रांतील रंगीबेरंगी चित्रे ह्याची साक्ष देतील. समृद्ध शेतवाडीच्या पार्श्वभूमीवर सुबत्तेमुळे सुखात नांदणारे शेतकरी जोडपे चित्रित करण्याअैवजी आमच्या कित्येक कंपन्यांना भारतीयांची दारिद्र्याची दृश्येच जास्त प्रदर्शनीय वाटतात. दारिद्र्यात समाधान कितपत असते ह्याची त्यांनी कधी चौकशी केली आहे ? पाश्चिमात्यांना हवे असतात करमणुकीसाठी म्यूझियममध्ये नमुने. आमचे असतात ते भाअीबंद आणि आमच्याच देशाचे नागरिक, हे आम्ही विसरतो. श्रीमंतीला विटलेल्या पाश्चिमात्यांनी विरंगुळा म्हणून नग्नतेत आनंद शोधण्याचा प्रयत्न करणे वेगळे आणि थंडीनिवारणापुरते, लज्जारक्षणापुरतेही वस्त्र मिळू न शकणारांनी आपल्या अपरिहार्य आणि गारठून टाकणाऱ्या नग्नतेला वैराग्याचा दर्जा देणे वेगळे.

'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' सांगणाऱ्या साधूंची आणि स्वामींची अमेरिकेत चलती आहे ते ठीक आहे. पण त्याबरोबरच तो देश सर्व प्रकारच्या अुत्पादनात आणि अैहिक सुखात सबंध जगामध्ये अग्रस्थानी आहे, हे आपण विसरता कामा नये. सुखाची भूक वाढत चालली, ती सुखोपभोगाने शमेनाशी झाली, त्यामुळे तेथील काही लोक सुखाचा अितरत्र शोध करू लागले. ह्याला आपण नसते महत्त्व देता कामा नये. जणू काही भारतानेच त्यांना खऱ्या सुखाचा मार्ग दाखविला आहे, अशा कल्पनेत रममाण होअून आपण आपल्या निष्क्रियतेचे, अल्पसंतोषीपणाचे, दारिद्र्याचे समर्थन करू पाहणे आत्मघातक आहे. समृद्ध देशांतील काही लोकांच्या अनेक खेळण्यांतील ह्या अेका खेळण्याच्या होणाऱ्या जाहिरातीला फसून आपण शास्त्रीय, यांत्रिक, औद्योगिक प्रगतीमधील केवळ दोषांवरच भर देअून स्वस्थ बसलो तर त्यात आपलेच नुकसान आहे.

आज आपल्या देशात काही ठिकाणी जी बरी परिस्थिती दिसून येते ती शास्त्रीय व यांत्रिक साहाय्यामुळेच शक्य झालेली आहे. मृत्युसंख्या अुतरली, रोगराअी कमी झाली, धरणांमुळे शेतीसाठी, पिण्यासाठी पाणीपुरवठा वाढला, शिक्षणप्रसार झाला, दळणवळण सुकर झाले, हा सर्व त्याचाच परिणाम आहे. दळण-कांडणामुळे जुन्या पिढीतल्या स्त्रियांना किती कष्ट सोसावे लागत हे आजच्या पिढीला कसे कळणार ? विजेमुळे तर कित्येक प्रदेशांचा कायापालट होत आहे. पण प्रगत पाश्चिमात्य देशांच्या मानाने अितर कित्येक आशियाअी देशांप्रमाणे भारत हा जवळजवळ प्राथमिक अवस्थेतच आहे.

पाश्चिमात्य देश अितर खंडांतील देश पादाक्रांत करीत होते,. आणि त्यांच्यावर राज्य करीत होते, तेव्हा त्यांना ह्या मागासलेल्या देशांच्या अुच्च सांस्कृतिक वारशाची आठवण आली नाही. पण आता ह्या २० व्या शतकातील शारीरिक सुखांच्या अतिरेकामुळे त्यांना पौर्वात्य आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा छंद निर्माण झाला आहे. पण त्यासाठी ते आपला राहणीचा दर्जा कमी करण्यास तयार होणार नाहीत. आअी-वापांना, भावाला, पतीला न विचारणाऱ्या, अितरांची संपत्ती लुबाडणाऱ्या लोकांनी गीतरामायणाच्या आपल्या आवडीची जाहिरात करण्याचाच हा प्रकार आहे. सुखे मिळविण्यास संपत्ती कमी पडू लागली म्हणजे मनोविनोदनासाठी दुरून दारिद्र्य पाहणे वेगळे आणि दारिद्र्याने गांजलेल्यांनी अध्यात्माची खोटी अैट मिरवणे वेगळे. आज आपणांपुढे खरा प्रश्न आहे जिवंत राहण्याचा—मानव म्हणून जीवन जगता येण्याचा.

आपल्याकडील बहुसंख्य दु:खांवर शास्त्रीय आणि औद्योगिक प्रगती हाच अेकमेव अुपाय आहे.सर्व प्रकारच्या अुत्पादनवाढीला जे जे आवश्यक आहे, ते ते सर्व आपण करायलाच हवे. पोट फुटेपर्यंत खाणारांनी बारीक होण्यासाठी, वजन कमी करण्यासाठी, जरूर डाअेटिंग करावे. खायला न मिळणारांनी पोटभर कसे मिळेल ह्याच्यासाठी खटपट करायला हवी. पोटोबाच्या आधी विठोबाच्या मागे लागण्याची घोडचूक आजवर केली ती आता तरी सुधारायला पाहिजे.

आमच्या पांडुरंगभक्त परटाने पंढरपूरची यात्रा गेल्या कितीतरी वर्षांत अेकदाही चुकू दिली नाही. परंतु त्याची आर्थिक व कौटुंबिक परिस्थिती बिघडल्यामुळे पंढरीची वारी करणे गेल्या आषाढीला आणि कार्तिकीला त्याला शक्य झाले नाही. सावकाराकडून कर्ज काढून, चंद्रभागेच्या काठी पंढरी दुमदुमविण्यापेक्षा मुठा नदीच्या काठी कपडे बडविणेच त्याने पसंत केले; कारण तेच त्याच्या स्वत:च्या व कुटुंबियांच्या अधिक तातडीच्या हिताचे होते. त्याचे हे धोरण आपल्या समाजाने अंगिकारले पाहिजे.

"आधी प्रपंच करावा नेटका, मग लागावे परमार्थ विवेका" हा समर्थ रामदासांचा अुपदेश सुप्रसिद्ध आहे. "प्रपंच सांडोनी परमार्थ केला, तरी अन्न मिळेना खायाला, मग तया करंट्याला परमार्थ कैचा ?" असेही त्यांनी बजावले आहे. पाश्चिमात्यांनी आधी प्रयत्नपूर्वक मिळवून पोट फुटेतो जेवून पोटाची तड कमी करण्यासाठी मिरपूड मागणे ठीक आहे. काहीच अुद्योग न करणाऱ्या अुपाशी माणसांनी दुसऱ्याच्या जिवावर जगायला बघून परमार्थाच्या मिरपुडीवर ताव मारू पाहणे हास्यास्पद आहे.

: १२ :

# मिळकतीला गुंतवणुकीची जोड हवी

एक तरुण विधवा बँक मॅनेजरला भेटायला गेली आणि त्याला म्हणाली, "वास्तविक मी अजून कुठं बाहेर पडत नाही. पण नाअिलाज आहे, म्हणून तुमच्याकडे आले आहे. ह्यांचा अपघाती मृत्यु झाला, त्याच्या दुःखातच मी आहे. त्यांच्या विम्याचे दहा हजार रुपये नुकतेच आले आहेत,. आणि विमा अेजंट रोज हेलपाटे घालून मला दरमहा मोठं व्याज मिळवून देअीन असं सांगत आहे. म्हणून मी आपला सल्ला विचारायला आले आहे."

"योग्य सल्ला देणं, हे आमचं कामच आहे. आपण घाअी करू नका; आपल्या अशा मनःस्थितीत योग्य निर्णय घेणं कठीण जाअील. शिवाय आपल्याला पैशाच्या व्यवहाराचा अनुभव नाही. कुणावर अेकदम फार विश्वास टाकू नका. पैसे गुंतवताना चूक झाली, तर कायमचं नुकसान व्हायचं. आपण जरा सवडीनं केव्हाही या."

पतिनिधनानंतर आयुष्यातला मुख्य आधार नष्ट झाल्यामुळे विधवेचे मन अस्वस्थ असते. सल्ला आणि मदत ह्याची तिला अतिशय गरज असते; साहजिकच तिला सहानुभूती दाखविणारा मनुष्य जवळचा वाटतो. पण तो विश्वासार्ह आहे किंवा नाही ह्याची छाननी करण्याजोगी तिची मनःस्थितीच नसते. नातेवाअीक, शेजारी, मित्र ह्यांपैकी जो तिला त्या परिस्थितीत आपला वाटेल त्याच्यावर ती विश्वास टाकते. त्यातले मतलबी लोक तिला सहज फसवू शकतात.

दरमहा येणारे अुत्पन्न पतीच्या निधनामुळे बंद होते, पण खर्च चालूच राहतात. घरभाडे, वाण्याचे बिल, शाळांची फी ह्यांत काटकसर करूनकरून किती करणार? काही खर्च पुढे ढकलले, तरी ते कायमचे थोडेच टळणार? विम्याचे किंवा प्रॉव्हिडंट फंडाचे पैसे तिच्या हाती येतात, त्यावर जास्तीत जास्त व्याज मिळावे अशी तिची

स्वाभाविकच अिच्छा असते,. आणि 'जास्तीत जास्त' ह्याचा अर्थ 'अव्यवहार्य' 'भरमसाट' असा होअू लागतो. सरकारी रोख्यात, बचतीच्या सर्टिफिकेटात, बँकेत फारसे व्याज मिळत नाही. त्यामुळे अधिक व्याज देणाऱ्यांच्या भुलावणीला ती बळी पडू शकते.

कुणीतरी नातेवाअीक नवा धंदा काढण्याच्या विचारात असतो किंवा चालू धंदा वाढविण्याचे ठरवितो. अशा धंद्याला पैसे दिले, तर गुंतवणुकीवर कितीतरी चांगले व्याज मिळते. शिवाय नफ्यातला काही हिस्साही मिळू शकतो, अशा भावनेने बिचारी आपले सर्व पैसे त्याच्या स्वाधीन करते. पैसे जमा करणारा बोलण्यात नेहमीच कुशल आणि विश्वास निर्माण करणारा असतो. असे गुंतविलेले पैसे बुडाले नाहीत तरी जरूर तेव्हा परत मिळणे कठीण असते, हे फार अुशिरा लक्षात येते. कधीकधी ज्याला पैसे द्यावेत तोच आपला धंदा बंद करून टाकतो आणि घेणेकऱ्यांना आपल्या येणेकऱ्यांचा हवाला देतो!

सेवानिवृत्त होणाऱ्याच्या पुढेही असाच प्रश्न अुपस्थित होतो. पगार बंद होअून पेन्शनवरच राहण्याची पाळी येते. कितीतरी नोकरांना पेन्शन नसतेच मुळी. प्रॉव्हिडंट फंडाची रक्कम आणि त्याच सुमारास आलेली विम्याची रक्कम हाच त्यांचा मुख्य आधार अुरलेला असतो. साहाजिकच, वर अुल्लेखिलेल्या विधवेप्रमाणेच काहीशी त्यांची परिस्थिती झालेली असते; आणि ते आपल्या संसाराची गरज लक्षात घेअून दरमहा किती किमान व्याज आले पाहिजे ते ठरवतात; आणि तसे व्याज देणाऱ्या गुंतवणुकीच्या ते शोधात असतात. मुदलाची सुरक्षितता आणि परतफेडीची खात्री ह्यापेक्षा ते व्याजाच्या दराला जास्त महत्त्व देतात. ज्यांनी आजवर कधीही पोस्टात मिळणारी सर्टिफिकिटे आणि सरकारी रोखे ह्यांखेरीज अितरत्र पैसे ठेवले नाहीत तेच लोक आता मिळकत थांबल्यावर, सुरक्षिततेची गरज वाढल्यावर, व्याजाच्या मोहाला बळी पडण्यास तयार होतात.

कुणाचा किती प्रॉव्हिडंट फंड केव्हा मिळणार आहे, विम्याची रक्कम केव्हा मिळणार आहे ह्याच्या पाळतीवर काही लोक असतात आणि त्या सुमारास त्यांचे येणे-जाणे, नमस्कार-चमत्कार वाढू लागतात. भरपूर व्याजाची ठिकाणे ते दाखवू लागतात. नव्या योजना सुचवितात. कंपन्यांमधील ठेवींची महती सांगतात. गुंतवणुकीच्या बाबतीत स्वार्थबुद्धीचे लोक सल्लागार बनले, तर सल्ला कुणाचे हित अधिक पाहील हे सांगावयास नकोच. सुरक्षितपणावर भर देणारा सल्लागार नकोसा वाटू लागला म्हणजे लक्षण बरे नसते. ज्यांनी आजवर कधीही शेअर्सची अुलाढाल केली नाही ते शेअर्सच्या खरेदी-विक्रीत नफा कमावण्याची अपेक्षा बाळगू लागतात; व्याज मिळत राहून मूळ मुद्दल वाढण्याच्या सुखस्वप्नात दंग होतात. गुंतवण्याजोगी किती रक्कम अुपलब्ध आहे ह्यावर बरेच अवलंबून राहील, हे अुघड आहे. पण पहिल्या दहावीस हजार रुपयांच्या बाबतीत तरी मुदलाच्या सुरक्षिततेसच प्राधान्य दिलेले बरे.

पैसे कुठे व कसे गुंतवावे हे सांगण्याचा येथे अुद्देश नाही. पण व्याजाचा दर आणि सुरक्षितता ह्यांचे प्रमाण बहुधा व्यस्त असते, हे मात्र स्पष्ट करावयाचे आहे.

तेव्हा सुरक्षिततेला बाध न येता जास्तीत जास्त व्याज कसे मिळेल अेवढाच प्रश्न अुपस्थित होतो; त्याच्या चर्चेची मर्यादा ४ टक्के ते ६ टक्के ह्याच्यापलीकडे फारशी जाणार नाही. परतफेडीची मुदत मोठी असल्यास व्याज जास्त मिळू शकेल; त्या दृष्टीनेही विचार करावा लागेल, पण अगदी अप्रस्तुत कारणांसाठी विश्वास टाकून जास्त व्याजाच्या आकर्षणास बळी पडता कामा नये, हे स्पष्ट आहे.

सध्याच्या चलनवाढीच्या आणि महागाअीच्या काळात अुत्पन्नही वाढत राहायला हवे; तरच अुत्पन्न-खर्चाची तोंडमिळवणी होणार. चांगली प्रगती करीत असलेल्या कंपन्यांच्या ऑर्डिनरी शेअर्समध्ये पैसे गुंतवले, तर हे साध्य होअू शकते. डिव्हिडंड वाढत जाते त्याप्रमाणे शेअर्सची किंमतही अधिकाधिक होत जाते. पुढे यशस्वी होण्याची चिन्हे दिसणाऱ्या नव्या कंपन्यांचे शेअर्स घेअून ठेवणे हाही अेक मार्ग आहे. अशा चांगल्या शेअर्समध्ये आपले पैसे विभागून गुंतवले, म्हणजे धोक्याचे प्रमाण बरेच कमी होते. योग्य सुरक्षितता आणि बऱ्यापैकी व्याज सुटणे ही दोन्ही साधण्यासाठी अशा रोख्यांसारखे साधन नाही. शेअर्सची निवड मात्र करता आली पाहिजे.

म्हातारपणाची पूर्वतयारी आपण अितर कित्येक बाबतीत आधीपासून करतो. पण वयाची पन्नाशी किंवा साठी होअीपर्यंत पैसे गुंतविण्याच्या शास्त्राकडे दुर्लक्ष करतो; आणि त्यामुळे जरुरीच्या वेळी योग्य निर्णय घेण्याची आपली तयारी झालेली नसते. जरुरीची निकड होण्यापूर्वीच ह्या बाबतीत आपली तयारी चालू ठेवायला हवी; गुंतवणुकीचा सराव करायला हवा. वृत्तपत्रांतील आर्थिक बातम्या, कंपनीवृत्ते, कंपन्यांच्या अध्यक्षांची भाषणे ह्यांकडे आधीपासूनच लक्ष दिले तर अतिशय बरे होअील. ह्या अत्यंत जिव्हाळ्याच्या, जीवनाला अत्यावश्यक विषयाचा परिचय त्यामुळे सुलभतेने आणि लवकर होअील. पैशाची गुंतवणूक किफायतशीर करणे, हा अेक छोटासा व्यवसायच आहे आणि त्याकडे सतत लक्ष ठेवल्याखेरीज त्यात किफायत होत नाही. लक्ष ठेवण्यासाठी त्याच्या तंत्राची माहिती असायला हवी. तसे बहुधा आढळत नाही, म्हणून तर लवकर श्रीमंत करून देण्याचे आश्वासन देणाऱ्या मतलबी लोकांचे फावते आणि गरजू लोक नुकसान पावतात.

पैसे मिळविण्यापेक्षा, बचत करण्यापेक्षा,त्याची लाभदायक गुंतवणूक करणे अतिशय अवघड असते. पण नेमकी त्या बाबतीत हयगय होते, दक्षता घेतली जात नाही; आणि पूर्वीच्या सर्व कष्टांवर पाणी पडते. संसाराची माती होअून जाते. आर्थिक घडामोडींकडे आधीपासून लक्ष पुरविलेले असले म्हणजे त्यांची मोडणी कळू शकते. आर्थिक बातम्यांचा आणि घटनांचा अर्थ लावता येतो. अपेक्षा आणि अंदाज कधीच चुकणार नाहीत असा तज्ज्ञही सापडणे कठीण. चुका कमी व्हाव्यात, त्यांचे दुष्परिणाम टळावेत असा प्रयत्न सहज शक्य आहे. वृत्तपत्रांतील आर्थिक पृष्ठाच्या वाचनाला दररोज पाचदहा मिनिटे दिल्यानेही पुरण्याजोगे आहे. चाळिशी आली म्हणजे कल्पित पारलौकिक मोक्षासाठी मनुष्य भक्ती करू लागतो; अुतारवयातील अनुभवित आधिभौतिक विवंचनांतून मुक्ती मिळविण्यासाठी तेवढा वेळ रोज दिला तरी भागेल ! पुरुषांप्रमाणे स्त्रियाही आता मिळवत्या असल्यामुळे त्यांनीही ह्या प्रश्नाकडे लक्ष द्यायला हवे; मिळकतीप्रमाणे गुंतवणुकीचा प्रश्नही त्यांना सोडवावा लागत आहे; अधिकाधिक सोडवावा लागणार आहे.

: १३ :

# पैसे गुंतवण्याच्या प्रयोगशाळा

पैसे मिळविण्यापेक्षा किंवा त्याची बचत करण्यापेक्षा त्याची सुरक्षित आणि लाभदायक गुंतवणूक करणे अतिशय अवघड असते. पण नेमकी त्याच बाबतीत हयगय होते. त्यामुळे पूर्वीच्या सर्व कष्टांवर पाणी पडते. आर्थिक घडामोडींकडे आधीपासूनच लक्ष पुरविणे, त्यासाठी वृत्तपत्रातील आर्थिक पृष्ठाच्या वाचनाला दररोज पाचदहा मिनिटे देणे, असा त्यावर अेक अुपाय सुचविलेला आहेच. ('मिळकतीला गुंतवणुकीची जोड हवी' पृ. ३७) आर्थिक जगाची ओळख नसल्यामुळे वा ओळख होण्याजोगी परिस्थिती नसल्यामुळे व्यापारी पानावरील परिभाषा व घडामोडी कळण्याअितकी आमच्याजवळ पात्रता नसते अशा अर्थाची प्रतिक्रिया त्यावर कित्येकांनी व्यक्त केली आहे.

अभ्यासाने आणि सतत परिशीलनाने आर्थिक घडामोडींचा अर्थ लावायला शिकणे शक्य असते; पण हातून प्रत्यक्ष व्यवहार घडल्याखेरीज, त्यांचे बरेवाअीट परिणाम अनुभवल्याखेरीज, किफायतशीर व सुरक्षित गुंतवणूक करण्याची कला साध्य होणार नाही, हे खरे आहे. मोटार कशी चालवावी, हे केवळ पुस्तकावरून शिकता येणार नाही; ती प्रत्यक्ष चालवूनच पाहिली पाहिजे. तीच गोष्ट पोहण्याच्या कलेची किंवा अितर कोणत्याही व्यावहारिक गोष्टीची. पाण्यात तरंगून हात-पाय कसे हालवायचे हे आधी समजावून घ्यावयाचे नि मग पाण्यात अुतरावयाचे. अगोदर काठाकाठाने, कमरेअितक्या पाण्यात पोहायचे आणि मगच खोल पाण्यात शिरायचे, अुड्या मारायच्या. म्हणजे बुडण्याचा धोका कमी राहतो. पैशाच्या गुंतवणुकीच्या बाबतीत असेच केलेले बरे. अनुभवसिद्ध ज्ञानानेच जास्त व्याज-डिव्हिडंड किंवा भांडवलवाढ पदरात पाडता येते. त्याला सुरवात कशी करायची, हा खरा प्रश्न आहे.

आर्थिक परिभाषेशी परिचय असल्याखेरीज आर्थिक घडामोडींच्या बातम्या, अहवाल, निदर्शक आकडे अित्यादींचा नीट अर्थ लावता येणार नाही; मोडणी कळणार नाही. त्याचप्रमाणे गुंतवणुकीचा भला-बुरा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याखेरीज आर्थिक परिभाषा नीट कळणार नाही. तार कशी लिहावी, मनीऑर्डर कशी करावी हे शाळेत शिकवले तरी प्रत्यक्ष कृतीच्या वेळी ते शिक्षण अपुरेच पडते. चेक कसा लिहावा ह्याविषयी सूचना वाचून त्या नीट लक्षात येत नाहीत व राहात नाहीत. आपण लिहिलेले चेक त्यांतील चुकांमुळे परत आले म्हणजे त्या चुका पुन्हा होत नाहीत, असा कित्येकांचा अनुभव असेल. मुख्य मुद्दा असा, की ह्या सर्व गोष्टी हातातून गेलेल्या असायला हव्यात. पैशाच्या गुंतवणुकीसही ते लागू आहे. तत्त्वाला व्यवहाराची जोड हवीच. व्यवहारात लवकर कौशल्य यावयाला तांत्रिक ज्ञानही हवे. बँकेतील नोकरीच्या बाबतीत, अितर शाखांच्या पदवीधरांपेक्षा कॉमर्सच्या पदवीधरांस प्राधान्य दिले जाते, ते ह्यासाठीच.

गुंतवणुकीचा अनुभव मिळण्याची पद्धतशीर सोय करता येणे शक्य आहे काय ? अमेरिकेत मुलामुलींना लहानपणीच शाळांतून असे शिक्षण दिले जाते. त्या दृष्टीने येथेही प्रयत्न करता येण्याजोगे आहेत. तेथील कित्येक शाळांतून, वर्गातील सर्व विद्यार्थी वर्गणी जमा करून अेखाद्या कंपनीचा शेअर विकत घेतात. त्या शेअरची शेअर-बाजारातील किंमत कशी वाढते किंवा कमी होते, हे फळचावरील आलेखांच्या साहाय्याने त्यांना समजावून सांगण्यात येते. साहजिकच, त्या चढअुताराची कारणमीमांसाही केली जाते. काही शाळांतून विद्यार्थ्यांचे 'अिन्व्हेस्ट्मेंट क्लब' आहेत. प्रत्येक विद्यार्थी ठराविक वर्गणी देअून क्लबचा सभासद होतो. अिलिनॉअिसमधील शाळांतून तर गणित शिकविण्यासाठी शेअर-बाजारातील चढ-अुतारांचा अुपयोग केला जातो. त्यामुळे गणितावरोबर शेअर्समधील गुंतवणुकीचेही व्यवहारज्ञान त्यांना अनायासे मिळते.

न्यूयॉर्कच्या स्टॉक अेक्स्चेंजने पैशाच्या गुंतवणुकीविषयी नकाशे, चित्रपट, माहितीपट तयार केले आहेत. ते ठिकठिकाणी दाखविले जातात. गेल्या वर्षी त्यांच्या आधाराने १० लक्ष विद्यार्थ्यांना शेअर्सविषयी माहिती देण्यात आली. अज्ञानाच्या नावाने शेअर्स खरीदता यावे, ह्या दृष्टीने त्यासंबंधातले नियमही सैल करण्यात आले. त्याचा परिणाम म्हणजे अमेरिकेत आता अज्ञान शेअर-होल्डरांची संख्या २,००,००० च्या वर गेली आहे ! प्रत्येक शेअर-होल्डरला, त्याचा अेखादाच लहानसा भाग असला तरी दर वर्षी कंपनीकडून वार्षिक अहवाल पोस्टाने येतो; डिव्हिडंड वॉरंटही मिळते. मोठ्या माणसांसारखे मुलामुलींना येणारे हे टपाल त्यांचा आनंद द्विगुणित करते.

पैसे गुंतविण्याचे ज्ञान शाळेतील वर्गांतून देताना, कंपन्यांचे व्यवहार कसे चालतात हे आधी समजावून सांगण्यात येते. डिव्हिडंड म्हणजे काय, शेअर बाजारात किमती का चढतात व अुतरतात, वृत्तपत्रांत दिलेल्या किमतींचा बोध कसा घ्यायचा, ताळेबंद कसा वाचायचा हेही मुलांना शिकविले जाते. तात्कालिक मोठा लाभ हे गुंतवणुकीचे अुद्दिष्ट नाही, हे त्यांच्या मनावर मुद्दाम बिंबविण्यात येते. मोठ्या प्रमाणा-

वर शेअरर्समध्ये गुंतवणूक करण्यापूर्वी कौटुंबिक अडीअडचणींची तरतूद केलेली असणे अिष्ट आहे हे पटवून देण्याचा न्यूयॉर्क स्टॉक अेक्स्चेंजचा सतत प्रयत्न असतो.

आपण डॉक्टरकडे गेलो म्हणजे तो प्रथम आपली नाडीपरीक्षा करतो. नाडी पाहून तो प्रकृती जाणू शकतो. माणसाच्या प्रकृतीप्रमाणे त्याच्या नाडीत फरक पडतो, त्याचप्रमाणे देशाची आर्थिक प्रकृती शेअर बाजारात प्रतिबिंबित होते. साहजिकच, शेअर्सच्या किमतींच्या चढअुताराचा अभ्यास करणाराला आर्थिक दृष्टिकोन प्राप्त होतो. गुंतवणुकीवर परिणाम करणाऱ्या विविध घटकांचे त्याला ज्ञान होअून तो व्यवसायचतुर बनतो. अल्प-बचत योजनेचे अेक अंग म्हणून आपल्याकडील काही शाळांतून विद्यार्थ्यांना बचत तिकिटे घेण्याला प्रवृत्त करण्यात येते. त्यामुळे, त्यांच्यात बचतीची आवड निर्माण होण्यास मदत होते. पण ही बचत सरकारच्या स्वाधीन केली जाते; ती गुंतवण्याचे शास्त्र विद्यार्थ्यांना कळू शकत नाही. त्यांचे व्यवहारज्ञान वाढत नाही.त्यांची आर्थिक दृष्टी विशाल होअू शकत नाही. औद्योगिक शेअर्समधील गुंतवणुकीचे प्रयोग त्यांना व्यवहारी बनवील. गुंतवणुकीचे क्लब शाळांनी सुरू करून पाहावेत. निदान कॉलेजांतून– कॉमर्स कॉलेजांतून तरी असे क्लब जरूर असायला हवेत. स्वतंत्र देशाच्या सरकारचे स्थैर्य आणि भवितव्य त्यातील औद्योगिक कंपन्यांच्या स्थैर्याशी व भवितव्याशी निगडित असते ह्याची प्रचीती आता आपणास येत आहेच. तेव्हा अशा गुंतवणुकीमधील धोका कमीकमीच होत जाअील हे अुघड आहे; तरी तरतम पाहूनच गुंतवणूक करावी लागणार. अशा ह्या वाढत जाणाऱ्या व्यवहारासाठी आवश्यक ती ज्ञानाची व अनुभवाची पूर्वतयारी नको का करायला ?

: १४ :

## महागाअीच्या भस्मासुराला शह !

महागाअी दररोज वाढत चालली आहे. त्यामुळे कालचा धारा आज नाही, आजचा अुद्या नाही, अशी स्थिती झाली आहे. प्रत्येक जिनसांचे भाव वाढत आहेत. बडे व्यापारी, कारखानदार, त्याचप्रमाणे सटोडे, काळाबाजारवाले आणि लाचलुचपतवाले सोडले, तर महागाअीची झळ प्रत्येकालाच लागली आहे. प्राप्ती-मधील वाढ महागाअीला तोंड देण्यास असमर्थ ठरत आहे. अशा परिस्थितीत, दर महिन्याची तोंडमिळवणी करणे कठीण होअून बसले आहे, मग कशाची आहे बचत आणि कशाची आहे गुंतवणूक ?

अिकडे आपली आयुर्मर्यादा मात्र वाढत चालली आहे. म्हणजे आपण जास्त जास्त वर्षे जगू लागलो आहोत. ह्याचा अर्थ अुतारवयाचा काळ दीर्घतर होत जाअून आपल्याला म्हातारपण अधिक वर्षे भोगावे लागणार आहे. अुमेदीचा काळ अितका विकट, तर पुढील काळाची कल्पनाच न केलेली बरी. नोकरी किंवा व्यवसाय ह्यांतून मुक्त झाल्यानंतरचे, प्राप्ती थांबल्यानंतरचे आयुष्य हलाखीत न सापडता कसे घालविता येअील ? मिळकत थांबल्यावर किंवा कमी झाल्यावर चरितार्थाची काय सोय ? रोजच्या किमान गरजा कशा भागविता येतील ? बँकांसारख्या संस्थांतील जबाबदार अधिकारी आपआपल्या संस्थांची धोरणे दूरदृष्टीने आखीत असले, गिऱ्हाअिकांना बहुमोल सल्ला देत असले तरी स्वतःच्या बाबतीत ते योग्य ती आर्थिक योजना व तजवीज करू शकत नाहीत. प्रसंग येअील तेव्हा पाहू असे म्हणतात, असा कित्येकांच्या बाबतीत अनुभव येतो. मग बाकीच्यांची काय कथा ?

काटकसर करून बचत केली पाहिजे, ती नीट गुंतविली पाहिजे, हे प्रत्येकाला पटलेले असते. मुलाबाळांचे शिक्षण, लग्नकार्य, स्वतःचे म्हातारपण, कुटुंबाची तरतूद,

अित्यादींसाठी पैसे बाजूला काढून ठेवण्याची जरुरी नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही. ज्यांना शक्य आहे ते बचत करून विमा अुतरवितात, सर्टिफिकिटे घेतात, ठेवी ठेवतात. पण वाढत चाललेल्या महागाअीमुळे बचतीची किंमत कमी होते आणि केलेल्या स्वार्थत्यागाच्या मानाने फारच कमी मोबदला स्वीकारण्याची पाळी येते. बाजारभाव दुपटीने वाढले म्हणजे पेन्शनची क्रयशक्ती त्या प्रमाणात अुतरते. त्याच रकमेच्या पेन्शन-बिलावर सही केली तरी त्या रकमेची खरेदीची शक्ती कितीतरी कमी झालेली असते. तीच गोष्ट घरभाडे, व्याज, डिव्हिडंड, अित्यादी अुत्पन्नांची आहे. ह्यापुढे किमती अुतरण्याचा संभव नाही; अुलट महागाअी आणखी वाढतच जाणार हे दिसतेच आहे. म्हणजे आजच्या कल्पनेप्रमाणे पुरेशी तरतूद जरी केली, तरी प्रत्यक्ष जरुरीच्या वेळी ती अपुरी पडणार आहे. ह्यावर अुपाय कोणता असा प्रश्न अेका विमा अेजंटाला विचारला तेव्हा तो म्हणाला, "पूर्वीच्या मानाने दुप्पट रकमेचा विमा अुतर म्हणजे महागाअीला भिण्याचं कारणच नाही."

दुप्पट रकमेच्या विम्याला हप्तेही दुप्पट बसतात. त्याची काय सोय, हे तो सांगू शकला नाही. काहीजणांना अशा रीतीने महागाअीचा विमा अुतरता येअीलही, पण बाकीच्यांनी काय करावे? आपल्या वाट्यास येणाऱ्या दीर्घायुष्याची दुर्दशा तेवढी त्यांनी सोसायची काय?

हा प्रश्न खरोखरच बिकट आहे. तो केवळ गणिताने सुटण्याजोगा नाही हे अेकदा पटल्यावर तो सोडविण्याचे अन्य मार्गही शोधायला हवेत. यावर रामबाण अुपाय सापडला नाही तरी निवारणाची शक्यता असलेले अितर अुपाय करून पाहायला नकोत का? वाढत्या महागाअीमुळे जिचे अुत्पन्न व क्रयशक्ती कमी न होता महागाअीच्या प्रमाणात वाढत जाअील अशा प्रकारची गुंतवणूक आपण शोधून काढली पाहिजे. ह्या गुंतवणुकीसाठी लागणारी बचत आपल्या आवाक्यात नसेल तर ती आवाक्यात आणली पाहिजे. म्हणजे आपल्या आर्थिक प्रयत्नाचे जास्तीत जास्त फळ जरुरीच्या वेळी आपल्या पदरात पडेल. अितर गुंतवणुकींचे महत्त्व मान्य करूनही ह्या नव्या गुंतवणुकीला अग्रस्थान दिल्याने कसे फायदे होतील ते आपण पाहूया.

ही गुंतवणूक साधण्यासाठी अुत्पन्न वाढवून, काटकसर नि बचत करावी लागते. पण विशिष्ट ठिकाणी भरपूर पैसाही खर्च करावा लागतो. आपल्या दैनंदिन जीवनात बाकी सर्व खर्चाला कात्री लावून मुलामलींच्या शिक्षणाला व विकासाला प्राधान्य देण्याचा हा सवाल आहे. शाळा-कॉलेजांची फी आणि पुस्तकेच नव्हे तर आरोग्य, प्रवास, छंद, व्यवहारनिपुणता अित्यादींच्या बाबतीतही शक्य तेवढ्या सढळ हाताने, दूरदृष्टीने, खर्च करण्याचा हा प्रश्न आहे. सर्व दृष्टींनी तयार झालेली मुले अधिक चांगल्या नोकऱ्या मिळवू शकतील व त्यात अुत्कर्ष पावतील, व्यवसायात यशस्वी होतील. सरकारी रोख्यात डोळे मिटून गुंतवणूक करता येते; मुलांच्या शिक्षणातील गुंतवणुकीस डोळसपणाची नितांत आवश्यकता आहे.

कितीतरी गृहिणी काटकसर करून, नव्या पातळांची खरेदी पुढे ढकलून, शिवण्याचे मशीन ह्प्तेबंदीने विकत घेतात. अशा यंत्राची किंमत त्यावरील शिवणातून लवकरच भरून येते; आणि पुढे तर त्याच्या मूळ किमतीअितका नफा दरसाल मिळू शकतो. गृहिणींना शिवण्याच्या मशीनचे अर्थशास्त्र पूर्ण परिचयाचे आहे. आपल्या देशाचे अुत्पादन वाढविण्यासाठी मोठाले कारखाने अुभारण्याकरिता अद्ययावत यंत्रसामग्रीची आवश्यकता असते. त्यातली बरीचशी परदेशातून आणावी लागते. पण आपली तेथील पुंजी आणि मिळकत अत्यल्प आहे, त्यामुळे चलन पुरत नाही. अशा वेळी सरकार काय करते ? रोजच्या गरजा भागविणाऱ्या अितर जिनसांच्या आयातीस बंदी घालते. त्यामुळे यंत्रांची किंमत देण्याला कूस अुरते. ही यंत्रे आणून बसविल्यावर नवेनवे जिन्नस मोठ्या प्रमाणावर अुत्पादन करू लागतात; आणि कालांतराने आपणास त्याचा मनमुराद अुपभोग मिळू लागतो. मधल्या काळात मात्र थोडी गैरसोय सहन करावी लागते. मशीन टूल्सचे कारखाने तर यंत्रांचीच निर्मिती करतात. त्यामुळे देशाची अुत्पादनशक्ती झपाट्याने वाढते. मशीन टूल्सच्या कारखान्यातील गुंतवणूक देशाच्या संपत्तिसाधनेत फार मोठी भर घालते. आपल्या मुलामुलींच्या शिक्षणात केलेल्या गुंतवणुकीची तुलना मशीन टूल्सच्या कारखान्यातील गुंतवणुकीशीच आपणास करता येअील. कारण, अशा शिक्षणावरील खर्चाने द्रव्यार्जनाची जिवंत मशीन्सच आपण तयार करीत असतो. त्याने कुटुंबात द्रव्याचा झराच वाहू लागतो.

आपण अितके परिश्रम करून, झीज सोसून स्वत:साठी तरतूद न करता आपली मिळकत मुलांच्या शिक्षणावर खर्च करून टाकली; पण त्यांनी पुढे आपल्याला विचारले नाही तर ?– असा प्रश्न कित्येकांच्या मनात डोकावेल. आपल्या मुलामुलींच्या आयुष्याचा अुत्कृष्ट प्रारंभ करून देणे हे पालकांचे कर्तव्यच आहे. त्यांची हलाखी पालकांना पाहवेल तरी का ? आपले कर्तव्य पार पाडल्याचे समाधान काय कमी महत्त्वाचे आहे ? आओवडिलांना मानणाऱ्या मुलांना आर्थिक बळ नसेल, तर आज्ञाधारक मुले असून तरी काय अुपयोग ? जास्त व्याजाच्या आशेने आपली तुटपुंजी बचतही असुरक्षित ठिकाणी गुंतवून मुद्दलही गमावणाऱ्यांची संख्या कितीतरी मोठी आहे. त्यामानाने न विचारणारी मुले निपजण्याचा धोका कमीच आहे. आणि समजा, मुले आओबापांच्या कष्टाला विसरली तरी आपलीच मुले सुखात नांदतील ना ? पैसा पाण्यात तर नाही ना जाणार ? खरे म्हटले म्हणजे आओबापांनी आपल्या त्यागाबद्दल भरमसाट अपेक्षा बाळगली नाही, मुलांच्या संसाराचे ते अर्थमंत्री बनले नाहीत, अनुदानावर त्यांनी समाधान मानले तर मुले योग्य प्रतिसाद दिल्याविना राहणार नाहीत. असाध्य शारीरिक रोगावर ॲलोपथी, होमिओपथी, आयुर्वेद, ह्यांचेच नव्हे, तर मंत्र-तंत्र–प्रार्थनेचे अिलाज आपण करून पाहतो. त्यामानाने आर्थिक दुरवस्थेच्या रोगावरील हा अुपाय निश्चितच आशादायक आहे !

: १९ :

# विसाव्या शतकाच्या अुत्तरार्धातले आम्ही !

अमेरिकेने भारताला देणगीदाखल दिलेल्या ६२ कालवडी आणि २८ वळू न्यूयार्कहून मुंबअीस पाठविण्यात आले. १०,००० मैलांचा हा प्रवास त्यांनी के. अेल्. अेम्.च्या अेअर कन्डिशण्ड डी. सी. ८– विमानातून केला.

जनावरांची अितकी लांब वाहतूक अमेरिका सहज करू शकते, पण पंतप्रधान कै. लालबहादुर शास्त्रींचा देह ताश्कंदहून दिल्लीस आणण्यासाठी रशियाच्या सौजन्याचा आपण फायदा घेतला. त्यांच्या पत्नी श्री. ललितादेवी पतीच्या मृत्यु-स्थानाचे दर्शन घेण्यासाठी मुलाबाळांसह जाअून आल्या त्याही रशियाने पाठविलेल्या विमानातूनच.

विमानवाहतुकीच्या क्षेत्रात अेअर अिंडियाचा लौकिक चांगला आहे. विमानाने प्रवास करणाऱ्या भारतीयांची संख्याही झपाट्याने वाढत आहे. परंतु तेवढ्याने आपण विमानयुगातील आहोत, असे म्हणता येणार नाही. ५०० अुतारूंची सोय करणारी सब-सॉनिक जेट विमाने तर सोडाच, पण साधी विमानेही आपल्या देशात तयार होत नाहीत. परदेशाकडून ती विकत घ्यावी लागतात. त्यांची किंमत आपल्याला परवडत नाही. आणि ती किंमत चुकती करायला परदेशी चलनाची अडचण असते.

थोडक्यात म्हणजे, आमची ही शान परदेशांच्या कृपेवर अवलंबून आहे. अितर देशांनी निर्माण केलेल्या काही आधुनिक साधनांचा काहींनी अुपयोग करणे म्हणजे काही भारताने आधुनिक होणे नव्हे. ज्या विमानतळावर विमाने अुतरतात, तेथील आवारसुद्धा सुरक्षित ठेवले जात नाही. तेथे गुरे चरायला ठेवलेली असतात; आणि विमाने अुतरण्याच्या सुमारास ती त्यांच्या वाटेतून बाहेर पिटाळावी लागतात !

" आता हे विसावे शतक आहे. विसाव्या शतकाचा हा अुत्तरार्ध आहे. आपण वैज्ञानिक युगात आहोत, औद्योगिक अणुयुगात आहोत, अशा प्रकारचे अुद्गार वरचेवर

अैकू येतात. पाश्चिमात्य लोक तसे बोलतात आणि आपण त्यांची री ओढतो अेवढेच. भिंतीवरचे कॅलेंडर १९६९ वर्ष दाखविते, त्याअर्थी आपण त्या सालात आहोत, हे खोटे नाही. पण खरे पाहता आपण पाश्चिमात्यांच्या कितीतरी शतके मागे आहोत ! कुठे त्यांचा अिंद्राचा अैरावत आणि कुठे आमची शामभट्टांची तट्टाणी !

कित्येक पाश्चिमात्य देश आणि जपानसारखा पौर्वात्य देश ह्यांनी कुठल्याकुठे आघाडी मारलेली आहे. त्यांना गाठण्यासाठी आपण जवळच्या वाटा शोधीत आहोत. त्यांच्याकडून यंत्रसामग्री मागवून आपण येथे मोठाले कारखाने अुभारले आहेत; आणि त्यांतून मूलग्राही महत्त्वाच्या जिनसांप्रमाणे ग्राहकाच्या अुपभोगाच्या जिनसाही तयार होअू लागल्या आहेत. तथापि अेकूण लोकसंख्येच्या मानाने हे अुत्पादन काहीच नाही. शेतीने तर आपली अुपासमारच चालवली असून फटफजिती केली आहे.

अितर देश आपल्याला जे काही देतात त्यावरच आपला बराचसा बडेजाव चालतो. आपल्या सुखसोयींचा आणि प्रतिष्ठेचा पाया असा कच्चा आहे. घरोघर रेडिओ लावला जातो, त्यातून बाहेर पडणारा ध्वनी परदेशी यंत्रांनी मुद्रित करून परदेशी ट्रॅन्स्मिटर्सनीच प्रसृत केलेला असतो. ही यंत्रे आहेत म्हणून कु. लता मंगेश-करांचा स्वर आपल्याला अैकायला मिळतो !

चालू युगाला साजेसे अुत्पादन आपण करीत नाही. दुसऱ्या देशांनी केलेल्या अुत्पादनावरच आपली मदार आहे. काही कर्तबगार कारखानदारांचा त्याला भूषणा-वह अपवाद आहे. पण नव्या युगाच्या पुकाऱ्याच्या मानने आपल्यापैकी फारच थोड्यांना विसाव्या शतकाच्या अुत्तरार्धातील समृद्ध जीवन जगता येते. अेखाद्या सावकाराच्या घरच्या आश्रिताने स्वतःला श्रीमंत म्हणविण्यासारखाच हा हास्यास्पद प्रकार आहे. आपण अणुयुगात आहोत, पण अणुयुगाचे नाही.

अेखाद्याने स्वतःच्या मनगटावर भारी किमतीचे घड्याळ बांधले; पण त्यातील वेळ पाहण्याचे कळत नसल्यामुळे त्याने ते अितरांना दाखवून किती वाजले ते सांग-ण्याची विनंती केली, तर आपण त्याला हसतो, त्याची कुचेष्टा करतो. विज्ञानशास्त्रीय अणुयुगातील आपली जवळजवळ तशीच परिस्थिती आहे. म्हणजे नव्यानव्या साधनांची निर्मिती तर राहोच, पण त्यांचा धड अुपयोगसुद्धा करण्याची आपली पात्रता नाही. मोठमोठ्या संशोधन-शाळांनी आयात केलेली मौल्यवान अुपकरणेही त्यांच्या पेटचा न फोडल्या जाता तशीच पडून राहतात, ही परिस्थिती काय दर्शविते ? यंत्रसामग्री नादुरुस्त झाली, तर ती दुरुस्त करूनही आम्ही ठेवीत नाही. भारी किमतीचे कितीतरी साहित्य अशा दुर्लक्षामुळे वाया जाते; आणि त्याचा अुपयोग करता न आल्यामुळे मालमत्तेचे आणि अुत्पादनाचे नुकसान होते ते वेगळेच. म्हणायचे यांत्रिक, युग, पण आम्हाला यंत्रांचा अुपयोग करण्याचे नीट ज्ञानही नाही. कितीतरी ठिकाणी कितीतरी यंत्रे देखाव्यासाठी ठेवून हाताने कामे केली जात आहेत !

आधुनिक युगाचे अेक महत्त्वाचे लक्षण म्हणजे कार्यक्षमता. कमीत कमीमध्ये जास्तीत जास्तीची निर्मिती करणे, ह्यासाठी अुपलब्ध वेळ आणि सामग्री ह्यांचा जास्तीत जास्त कसोशीने वापर करावा लागतो. ह्या बाबतीत आपण अत्यंत मागासलेले आहोत. यंत्रसामग्रीच्या शक्यतेच्या मानाने फारच थोडा फायदा घेणे आणि अेक-मेकांवर अवलंबून असलेली कामे वेळेवारी पार पाडणे हे न साधल्यामुळे आपणांस फार मोठे नुकसान सोसावे लागत आहे. यंत्रांचा आणि मनुष्यबळाचा अधिकात अधिक कार्यक्षमतेने अुपयोग केला तरच गुंतवलेल्या भांडवलाचा पुरेपूर मोबदला मिळू शकतो, हे ज्ञान आणि त्याचा वापर ही आजची महत्त्वाची गरज आहे.

ह्या युगातील सर्वच व्यवहारांना मोठ्या भांडवलाच्या गुंतवणुकीची आवश्यकता असते. हे भांडवल शक्य तितक्या लवकर जमवून काटेकोरपणे वापरावे लागते. ते शक्य व्हावे ह्यासाठी प्रारंभीच्या काळात अत्यंत संयमाची आवश्यकता असते. निर्माण होणारी संपत्ती वेडीवाकडी खर्चली न जाता तिचा संचय करून भांडवल निर्माण करायला हवे. साहजिकच, राहणीचे मान सुधारण्याच्या घाअीचा मोह काही काळ तरी टाळायला हवा. तसे आज घडत नाही. अडाणी लोकांच्या मतावर निवडून येणाऱ्या सरकारला, जनतेला आश्वासने देणे हे राजकीय सत्ता मिळविण्याच्या दृष्टीने जरुरीचे आणि सोयीचे वाटते. परंतु त्यामुळे भांडवलसंचय होअून अुत्पादन पुरेसे वाढत नाही,आणि लोकांच्या अपेक्षांची पूर्तीही होत नाही. त्यांच्या असंतोषामुळे अुत्पादनात खंड पडतो. असे दुष्टचक्र चालू राहते. अिकडे परदेशांची कर्जे वाढत जातात, त्यांच्यावरील व्याज भागविणे अशक्य होते; आणि सावकारी पाश आवळत जातात. ते आवळणे न आवळणे सावकाराच्या दूरदृष्टीवर अवलंबून राहते.

नव्या युगाचे आणखी अेक महत्त्वाचे लक्षण म्हणजे निसर्गावरील आपले अवलंबन कमी करून, त्यावर प्रभुत्व मिळवून त्याला वेठीस लावणे हे होय. ज्या प्रमाणात आपणांस हे करता येअील त्या प्रमाणात आपण नव्या युगाचे कर्ते घटक होअू. पाश्चिमात्य देशातून केवळ कारखान्यांतच नव्हे, तर शेतीमध्येही नैसर्गिक अनिश्चिततेवर मात केली जात आहे. त्यामुळे तेथील माणसे प्रयत्नवादी होतात. प्रयत्न केल्याने यश निश्चित मिळेल, असा त्यांच्यात विश्वास निर्माण होतो. आम्ही पाश्चिमात्यांचे जे अनुकरण करतो,तेही दिखाअू स्वरूपाचे असते, सर्वंकष नसते.नैराश्य आणि दैववाद ह्यांचा मनावरचा पगडा कायमच असतो. कित्येक मोठेमोठे लोक तज्ज्ञांपेक्षा महाराज आणि ज्योतिषी ह्यांच्याच भजनी लागतात. मग सामान्यांची काय कथा ?

संतपण काय आणि समृद्धी काय, जिवाच्या बदलीच मिळू शकते, असे– तुकाराममहाराजांचे सांगणे आहे. जी गोष्ट व्यक्तीला, तीच समाजाला लागू आहे. "जिवावर अुदार, तो लाखांशी झुंजार." नव्या युगाची लक्षणे आत्मसात करून नेटाने संघटित प्रयत्न करणाऱ्या समाजालाच त्या युगाचे फायदे मिळत राहतील. समाजाची ह्या दृष्टीने जागृती करून त्याला दृष्टी देअून कार्यप्रवण करणे ही आपली अत्यंत महत्त्वाची राष्ट्रीय समस्या आहे.

: १६ :

# अनिष्ट हव्यासाची फॅशनेबल प्रतिष्ठा

भारताचा हॉकी संघ युरोपचा आठ आठवड्यांचा दौरा आटोपून लंडनहून मायदेशी १५ जून रोजी परत आला. दिल्लीच्या पालम विमानतळावर कस्टम्स अधिकाऱ्यांनी त्यांचे सामान तपासले, तेव्हा अेका खेळाडूजवळ १७ ट्रॅन्झिस्टर्स आढळले! आणखी ११ खेळाडूंच्या जवळ अशाच चोरटेपणाने आणलेल्या विविध जिनसा सापडल्या. प्रत्येकाजवळील ८०० रुपये किमतीपर्यंतच्या जिनसांना नियमाप्रमाणे जकातीची माफी होती. त्यापेक्षा कितीतरी जास्त किमतीच्या जिनसा या हॉकीपटूंनी लपवून आणल्या होत्या. त्या सर्वांना जादा जकात आणि वैयक्तिक दंड भरणे भाग पडले.

भारताचे प्रतिनिधी म्हणून परदेशी जाणारे क्रीडापटू परत येतात, तेव्हा कस्टमचे अधिकारी त्यांना सौजन्याने, सन्मानपूर्वक वागवतात; त्यांची गैरसोय होअू देत नाहीत. पण क्रीडापटू आपल्या लोकप्रियतेचा गैरफायदा घेतात, नफेबाजीसाठी त्याचा अुपयोग करतात. कारण त्यांनी बरोबर आणलेल्या जिनसांना येथे भरमसाट किंमत येते. आपण आणलेल्या जिनसा ग्रेट ब्रिटनमधील मित्रांनी आणि नातेवाअिकांनी सप्रेम भेट म्हणून दिलेल्या असल्याचे हॉकीसंघाच्या व्यवस्थापकांनी सांगून पाहिले, पण अर्थातच त्यावर विश्वास ठेवला गेला नाही. परदेशी जाणाऱ्या संघाचे व्यवस्थापक म्हणून जाण्यासाठी अहमहमिका चालते, त्याच्या राजकारणामागे असे अर्थकारण असते!

अेखादा युरोपियन किंवा अमेरिकन नागरिक भारतातून स्वदेशी परत जाण्यास निघाला, म्हणजे त्याच्याजवळील वापरलेल्या परदेशी जिनसा विकत घेण्यासाठी हावऱ्या हिंदी लोकांची झुंबड अुडते. अमेरिकेत त्याने ज्या टाअिपरायटरला फक्त

४० डॉलर दिलेले असतात तो येथे त्याला सहज १,००० रुपये मिळवून देतो. येथे मिळणाऱ्या टाअिपरायटर्सपेक्षा तो अधिक चांगला असेलही, पण त्याला अेवढी मोठी किंमत देण्याचे मुख्य कारण अिंपोर्टेड टाअिपरायटर आपल्याजवळ आहे, हे लोकांना दाखविण्यात आणि सांगण्यात वाटणारा विशेष प्रकारचा आनंद.

परदेशातून येणाऱ्या हिंदी लोकांना त्यांच्या ओळखीचे येथील लोक 'आमच्यासाठी अमुक आणा, तमुक आणा' असा आग्रह करतात. त्यांनी स्वतःसाठी आणलेल्या जिनसाही विकत मागतात, जास्त किंमत देअू करतात. अत्यंत गरजेचाच भारतात मिळू न शकणारा अेखादा जिन्नस ह्या रीतीने मिळवू पाहणे वेगळे; आणि केवळ परदेशी बनावटीच्या जिनसांच्या हव्यासासाठी अशी अजिजी करून त्यातून प्रतिष्ठा मिळवू पाहणे वेगळे.

परदेशी जिनसांना 'अिंपोर्टेड' असे बहुमानाने संबोधिले जाते. त्यांचे आकर्षण अेवढे जबरदस्त आहे, की त्यांचा फायदा अुठविणारे पद्धतशीर चोरबाजार, प्रमुख शहरांतून अुघड रीतीने बसलेले आहेत. कायदे, नियम आणि तपासणी चुकवून चोरट्या मार्गाने आलेल्या कितीतरी परदेशी जिनसा तेथे मिळू शकतात. अशा प्रकारे पैदा केलेला ट्रॅन्झिस्टर, कॅमेरा गळ्यात अडकवून आणि मनगटी घड्याळ बांधून कित्येक लोक आपल्या 'कर्तृत्वाची जाहिरात' करीत असतात. अिंपोर्टेड मनगटी घड्याळे ज्यांनी विकत घेतली आहेत, असे दोनचारजण तरी प्रत्येकाच्या माहितीत असतील. फॅशनच्या आहारी गेलेल्या स्त्रियांना 'अिंपोर्टेड' स्ट्रेच कपड्यांनी अक्षरशः आवळून टाकले आहे.

ह्या जिनसांच्या वापरामुळे प्रत्यक्ष मिळणाऱ्या सुखापेक्षा, आपल्याजवळील 'अिंपोर्टेड' जिनसांमुळे अितरांना जो हेवा वाटतो, त्यामुळे स्वतःला होणाऱ्या गुदगुल्याच रोमांचकारक वाटतात. परदेशी मालाची चोरटी आयात आपल्या देशाचे नुकसान करणारी आहे. पण भारताच्या हितास बाधक अशा ह्या प्रवृत्तीला सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. अमेरिकेला, ब्रिटनला जाअून येणारे कित्येक लोक अशा जिनसा तशी परवानगी नसली तरी बरोबर आणतातच; पण जे परदेशी जाअू शकत नाहीत, ते आपला हव्यास चोरबाजारातील खरेदीवर भागवू शकतात; काहींना तर त्याचे व्यसनच जडते.

रुपयाच्या अवमूल्यनामुळे आयात माल आणखी महाग झाला आहे; आणि आयातीवर सरकारने कडक बंधने घातली आहेत. तरीसुद्धा 'अिंपोर्टेड' जिनसांचा हव्यास कमी झालेला नाही. सरकारी बंधने चुकवून आणि परदेशी हुंडणावळ येन केन प्रकारेण मिळवून परदेशी जिनसांची आयात करणाऱ्या टोळ्या भरपूर कमाअी करीत आहेत. कित्येक लब्धप्रतिष्ठित अशा टोळ्यांचे म्होरके असल्याचे अुघडकीस आलेले आहे! त्यांचा हा व्यापार राष्ट्रद्रोही आहे, ह्यात शंकाच नाही. कारण आपली जी परदेशी शिल्लक व हुंडणावळ देशाला अत्यावश्यक जिनसा आयात करण्या-

साठी वास्तविक अुपयोगी पडावयाची, तिचा दुरुपयोग केला जात आहे. पण ह्या चोरव्यापारापेक्षा त्यांचा माल घेणारांचा देशद्रोह अधिक घृणास्पद आहे. कारण त्या निर्लज्जपणाला फॅशनेबल प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

हाच परिणाम काही प्रमाणात भारतीयांच्या अनावश्यक परदेश-प्रवासानेही घडून येत आहे.परदेशी जाणाऱ्या लोकांना तेथे खर्चण्यासाठी परदेशी चलन सामान्यतः दिले जात नाही; तरीसुद्धा कितीतरी स्त्री-पुरुष परदेशचा प्रवास करून येतात. त्यांनी परदेशातील आपल्या प्रवासखर्चाची सोय तेथे केलेली असते, म्हणूनच हे शक्य होते. परदेशातील स्वतःच्याच मालकीचे किंवा स्वतःच्या फर्मच्या मालकीचे किंवा त्यांना अुपलब्ध करून दिलेले पौंड व डॉलर ते वापरतात, हे खरे आहे. पण परदेशी चलनाचा तीव्र तुटवडा असताना केवळ स्वतःच्या चैनीखातर त्याचा अुपयोग करणे सामाजिक हिताचे खासच नाही. सरकारी निर्बंधांना हुषारीने बगल देअून केलेल्या प्रवासाचा आनंद अितरांना कसा कळणार ? ह्या परदेश-प्रवासाची जाहिरात केल्याने त्या आनंदात भरच पडते. वास्तविक हेच पौंड आणि डॉलर अुत्पादक यंत्रसामग्रीच्या खरेदीसाठी कारणी लागायला हवेत.

कित्येक तरुण-तरुणी आता ग्रेटब्रिटन-अमेरिकेत नोकरी करीत आहेत. ते आपल्या आअी-वडिलांना तिकडे काही महिने राहण्यासाठी बोलावतात, त्यांची विमानप्रवासाची तिकिटे तेच काढतात. आअी-वडील परत आल्यावर आपल्या मुलांचे कौतुक करून, आपल्या प्रवासाचे रसभरित वर्णन करून, कृतार्थतेचा आनंद लुटतात. ह्या तरुणांच्या शिक्षणावर भारतात जो खर्च झालेला असतो त्याचाच त्यांना परदेशात भारी पगाराच्या रूपाने फायदा मिळत असतो. त्यांच्या शिलकेचा फायदा त्यांनी आपल्या आअी-वडिलांना अशा प्रकारे मिळवून दिला तर त्यात गैर काहीच नाही. तसाच फायदा देशाला मिळाला तर फार अुत्तम.

श्रीमंत लोक पूर्वी सोन्याच्या स्वरूपात हुंडा देत; मुलीला सुवर्णालंकारांनी मढवून कन्यादान करीत. आता 'अिंपोर्टेड' जिनसांचा हुंड्यात समावेश होअू लागला आहे. "पूर्वी कॅरटस्‌मध्ये हुंडा मोजला जाअी, आता तो अँपिअर्स आणि वॉटस्‌मध्ये मोजला जातो," असे अेकाने विनोदाने म्हटले आहे. मुलीचा संसार माहेराप्रमाणेच 'अिंपोर्टेड' जिनसांनी समृद्ध करण्यासाठी ही योजना केली जाते.

लोकांनी जकात चुकविणे आणि बेकायदा परदेशी जिन्नस आणणे व मिळवणे ह्यास सरकारी मान्यता नसली तरी सरकारी नोकरवर्गाची 'खुषी'ची मान्यता आहे ! वाजवी जकात भरणारा मूर्खातच काढला जातो. कारण तो स्वतःचे आणि सरकारी नोकरांचेही नुकसान करतो. वास्तविक तो सरकारचे म्हणजे समाजाचे पुरेपूर देणे देअून आपले कर्तव्य पार पाडीत असतो. ह्याअुलट, बहुतेक लोक स्वतःचे पैसे वाचवतात, सरकारी नोकरांना खूष करतात आणि सरकारला म्हणजे समाजाला बुडवितात आणि वर पुन्हा प्रतिष्ठेने मिरवितात ! अुत्पादनवाढीसाठी परदेशी जिनसांची आयात करणे वेगळे आणि ओठ रंगविण्यासाठी, शारीरिक शृंगारासाठी व चोचल्यांसाठी, पोकळ प्रतिष्ठेसाठी दुर्मिळ चलनाचा दुरुपयोग करणे वेगळे. देशद्रोहास प्राप्त झालेली ही प्रतिष्ठा जेव्हा नाहीशी होअील तो सुदिन !

: १७ :

# चेक लिहिताना सावध असा

रामभाऊंना राहावयास नवीन ब्लॉक मिळाला आणि तो सजविण्यासाठी त्यांनी वरेच फर्निचर घेतले. कल्पनेपेक्षा ते महाग होते. त्यामुळे अंदाजापेक्षा बिल खूपच जास्त झाले. फर्निचरवाल्याने आपला माल खपला जावा म्हणून "पैसे कुठे जाताहेत? सवडीनं द्या!" असे रामभाऊंना सांगितले आणि रामभाऊंनी दरमहा-काही ठराविक रक्कम त्याला देण्याचे मान्य केले.

पण फर्निचरवाल्याला वक्तशीर हप्ते मिळाले नाहीत, आणि तो रामभाऊं-कडे हेलपाटे घालू लागला. तेव्हा रामभाऊंनी त्याला पुढच्या तारखेचा चेकच दिला, पण तो देताना त्याची रक्कम बँकेत आपल्या खात्यावर आहे किंवा नाही हे त्यांनी पाहिले नाही; नंतरही त्याची व्यवस्था केली नाही. फर्निचरवाल्याने योग्य दिवशी तो चेक आपल्या खात्यात भरण्यासाठी बँकेत पाठवला; पण तो नापास होऊन 'रिफर टु ड्रॉवर' अशा शेऱ्यानिशी परत आला. फर्निचरवाल्याला वसुलीचे आयतेच शस्त्र मिळाले! त्याने तावडतोब आपल्या वकिलाकरवी रामभाऊंना रजिस्टर्ड नोटिस पाठवून फौजदारीचा धाक घातला, तशी ते भानावर आले! तगादा चुकविण्यासाठी दिलेले चेक वटणार नाहीत आणि त्यामुळे आपली पत जाईल, ह्या भीतीने काही अुद्योगपतींनी आत्महत्या केल्याचीही अुदाहरणे आहेत!

चेकबुकाचा अुपयोग विवेकाने, तारतम्याने, सावधगिरीने न करता आल्या-मुळे, चेक लिहिण्यावर बंधन न घालता आल्यामुळे, कित्येक कुटुंबांवर लहान-मोठी संकटे कोसळतात. आता बँकातून कितीतरी नवी खाती अुघडली जात आहेत. ज्यांनी पूर्वी कधी चेकबुक पाहिलेही नसेल, जे कधी बँकेत गेलेही नसतील, अशांच्या जवळ चेकबुके आढळू लागली आहेत. मागचापुढचा विचार न करता ते चेक खरडू लागले आहेत.

दा. क्र. १०२१९

बँका-बँकांमध्ये ठेवींच्यासाठी तीव्र स्पर्धा चालू असल्यामुळे ठेवीदारांना जास्त-जास्त आकर्षणे दाखविली जात आहेत. फक्त ५ रुपयांच्या ठेवीने सेव्हिंग्ज खाते अुघडणारालाही चेकबुक दिले जाते. खिशात पैसे नसताही ते देता येणे; कुणालाही, कुठेही टपालाने पैसे पाठविणे चेकमुळे सोयीचे होते हे खरे आहे. पूर्वी सेव्हिंग्ज खातेदाराला स्वत: बँकेत जाअून पैसे काढावे लागत; त्याला ठराविक रकमेपेक्षा जास्त रक्कम अेका आठवड्यात काढता येत नसे. पैसे काढण्यापेक्षा ठेवण्यावर भर होता. आता अुलट परिस्थिती आहे. "खातेदाराने पूर्वसूचना न देता, कितीही रकमेचे चेक आठवड्यातून दोनदा, वर्षातून १०० वेळा द्यायला हरकत नाही," अशा जाहिराती केल्या जात आहेत. ह्या सवलतींच्या अुत्तेजनामुळे चेकबुक बाळगणारांची संख्या झपाट्याने वाढत आहे.

चेकमध्ये लिहिलेल्या रकमेत व नावात रसायने वापरून बदल किंवा खाडाखोड करून फसवाफसवी करण्याचे व असे खोटे चेक वटविण्याचे प्रकार वृत्तपत्रांतून वरचेवर वाचावयास मिळतात. अशा गोष्टींना आळा घालण्यासाठी व खातेदारांच्या रकमेच्या सुरक्षिततेसाठी, बँका चेकबुकावरच चेकच्या वापराबाबत सूचना छापतात हे खरे आहे. चेकबुक कुलपात ठेवावे, चेक चांगल्या पक्क्या शाअीने लिहावेत, आकडे व अक्षरे ह्यांच्या दोन्ही बाजूंस काहीही कमीजास्त फेरबदल करता येअू नये अशा रीतीने चेक लिहावा, चेक पोस्टाने पाठवावयाचा झाल्यास रजिस्टर्ड पोस्टानेच पाठवावा, शक्यतो क्रॉस व ऑर्डर चेक द्यावा, अित्यादी सूचनांचा अुद्देश दुसऱ्याला काही गैरफायदा करता येअू नये हाच असतो. पण, काही परिस्थितीत, चेकबुकाच्या सोयीमुळे खातेदाराच्याच मन:स्थितीत फरक पडतो; कमकुवत माणूस मोहाच्या आहारी जातो. ह्या बाबतीत त्याला मार्गदर्शन कोण करणार? भयसूचना कोण देणार? कोणत्या परिस्थितीत चेक न देणेच श्रेयस्कर; चेकचा गैर अुपयोग कसा टाळावा अित्यादी गोष्टी खातेदाराला कोण समजावून सांगणार? रोखीच्या अैवजी चेक दिल्याने कधीकधी तोटेही होअू शकतात; चेकबुक हे खातेदाराचा मित्र न बनता हितशत्रूही बनू शकते, हे ज्याचे त्यानेच ओळखून लक्षात ठेवले पाहिजे.

चेकच्या पद्धतीमधील धोक्याप्रमाणे चेक लिहिणाराची मन:प्रवृत्तीही धोकादायक असू शकते. चेक लिहिणे अितके सोपे असते, की काही विचार न करता तो लिहिला जातो. बँकेकडून खाते-अुतारा आल्यावर किंवा चेक नापास झाल्याचे कळल्यावर खातेदाराला चांगलाच धक्का बसतो. "दुसऱ्या कुणाच्या तरी चेकचे पैसे माझ्या खात्यात नावे पडले नाहीत ना?" अशी मग बँकेकडे विचारणा केली जाते. नोटा देताना आपल्याला अवघड वाटते; पैशाची आणि आपली ताटातूट आपण शक्य तो टाळतो. चेकच्या बाबतीत प्रत्यक्ष पैसे गेल्याचे आपल्याला जाणवत नाही. अुधारीने जिनसा घेताना द्रव्य तात्काळ द्यावे लागत नाही. चेक देतानाही ह्याच मनोवृत्तीला आवाहन मिळते; ठरविल्यापेक्षा जास्त पैसेही चेकमुळे आपण खर्चू शकतो; चेकवर



५३८८ निबंध
१८८३ ५/३/७१

मोठी रक्कम लिहिण्याला जास्त श्रमही पडत नाहीत. अुधारी जशी नुकसानकारक तसाच चेकचा व्यवहार घातक ठरण्याचा संभव असतो. अुदाहरणार्थ, कापडाच्या दुकानात रोख पैसे न नेता बरोबर चेकबुक नेले म्हणजे खरेदी वाढलीच म्हणून समजावे. त्यापुढची पायरी म्हणजे आज खात्यात पैसे नाहीत, म्हणून पुढच्या तारखेचा चेक द्यायला सुरवात. दुकानदार असा चेक घेण्यास तयारच असतो.

चेकबुकाच्या फायद्याप्रमाणे तोटयाचीही ही बाजू प्रत्येकाने विचारात घेणे आवश्यक आहे. घरात जिन्नस नसताना तो अुसना आणणे, अुधार आणणे, ह्याच्या धोक्याप्रमाणेच चेकने खरेदी करण्याचा धोका वाढण्याचा संभव आहे. म्हणून, चेकबुकावर नियंत्रण ठेवायला हवे. चेकबुक कारण नसताना खिशात बाळगू नये; घरात नीट कुलपात ठेवावे. जरूर पडेल तेव्हाच ते काढून घ्यावे व परत जागेवर ठेवावे. खात्यात किती पैसे शिल्लक आहेत, ह्याचा बिनचूक हिशेब ठेवावा. काही लोकांना तर चेकबुकातील अेखादा कोरा चेक फाडून घेअून खरेदीला जाण्याची सवय असते. त्यामुळे, तो लिहून दिल्यावर, त्याच्या तपशिलाची घरी नोंद करावयाचे राहून जाते. आपल्या मुलाच्या हाती सही केलेला कोरा चेक देअून त्याला हवे ते घेण्यासाठी बाजारात पाठविणारेही आढळतात; ह्यात तर धोका आणखी वेगळ्याच प्रकारचा असतो.

पिस्तुल, बंदूक अशी हत्यारे वापरण्याचा परवाना अर्ज करील त्याला सरकार देत नाही. ही हत्यारे जबाबदारीने आणि काळजीपूर्वक वापरण्याची अर्जदाराची पात्रता आणि अनुभव आहे किंवा नाही ह्याची आधी चौकशी केली जाते. चेकबुक मात्र कुणालाही मिळवता येते. आत्मघात करू शकणारे हे साधन सुलभ असल्यामुळे त्याबाबत दक्षतेची जाणीव राहात नाही. खातेदाराला आपल्या चेकबुकावर सर्व प्रकारे नियंत्रण ठेवता आले म्हणजे चेकचे सर्व फायदे मिळून गैरफायदे व धोके टळतील. प्रत्येकालाच अधिकाधिक चांगली राहणी हवी असते; आवाक्याबाहेर जाण्याचा अविवेक प्रत्येकात सुप्त असतोच.सवंग चेकबुकामुळे त्याला वाव मिळून नको ते चेक लिहिले जावयाचे ! चेकबुकाचे परक्यांच्या लबाडीपासूनच नव्हे, तर स्वतःच्या मनोगतापासूनही संरक्षण करता आले पाहिजे. "हा चेक लिहिणे खरोखरच आवश्यक आहे का ?" असा प्रश्न स्वतःला विचारून आणि त्याचे अक्कलहुषारीने अुत्तर देअून मगच हातात पेन घेतलेले बरे.

: १८ :

# काळया कातडीच्या पाहुण्यांची अपेक्षा

सिलोनचा संघ विरुद्ध महाराष्ट्र क्रिकेट असोसिअेशनचा संघ, असा क्रिकेटचा सामना पुणे येथे १९६४ च्या अखेर झाला. त्या वेळी पाहुण्या संघाचे आतिथ्य अुचित प्रकारे झाले नाही; त्याची अुतरण्याची व्यवस्थाही समाधानकारक नव्हती, अशी कुरबुर कानांवर आली. सिलोनचा संघ कोलंबो येथे परतल्यानंतर त्याचा कप्तान मायकेल टिसेरा ह्याने ह्या गोष्टीचा स्पष्टच अुल्लेख केला. ह्या प्रश्नाचे महत्त्व क्रिकेटच्या संघापुरते मर्यादित नसून ते अत्यंत व्यापक, दूरगामी आहे.

सिलोनच्या संघाची राहण्याची व्यवस्था महाराष्ट्र क्लब हाअुसमध्येच करण्यात आली होती. त्यामुळे हॉटेलच्या आणि वाहतुकीच्या खर्चात बचत झाली, पण पाहुणे मात्र नाराज झाले. "ह्यापूर्वी आलेल्या अितर देशांच्या संघांची व्यवस्था क्रीडांगणापासून बऱ्याच अंतरावर असलेल्या अत्युत्कृष्ट हॉटेलांतून करण्यात आली होती. त्यांना आणण्या-नेण्यासाठी खास मोटारी सज्ज ठेवलेल्या होत्या. त्यांच्या लंचला घाअी होअू नये, म्हणून अुपाहाराची सुट्टी वाढविण्यात आली होती. ही सर्व आस्था तुमच्या वाटचाला आली नाही, कारण तुम्ही कृष्णवर्णीय– आशियातलेच आहा," असे त्या संघांतील खेळाडूंना सांगणारे काही अुपद्‌व्यापी लोक भेटले तर त्यात नवल नाही. त्यामुळे पुणे शहरातील अन्नतुटवडयाच्या व अितर प्रतिकूल परिस्थितीमुळे आपला नाअिलाज झाला, असा जाहीर खुलासा करण्याची महाराष्ट्र क्रिकेट असोसिअेशनच्या अध्यक्षावर पाळी आली.

पाश्चिमात्य, श्वेतवर्णीयांशी लाचारीने वागण्याची आपली सवय स्वातंत्र्यानंतरही कायम आहे. आशिया आणि आफ्रिका खंडांतील कितीतरी देशांनी गोऱ्यांच्या विरुद्ध लढा पुकारून आता स्वातंत्र्य मिळविले आहे; त्यासाठी लक्षावधी लोकांना हाल-

अपेष्टा सोसाव्या लागून हजारो लोअ प्राणास मुकले आहेत. साहजिकच आपल्या भूतपूर्व गोऱ्या मालकांशी ते मोठ्या अभिमानाने, बरोबरीच्या नात्याने वागतात. आगामी काळ कृष्णवर्णीयांच्या वर्चस्वाचा आहे, अशा आत्मविश्वासाने ते पावले टाकतात. आम्ही मात्र दौर्बल्यामुळे अजूनही गोऱ्या कातडीपुढे मान तुकवतो; आणि काळ्या कातडीला तुच्छ लेखतो, असे दृश्य दिसून येते. खुद्द गोरे लोक आपल्या पूर्वीच्या अंकित लोकांना बरोबरीने वागवू लागले असले, तरी आम्ही मात्र त्या काळ्या लोकांना कमी लेखण्याचे सोडून दिलेले नाही.

काही महिन्यांपूर्वी पुण्यात पाच अमेरिकन विद्यार्थी आणि विद्यार्थिनी वास्तव्यासाठी आल्या होत्या. त्यांना आपल्या घरी बोलावण्याची लोकांच्यामध्ये अहमहमिका चालली होती. त्यांचे पाय आपल्या घराला लागावेत ह्यासाठी वशिले लावले जात होते. पांढऱ्या कातडीच्या, विशेषत: अमेरिकन लोकांच्याजवळ जाण्यास मिळावे ह्यासाठी धडपड चालते, ती पाहून सुसंस्कृत माणसाला घृणा येते. त्यांची ओळख असणे हे आपल्या सुशिक्षितांत अेक प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात आहे. कित्येकांना ते अुत्कर्षाचे अेक संभाव्य साधन वाटते. 'साहेब-मडम येती घरा, तोचि दिवाळी-दसरा' असेच त्यांना वाटू लागते. ह्याअुलट आमच्या देशात आलेल्या आशियाअी व आफ्रिकी पाहुण्यांशी ओळख व्हावी, अेकमेकांच्या संस्कृतीचा परिचय व्हावा, ह्यासाठी आपल्यापैकी कितीजण प्रयत्न करतात ?

अिकडे गोऱ्या परदेशीयांची खुशामत चालू असताना, काळ्या रंगाच्या परदेशीयांची मात्र अुपेक्षा चालू आहे. आज आपल्याकडे कितीतरी आफ्रिकी विद्यार्थी शिक्षणासाठी आलेले आहेत. त्यांतले कित्येक नीग्रो आहेत. त्यांचे पूर्वज साहेबांचे गुलाम होते, म्हणून आम्हीही त्यांना अजूनही कमी लेखतो. वास्तविक, त्यांची आर्थिक परिस्थिती आपल्यापेक्षा खूपच चांगली असते. त्यांचे शिक्षण अुत्कृष्ट दर्जाच्या शाळा-कॉलेजांतून झालेले असते. संधी मिळाली म्हणजे आपण गोऱ्या कातडीवाल्यापेक्षा कोणत्याही बाबतीत कमी नाही, हे त्यांनी सिद्ध केलेले असते. परंतु त्या तरुणांना हिंदी लोकांकडूनही जेव्हा तिरस्काराची आणि अवहेलनेची वागणूक मिळते, तेव्हा त्यांची मन:स्थिती कशी होत असेल, ह्याचा आपण विचारच केलेला बरा. हिंदी लोक गोऱ्या साहेबांच्या पुढेपुढे करताना त्या तरुणांना दिसले म्हणजे त्यांच्या तळव्याची आग मस्तकाला का नाही जाणार ?

रामभाअूंच्या मनात सदूभाअूबद्दल अढी निर्माण झाली, तर ती बाब त्या दोघांपुरतीच राहते. पण आफ्रिकी तरुणाला अेखाद्या हिंदी काडीपैलवानाने अपमानास्पद रीतीने वागवले, तर त्या प्रश्नाला व्यापक राजकीय स्वरूप प्राप्त होअील, हे विसरता कामा नये. आफ्रिकी विद्यार्थ्यांना येथे राहण्यास जागा मिळणे कठीण जाते; त्यांच्याशी कुणी बोलण्यासही तयार होत नाही. त्यांची भरपूर कुचेष्टा केली जाते. त्यांना येथे अुपेक्षित, अेकाकी वाटल्यामुळे ते येथील विद्यार्थ्यांपेक्षा वेगळे वागताना दिसले तर त्याचे कारण लक्षात घेअून त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटायला हवी;

पण होते मात्र अुलट. बहुतेक आफ्रिकी तरुण पाश्चिमात्य संगीताचे आणि नृत्याचे शौकीन असतात. नृत्य-संगीताच्या कार्यक्रमात त्यांच्याबरोबर आमच्या तरुणी हौसेने भाग घेतील, पण आपल्या घरी त्यांना आणण्यास मात्र फारशा अुत्सुक असणार नाहीत. ह्याचा अर्थ त्या तरुणांना काय समजत नाही ?

आफ्रिकी तरुण येथून स्वदेशी परतल्यावर तेथील सरकारी अधिकारी होतात; काहीजण राजकारणात पडून मंत्री होतात; काही तर युनायटेड नेशन्समध्ये आपापल्या देशाचे प्रतिनिधित्व करतात. नव्याने स्वतंत्र झालेल्या कित्येक आफ्रिकी देशांतील अशा महत्त्वाच्या जागी येथून कटू अनुभव घेअून गेलेले आफ्रिकी लोक आहेत. त्यांची संख्या वाढतच आहे. त्या देशातील हिंदी प्रजाजनांचे भवितव्य, आपण ज्यांना वाअीट वागवले अशांच्या हाती असल्यावर, त्यांच्याकडून न्यायाची, नव्हे सहानुभूतीची तरी अपेक्षा आपण का बाळगावी ? संयुक्त राष्ट्र संघटनेत प्रारंभी फक्त चार आफ्रिकी देश होते; आज त्यांची संख्या पस्तीस झाली आहे आणि त्या प्रत्येक देशाला अमेरिका, ग्रेट ब्रिटन ह्यांच्या बरोबरीचे, प्रत्येकी अेकमेक मत आहे. अशा रीतीने जागतिक संघटनेचे निर्णय त्यांच्या मताप्रमाणे होअू लागले आहेत. आफ्रिकी देशांशी मैत्री संपादन करण्याचा चीन कसून प्रयत्न करीत आहे; अशा परिस्थितीत आफ्रिकी लोकांशी तुच्छतेने वागणे किती हानिकारक आहे !

सर्वच परदेशीयांशी आपण जबाबदारीच्या जाणिवेने वागायला हवे. कुणाची लाचारी नको; कुणाची अवहेलनाही नको. स्वतंत्र देशाच्या विवेकी नागरिकाला शोभेल असेच सौजन्य आपण सर्वांनाच दाखविले पाहिजे. आमच्या 'आंतरराष्ट्रीय' संस्थांनी ह्या बाबतीत खूपच सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. भारताच्या शेजारी आणि आजूबाजूच्या कृष्णवर्णीयांची अुपेक्षा करण्यात सुसंस्कृतपणा नाही, दूरदृष्टी नाही, अुलट अशिष्टता आणि देशद्रोह आहे. त्याचे भयानक परिणाम आपणास पुढे भोगावे लागतील.

: १८ :

# छोट्या डायरीची मोठी किमया !

मुंबईचे अेक अुद्योगी गृहस्थ नेहमीप्रमाणे अगोदर वेळ ठरवून अेके दिवशी माझ्याकडे आले. त्यांनी माझ्यासाठी अर्धा तास राखून ठेवला होता. आमचे बोलणे सुरू होते न होते, तोच येथील अेक प्राध्यापक माझ्याकडे आले आणि ते सरळ खुर्ची ओढून घेअून बसले. त्यांचे काहीही काम नव्हते. मुंबअीच्या पाहुण्यांची आणि प्राध्यापक महाशयांची ओळखही नव्हती, तरी काहीतरी बोलायला लागून त्यांनीच आम्हाला श्रोते बनवून टाकले. बिचारे पाहुणे अस्वस्थ होअून अुठले. त्यांनी खिशातील डायरी बाहेर काढून आपले पुढील कार्यक्रम पाहिले आणि पुन्हा येण्याची नवी वेळ निश्चित करून ते निघाले. तरी त्याचा प्राध्यापकमहाशयांवर काहीही परिणाम झाला नाही.

वास्तविक, जो आधी वेळ आणि काम ठरवून येतो त्याला प्राधान्य मिळाले पाहिजे; सहज येणाराने तारतम्य बाळगायला हवे. माझा भिडस्तपणा मुंबअीच्या पाहुण्यांना अन्यायकारक होता, ह्याची मला मागाहून जाणीव झाली. "जे तुमच्या वेळेची, सोयीची कदर बाळगीत नाहीत त्यांना अेवढे जपण्याचे कारण नाही," असे त्यांनी मला पुढच्या भेटीत सांगितले !

नाटकाला किंवा सिनेमाला जावयाचे म्हटले तरी आधी ठरवावे लागते– कितीजण जाणार, कोणत्या शोला जाणार. तीच गोष्ट प्रवासाची. तिकिटे आधी काढूनच ठेवायला हवीत. विवाह करायचा म्हटला, तर आधी कार्यालय निश्चित करून वर किंवा वधू-संशोधन करावे लागते, अशी परिस्थिती येत आहे. कुटुंब-नियोजन करताना केवळ संख्येचे नियमन करून पुरत नाही; बाळंतपणामुळे अैन मोसमातल्या आपल्या शिकवण्या बुडू नयेत, ह्या दूरदृष्टीने शिक्षिकांना आपल्या कुटुंब-विस्ताराचे

नियमन करावे लागते. लहरी गायकांनादेखील रेडिओवर गावयाचे असेल तर, कित्येक महिने अगोदर स्वतःला बांधून घ्यावे लागते, वेळा सांभाळाव्या लागतात, सेकंदांच्या हिशेबात आपली कला बसवावी लागते. आयत्या वेळी काहीही बदल करता येत नाही. योजना आणि तिची तंतोतंत अंमलबजावणी, ही आधुनिक वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, राष्ट्रीय जीवनाची वैशिष्ट्ये झाली आहेत. आपापल्या परिस्थितीप्रमाणे योजना आखून किरकोळ गोष्टीसुद्धा ठरल्याप्रमाणे सुसूत्रपणे करून वेळेचा, पैशाचा आणि साधनांचा जास्तीत जास्त कार्यक्षमतेने अुपयोग करणारेच यशस्वी होतात असे दिसून येते.

मोटारगाडी, टेलिफोन, रेफ्रिजरेटर, टेप-रेकॉर्डर, कॅमेरा, गॅसच्या शेगड्या, प्रेशर कुकर, विजेची अिस्त्री, घड्याळ, फौंटनपेन अित्यादी साधनांच्या समृद्धतेवरून राहणीचा दर्जा मोजला जातो. केवळ साधने आहेत म्हणून काही गोष्डी आपोआप घडत नाहीत. टेबलावर फौंटनपेन आहे म्हणून ते आपोआप लिहू लागत नाही, दाराशी मोटारगाडी आहे म्हणून ती आपोआप मालकाला वेळेवर पोचवत नाही. त्या साधनांची अुपयुक्तता वाढविणारे अेक छोटेसे प्रभावी साधन आहे,आणि ते म्हणजे करावयाच्या गोष्टीच्या नोंदीसाठी डायरी किंवा वही. आज, अुद्या, परवा, पुढच्या आठवड्यात, महिन्यात, वर्षी करावयाच्या गोष्टींची आगाअू नोंद करण्यासाठी ती योजिलेली असते. ह्या डायरीमुळे सर्व नियोजित कामे वक्तशीर, अविलंब, न विसरता पार पाडता येतात; दिलेले शब्द कसोशीने पाळता येतात. सबबी सांगण्याची पाळी येत नाही, अितरांची बोलणी खावी लागत नाहीत, अवहेलना सहन करावी लागत नाही. डायरीतील नोंदीप्रमाणे सर्व गोष्टी वेळेवर करणारा मनुष्य अुद्योगधंद्यात यशस्वी होतो, त्याचप्रमाणे खासगी जीवनातही मान्यता पावतो. किरकोळ गोष्टीही स्मरणपूर्वक करणाऱ्याचे विशेष कौतुक होते.

आपण दिवसभर कुणाला तरी, काही तरी वचने देत असतो; पण त्याप्रमाणे कृती किती जणांच्या हातून होते ? दिलेली वचने विसरल्यामुळे आपले स्वतःचे दुर्वर्तन आपल्या लक्षातच येत नाही. ह्या अज्ञानाच्या सुखात आपण असतो. आपण जे जे बोलतो त्याचे टिपण ठेवून कृती केली, तर " बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाअुले " ह्या तुकाराममहाराजांच्या अुक्तीचा आपल्याला सुखद अनुभव येअू लागेल. मनगटावरील घड्याळाकडे आपण वरचेवर पाहतो, तसेच डायरी वरचेवर अुघडून पाहण्याची सवय करण्याचा हा प्रश्न आहे. ज्याला अेकामागून अेक अशी कामे असतील, त्याला प्रत्येक काम संपताच पुढच्या कामाच्या आठवणीसाठी डायरी अुघडून बघणे अिष्ट ठरेल. अितरांनी दिवसातून दोनदा डायरी पाहिली तरी पुरेल. अशी डायरी ठेवून वापरून पाहा, म्हणजे आपण किती कमी शब्दांचे पालन केले, आपण किती कमी विश्वासार्ह आहो, ह्याची कल्पना येअील.

आधुनिक जीवनात सर्वांचे कार्यक्रम अेकमेकावर अवलंबून असतात; आणि सर्वजण काटेकोरपणे वागले, तरच चक्रे सुरळीत चालतात. ठरल्याप्रमाणे न करणे,

न जाणे, न येणे, सांगितल्याप्रमाणे पत्र न पाठवणे, पैसे न देणे, जिनसा परत न करणे अशा चुका वरचेवर होत असतात. ह्या चुका सहज टळण्याजोग्या आहेत; कारण त्या होण्याला तसे विशेष कारण नसते. त्यावर डायरीचा अुपाय किती सोपा आहे !

डॉक्टर, वकील, बँकर, फर्मचे चालक, विमा व्यवसायी ह्यांच्या खास डायऱ्या असतात. डायरीप्रमाणे न वागणाऱ्या सर्जनचा व्यवसाय चालूच शकणार नाही, डायरीकडे दुर्लक्ष करणाऱ्या वकिलाला आपली सनद गमावून बसावे लागेल, डायरी-बाबत आळस करणारा मॅनेजर बँकेला गोत्यात आणील. अुद्योगी लोक कोणतीही अेंगेजमेंट ठरविण्यापूर्वी आपल्या डायरीचा सल्ला घेतात; आणि अेकमेकाला सोयीची वेळ ठरवून त्याची डायरीत नोंद करतात. अशा रीतीने सर्वांची कामे सुकर होतात; कुणाचाच वेळ वाया जात नाही.

आर्थिक, व्यावसायिक, महत्त्वाच्या गोष्टींपुरताच हा पद्धतशीरपणा मर्यादित करून चालणार नाही. कौटुंबिक आणि सामाजिक यंत्रही सुरळीत चालायला हवे. "वेळ झाला नाही, विसरलो," असे सांगणारा मनुष्य अितरांची गैरसोय करतो, त्यांना नाराज करतो आणि तो स्वतः त्यांच्या मनातून अुतरतो. ज्याला डायरी न वापरताही सर्व गोष्टी करता येत असतील, त्याने डायरी बाळगण्याचे कारण नाही– घड्याळ न बाळगताही वक्तशीर असणारे लोक आहेतच की! पण,डोक्यात सर्वच जंजाळ बाळगण्या-पेक्षा ते डायरीत लिहून ठेवले म्हणजे डोके साफ राहते आणि चालू कामावर लक्ष केंद्रित करता येते, हा डायरीचा फायदा आहे. अिष्ट वेळी जागे करण्यासाठी जसे गजराचे घड्याळ, तशी कर्तव्यांची जाग आणण्यासाठी डायरी.

आपण कितीही गोष्टी ठरविल्या तरी आयत्या वेळी काही अडचणी अुपस्थित होतात. कुणी अचानक येतो, घड्याळात फरक असतो, वाहन लवकर मिळत नाही, स्वतःला विश्रांती हवी असते, काही काम अेकदम अुपस्थित होते. ह्या सर्वाला वाव ठेवूनच अुद्योगी माणसे डायरीची आखणी करतात. त्यामुळे त्यांना आपली कामे अुत्तम रीतीने पार पाडता येतात; यांत्रिक जीवनात विरंगुळ्यालाही स्थान असल्यामुळे तो विरंगुळाही डायरीमुळे मिळत राहतो; कशाचाच अतिरेक होत नाही. ज्यांना हे जमणार नाही, त्यांनी अितरांना व्यत्यय होअील असे तरी वागू नये. पण जे लोक आजच्या जगात केवळ स्वतःच्या सोयीने, लहरीने वागतात ते अितरांना बरेच अुपद्रव-कारक होतात.

: २० :

# नव्या वर्षासाठी नियम : कामाचे नियोजन

सुप्रसिद्ध साहित्यिक चि. वि. जोशी ह्यांचा आणि माझा घरगुती परिचय होता. महिन्यातून अकदा तरी आमची भेट व्हायचीच. दादा घरी नसले तरी वहिनींनी मला बसवून घेऊन आणि खायला-प्यायला काहीतरी देऊन गप्पागोष्टी केल्या नाहीत असे कधीच घडले नाही. दादा आणि वहिनी दोघेही अत्यंत साधे, सात्त्विक, प्रेमळ, सोशिक असल्यामुळे त्यांच्या भेटीची आठवण नेहमीच मधुर असायची.

दादा मृत्यू पावले तेव्हा वहिनींची काय अवस्था झाली असेल, ह्या कल्पनेनेच मी घाबरून गेलो. त्यांना भेटण्यास जाण्याचे मला धैर्यच होअीना. वास्तविक मी हे शक्य तितक्या लवकर आणि वरचेवर करायला हवे होते. पण दररोज त्याची आठवण होअूनही ते अुद्यावर ढकलत गेलो.आता फार अुशीर झाला, ह्या बोचणीमुळे वहिनींना तोंड दाखविण्याचीही मला लाज वाटू लागली. ह्यात अितका काळ लोटला, की अखेर वहिनींना भेटायचे कायमचेच राहून गेले ! मुंबअी येथे त्या निवर्तल्याचे मला समजले. माझ्या ह्या अपराधाचे शल्य मला नेहमीच टोचीत राहते आणि सावध राखते.

असुखावह, गैरसोयीच्या गोष्टी करायला आपण टाळत असतो; आणि ही टाळाटाळ कर्तव्यच्युतीस कारणीभूत होते. आपल्याला ज्यापासून लागलीच फायदा होअील, आनंद मिळेल, करमणूक होअील अशाच गोष्टींकडे आपले लक्ष आपोआप वळते आणि ज्या गोष्टी करताना कोणत्याही प्रकारचे असुख होअील, त्या करायच्या राहून जातात किंवा लांबणीवर पडतात. अेखादा मित्र परदेशयात्रेला निघाला तर त्याला निरोप देण्यासाठी त्याची मित्रमंडळी मोठमोठ्या पार्ट्या देतात, स्टेशनवर पोचवायला जातात, सांताक्रूझ विमानतळावरही निरोप द्यायला मध्यरात्री जातात, त्याला मोठाले हारगुच्छ देतात. पण त्याच्या महायात्रेच्या वेळी त्याचे अंत्यदर्शन घेण्यासही ते राजी नसतात. स्वतःला सुखावह तेवढेच करीत राहणे आणि अितरांच्या

बाबतीतील कर्तव्ये स्वत:ला सुखावह नसतील तर ती टाळणे– ही वृत्ती त्या सर्वांच्या मुळाशी असते. केलीच पाहिजे अशी गोष्ट स्वत:ला रंजविणारी किंवा फायद्याची नसेल तर ती न करण्याला मनुष्य कारणच शोधीत असतो.

"हा टेलिफोन घेतल्यापासून ही नवीनच पीडा झाली आहे. कुणीही ओळखीचा वारला की टेलिफोन आलाच! टेलिफोन नव्हता तेव्हा आपोआप सर्व त्रास टळत असे," असे अेकाने काढलेले अुद्‌गार मला माहीत आहेत. ह्याच टेलिफोनमुळे चहाची, जेवणाची, पार्ट्यांची निमंत्रणे किती वाढली आहेत हे त्याच्या लक्षात येत नाही, लक्षात राहात नाही.

अेका सुप्रसिद्ध अुद्योगपतीने आपल्या सेक्रेटरीला ताकीद देअून ठेवली आहे, की टेबलावर डाक ठेवताना अप्रिय बातम्यांची आणि मजकुरांची पत्रे वर ठेवीत जा. हेतू हा, की अवघड गोष्टींना अग्रस्थान मिळावे, त्यांचा आधी फडशा पाडता यावा; आणि पहिला अर्धा तास थोडा त्रासाचा गेला तरी बाकीचा दिवस चांगला जावा. बहुतेक लोकांचे वागणे ह्याच्या अगदी अुलट असते. त्यामुळेच न केलेल्या कामांच्या गुंत्यात त्यांचा मेंदू नेहमी गुरफटलेला राहतो.

पूर्वी अेकत्र कुटुंबात प्रत्येकाच्या आवडीनिवडीला वावच नसे. कुटुंबातील सर्वजणांसाठी अेकाच प्रकारचा सैपाक असे. पानात वाढलेले सर्व काही प्रत्येकाने खाल्लेच पाहिजे, पानात काहीही टाकता कामा नये– असा दंडक असे. अेखाद्याला अेखादी भाजी आवडत नसली तरी ती त्याला खावीच लागे. त्याने ती पुन्हा फार तर घेअू नये. पानात सर्व पदार्थ वाढून झाल्यावरच जेवण्यास प्रारंभ करावयाचा असल्यामुळे न आवडीचा पदार्थ पहिल्यादुसऱ्या घासातच संपवून टाकणाराला जेवणाचा आस्वाद घेणे शक्य होअी.

मेजवानीत मागच्या भातानंतर खीर वाढण्याची पद्धत आहे. पाश्चिमात्य जेवणातूनही शेवटी डेसर्टचा कोर्स असतोच. रोजच्या जेवणात असे नसले तरी जेवणारा त्याची व्यवस्था करतो. भाकरीबरोबर वाढलेले लोणी पुरवूनपुरवून भाकरी संपल्यावर शेवटी तोंडात विरघळविणारे दूरदृष्टीचे असतात. तोंडी लावणे आधी संपवून टाकून भाकरीचे घास गिळण्यासाठी पाण्याचे घोट घेणाऱ्यांना जेवणातील गोडीला मुकावे लागते; कारण त्यांच्या जेवणाचा शेवट सुखकारक होत नाही. न आवडणारी भाजी पहिल्या भाताच्या वेळी संपवून लोणी शेवटी राखणे, हे भोजनाच्या आस्वादाचे रहस्य आहे.

कामाच्या आणि कर्तव्याच्या बाबतीत हाच नियम लागू करायला पाहिजे. त्यांची यादीच तयार करून ती आपल्या नजरेसमोर ठेवायला पाहिजे. म्हणजे आपण योग्य अनुक्रमाने ती संपवू शकतो. अशी यादीच नसेल तर आपण आठवण होअील तसे करीत जातो आणि अप्रिय गोष्टी आपोआपच करायच्या राहून जातात. यादीमधील सर्व कामे संपविता आली नाहीत तरी हरकत नाही. अुद्याच्या यादीत त्यांचा समावेश करता येअील. अुद्याही ती संपविता आली नाहीत तर परवा, तेरवा ती करता

येतील. नेहमी ती नजरेसमोर राहिली म्हणजे पार पाडण्यास विलंब होत आहे हे लक्षात येते. चालढकल केली तरी त्याची जाणीव होत राहते, आणि आवश्यक आणि अिष्ट गोष्टी करून टाकण्याची सवयच लागते. कृतीसाठी अशा टिपणांचा फारच अुपयोग होतो.

जेव्हा अेखाद्याच गोष्टीची आठवण व्हायला हवी असते तेव्हा अुपरण्याला किंवा पदराला खूणगाठ बांधली तरी पुरते. पण अनेक कामे करावयाची असली म्हणजे त्यांची लेखी नोंद करून तिच्यावरून वारंवार नजर फिरविणे आवश्यक ठरते. ह्यासाठी पेन्सिलीचा किंवा फाअुंटनपेनचा वापर जेवढा जास्त तेवढी शिल्लक कामे कमी, असे म्हणायला हरकत नाही. रोजचा जमाखर्च आणि हकीगत लिहिण्याची रोजनिशी अेवढाच बहुतेकजण डायरीचा अुपयोग करतात. पुढील कामांच्या तपशीलवार नोंदीसाठी अुपयोग करणारे फार थोडे आढळतात. अशा खुणांमुळे आपण स्वतःचे हित साधून भलेपणाही कमावू शकतो.

आजाऱ्याला ठराविक वेळी ठराविक औषधे देण्यासाठी वेळापत्रक तयार करून ठेवतात; घड्याळाला किल्ली देण्याचा वार घड्याळावर लिहून ठेवतात; मग ठराविक दिवशी व वेळी ठराविक कामे करण्यासाठी त्यांची नोंद करण्यात कमीपणा कसला? चालढकलीचे धनी होण्यापेक्षा कार्यतत्परतेचे चाकर झालेले बरे.

नव्या वर्षासाठी काहीतरी अुपयुक्त नियम करण्याची पद्धत फार चांगली आहे. तेव्हा अेक छानपैकी डायरी विकत घेअून, करावयाची कामे तिच्यात मांडण्याचा नियम सर्वांनी करण्याजोगा आहे. ह्या नियमामुळे कितीतरी पाप टळण्यास आणि पुण्य प्राप्त होण्यास मदत होअील. जुने लोक पंचांग बघून नव्हते का स्वतःच्या अेकादशा नि चतुर्थ्या करीत?

: २१ :

## घाअी नको पण गती हवीच !

रात्री आठच्या मेलने आम्ही निघणार होतो. जागा आधीच रिझर्व्ह केल्या होत्या. त्यामुळे स्टेशनवर लवकर जाण्याचे काही कारण नव्हते. आम्ही साडे-सातच्या सुमाराला घरातून निघून रस्त्यावर येतो, अितक्यात अेक रिकामी टॅक्सी दिसली ती थांबवून आत बसलो. "स्टेशनकडे घ्या. टॅक्सी सावकाश जाअू दे बरं का! गर्दीच्या वेळेला अुगीच घाअी नको." आम्ही टॅक्सीवाल्यास सूचना दिली.

टॅक्सी सुरू झाली. रस्त्यावरील वाहने आणि पादचारी ह्यांच्या जंजाळातून टॅक्सीवाला मोठ्या सफाअीने मार्ग काढून पुढे जाअू लागला. आमच्या टॅक्सीच्या पुढे अेक खासगी मोटारगाडी चालली होती. तिच्यापुढे जाण्याचा टॅक्सीवाला प्रयत्न करू लागला. "त्याच्या मागून जाअू दे की आपली गाडी" असे आम्ही टॅक्सीवाल्याला सांगितले. त्याने आमचे म्हणणे अैकले पण आमच्या मागाहून येणाऱ्या कितीतरी मोटारवाल्यांनी आमच्या टॅक्सीच्या पुढे आपल्या गाड्या घुसवल्या आणि आम्ही पार मागे राहिलो.

अेका चौकाच्या तोंडाशी येताच, तेथील हिरवा दिवा बंद होअून लाल दिवा लागला, आणि आमच्या टॅक्सीला थांबणे भाग पडले. आम्हांला मागे टाकून पुढे गेलेल्या गाड्या चौक ओलांडून पसार झाल्या होत्या. आम्ही घड्याळाकडे पाहिले, तेव्हा अुशीर होत चालल्याची जाणीव होअून टॅक्सीवाल्याला विचारले, "किती वेळ अिथं थांबावं लागणार आपल्याला ?" त्याने अुत्तर दिले, "ह्या टाअिमाला ट्रॅफिक फार असतो. त्यामुळं नेहमीच अिथं खोटी होते. तुम्हीच मला सावकाश चलायला सांगितलं. नाहीतर अेव्हाना आपण स्टेशनला पोचलोही असतो." टॅक्सीवाल्याने आम्हांला निरुत्तरच केले.

पुन्हा हिरवा दिवा लागून टॅक्सी चालू झाली तसा आमचा जीव भांड्यात पडला. पण थोडे पुढे जातो, तो रस्त्याची अेक पट्टी दुरुस्तीसाठी खणून टाकलेली होती. त्यामुळे अुरलेल्या पट्टीतूनच वाहनांना जावे-यावे लागत होते. आम्ही म्युनिसिपालिटीला शिव्या देअू लागलो तशी टॅक्सीवाला म्हणाला, "अहो, अेवढ्या मोठ्या शहरात कुठंतरी दुरुस्ती नेहमी चालू असायचीच. आमचा रोजचा अनुभव आहे ना!"

आमची गाडी चुकणार की काय, अशी भीती आता आम्हांला वाटू लागली आणि टॅक्सीवाल्याला आम्ही शॉर्ट कटचा जवळचा रस्ता सुचवला. "तो वन् वे मार्ग आहे. त्यात आपल्याला ह्या बाजूनं नाही प्रवेश करता यायचा!" असा टॅक्सीवाल्याने खुलासा केला. जरा पुढे जातो, तो वाहनांची अेकच गर्दी झालेली आम्हांला दिसली. टॅक्सीवाल्याने ब्रेक लावून गाडी अुभी केली. वाटेत अेक बस पडून तिने रस्ता आडवला होता, "अितक्या हजारो गाड्या रस्त्यावरून अेकसारख्या पळत असतात. त्यांतल्या काही गाड्या अशा सिक पडायच्याच!" टॅक्सीवाल्याने निर्विकारपणे सांगितले. ते सगळे खरे असले, तरी घड्याळाचे काटे फिरायचे कुठे थांबले होते? आगगाडी आमची वाट थोडीच पाहणार होती?

अगदी आठच्या ठोक्याला आमची टॅक्सी स्टेशनात प्रविष्ट झाली आणि आमच्या डोळ्यांदेखत मेलगाडी सुटली. टॅक्सीतून न अुतरताच आम्ही माघारी निघालो. तिकिटांचा रिफंड मागायचे भानही आम्हांला अुरले नव्हते. टॅक्सीवाल्यानेच बोलायला सुरवात केली. तो म्हणाला, "साहेब, आम्ही टॅक्सीवाले अुगीच नाही पुढं जाण्यासाठी धडपडत! हिरवा दिवा केव्हा बंद होअील आणि तांबडा दिवा लागेल ह्याचा नेम नसतो. त्याचप्रमाणे, तांबड्याचा हिरवा होण्याची संधी सगळ्यांच्या आधी पकडायची. आम्ही जर आरामानं घेतलं, तर चालायचंच नाही. रोज शेकडो प्रसंग येणार.

"अेक गोष्ट मात्र कधीच विसरायची नाही. ती म्हणजे वाहतुकीचे नियम. हे नियम मोडायचे नाहीत, वेगमर्यादा पाळायची, दुसऱ्या गाडीला अुगीच अडवायचं नाही. जास्ती वेगाच्या गाडीला पुढं जायला वाट द्यायची. पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी ठेवलेल्या जागी जरूर तर गाडी थांबवायचीसुद्धा. दुसरे निष्काळजी, बेफिकीर असले तरी आपण आपली शिस्त सोडायची नाही. हे सगळं सांभाळून, अॅक्सिलरेटरवरचा पाय मात्र कधी सोडायचा नाही. मोटार थांबवावी लागली तरी अेंजिन बंद पडू द्यायचं नाही. क्लच सोडला की गाडी सुरू झाली पाहिजे. अुजवा पाय नेहमी ब्रेकवर ठेवायचा. जलद जायचं तर जरूर पडताच गाडी अेकदम अुभी करता आली पाहिजे. म्हणजे वेगानं जाण्यातही धोका अुरत नाही. तुम्ही मला टॅक्सी हळू चालवायला सांगितली नसती तर तुमची गाडी चुकली नसती."

रस्त्यावरच्या रहदारीत आपण प्रत्येक खेपेला मागे राहू लागलो, तर आपला क्रम शेवटीच लागायचा. जीवन हे स्पर्धामय आहे. ही स्पर्धा तीव्रतर होत आहे. अितर सर्वजण स्वतःचे घोडे पुढे दामटीत असताना, आपण तसे केले नाही तर यश कसे

मिळणार? अर्थात त्यासाठी गैरप्रकारांचा अवलंब करायचा नाही हे गृहीत आहे. कायदे आणि नीतिनियम ह्यांनी ज्या सवलती दिल्या असतील त्या घेणे आवश्यकच आहे. त्या बाबतीत गाफील राहून चालणार नाही.

आपल्या अुद्योगधंद्यातच नव्हे, तर अितर व्यवहारांतही– सामाजिक जीवनातसुद्धा आपण अज्ञानाने, चुकीच्या माहितीने, आळसाने किंवा बुजरेपणाने विनाकारण मागे राहतो; आणि मग अितरांचा अुत्कर्ष झाला म्हणजे त्यांच्या नावाने बोटे मोडतो. सुरवातीपासूनच प्रत्येक संधी साधली तर वाटेतील अडथळ्यांची भीती वाटत नाही. पण प्रथम आरामाने घेतले तर मात्र पुढे भरपाअी करायला वाव अुरत नाही. करण्याजोगे काम करून संपविणे, अुद्याचे काम आज आणि संध्याकाळचे काम सकाळी पुरे करणे, काम साठू न देणे अशा पद्धतीने आचार असल्यावर यशाची खात्री वाटते.

जीवनातल्या सुसंधी कुणाच्या वाट्याला येतात? जो सुसज्ज असतो त्याच्या! जो आयुष्याच्या पूर्वार्धात प्रत्येक कण आणि क्षण कारणी लावतो तोच अुत्तरार्धात त्याची गोड फळे चाखू शकतो. बुद्धिबळाच्या खेळात अखेरी कुणाला साधते! जो पहिल्या खेळापासूनच सावध असेल त्याला! यशस्वी जीवनाला मोटार हाकणारापासून पुष्कळच शिकण्याजोगे आहे.

घरातून बाहेर पडणाऱ्याला वडीलधारी माणसे 'जपून जा' असा अुपदेश करतात. दक्षतेने जा, काळजीपूर्वक जा, ह्या अर्थाने तो अुपदेश योग्यच आहे. पण त्यामुळे गती कमी होण्याचे कारण नाही. रेंगाळत जाणे चुकीचे ठरेल. घाअीने जाण्यातील धोका जरूर टाळायला हवा. त्याचबरोबर गती राखण्याचाही प्रयत्न करायला हवा. जेट विमानातला प्रवास जलद होतो तसा तो सुरक्षितही असतो, ह्याचे रहस्य अुमगले म्हणजे नव्या जीवनातील घडी नीट बसविता येअील.

: २२ :

## तक्रार सांगायला पुढे या!

मुंबईमधील अेका फौजदारी कोर्टात नुकतीच घडलेली ही गोष्ट आहे. अेका आरोपीने लपवून आणलेले चपाती-भाजीचे पुडके मॅजिस्ट्रेटपुढे सोडले. "पोलिसांच्या कैदेत असलं भिकार अन्न आम्हांला खायला देण्यात येतं! ते खायला जनावरंसुद्धा तयार होणार नाहीत. वास्तविक, अन्नखर्चासाठी सरकारने प्रत्येकी १ रु. २५ पैसे मंजूर केलेले आहेत." अशी त्याने मॅजिस्ट्रेटकडे तक्रार करून दाद मागितली. मॅजिस्ट्रेटने पोलीस-अधिकाऱ्याला खुलासा विचारला. यावर पोलीस-अधिकाऱ्याने सांगितले, आरोपींना जेवण पुरविण्याचं काम कंत्राटानं दिलेलं आहे. "वाओीट जेवण न देण्याची त्या कंत्राटदाराला सक्त ताकीद द्या." असे मॅजिस्ट्रेटने पोलीस-अधिकाऱ्याला फर्माविले आणि आरोपीची जामिनावर मुक्तता केली.

कैद्यांच्याअितकेही स्वतःच्या हक्कांबद्दल स्वतंत्र नागरिक जागरूक नसतात, असे म्हणावे लागते! बंडोपंतांनी आपले पासबुक बँकेतून भरून आणले, पण त्यांना त्यातले अेक अक्षरही लागेना. कारण, बँकेच्या कारकुनाचे अक्षरच तसे दिव्य होते. बहुसंख्य खातेदारांची अशीच अडचण होते; आणि बँकेच्या मॅनेजरला ती कळविण्याची तसदी घेणारे फारच थोडे असतात. ह्या सहिष्णुतेमुळे, वाओीट हस्ताक्षराच्या कारकुनांना ताकीदही मिळू शकत नाही. शंभरातल्या पाच खातेदारांनी जरी वरपर्यंत तक्रार नेली तरी तिचा अुपयोग झाल्याविना राहणार नाही. निदान नवे कारकून नेमताना तरी त्यांच्या हस्ताक्षराच्या सुवाच्यपणाबद्दल खात्री करून ते नेमले जावेत. आपल्या खातेदारांची अडचण होअू नये, तिचे निवारण व्हावे, अशीच बँकेच्या चालकांची अिच्छा असते. त्यांचे हात बळकट करायला अशा तक्रारींचा फार अुपयोग होतो.

हॉटेलातील अस्वच्छता, खाद्य-पेयात आढळणारे खडे, कचरा, प्राणी अित्यादीं-बद्दल तेथील नोकराला बोलून अुपयोग होत नाही, मालकापर्यंत ती तक्रार पोचत नाही. पण गिऱ्हाअिकाने मालकाची गाठ घेण्याची तसदी घेतली, त्याच्या कानांवर ही हकीकत घातली तर तो सुधारणा करण्याचा प्रयत्न केल्याविना राहणार नाही. "गिऱ्हाअिकांचा संतोष हाच आमचा फायदा" अशी पाटी कित्येक दुकानांतून आढळते. नोकरांना गिऱ्हाअिकांच्या तक्रारींची कटकट वाटली तरी खरा धंदेवाला अुणिवा निदर्शनास आणणारांचे आभारच मानतो.

विजयरावांनी शिंप्याकडे शर्ट शिवायला टाकला, तेव्हा त्यांनी कॉलर, खिसा, कफ, बटने अित्यादींबाबत केलेल्या सूचना शिंप्याने लिहून घेतल्या. पण प्रत्यक्ष शर्ट बेतताना आणि शिवताना त्यांकडे दुर्लक्ष झाले. अितकेच नव्हे, तर मापेही चुकली. "दुरुस्त्या करून देतो." म्हणून शिंप्याने सांगितले, पण विजयरावांनी ते मान्य केले नाही. तेव्हा, दुसरे तसलेच कापड घेअून नव्याने शर्ट शिवून देण्याची शिंप्याने तयारी दाखविली. परंतु प्रत्यक्ष तसे न करता, तोच शर्ट दुरुस्त करून दिला. ही त्याची मखलाशी विजयरावांच्या लक्षात आली, हे शिंप्याने ओळखले आणि मग तो म्हणाला, "साहेब, शर्ट अेकदा भट्टीला जाअून आला, म्हणजे सगळा साफ होअील बघा. गॅरंटी आहे माझी!" शिलाअीचा चार्ज सोडून देण्याचा दिलदारपणाही त्याने दाखविला. शेवटी, विजयरावांचाच पराजय झाला. त्यांनी तो शर्ट पत्करला आणि शिलाअीही देअून टाकली. "शिंपी ज्याला त्याला आपल्याविरुद्ध तक्रार सांगून आपली बेअब्रू करायचा." असे त्यांना वाटले. आपली तक्रार तर दूर होणार नाहीच पण आपण तक्रारखोर ठरू आणि आपल्यालाच जास्त त्रास होअील, ह्या कल्पनेने बहुतेक लोक माघार घेतात; त्याला चांगुलपणाचे स्वरूप देअून समाधान मानतात.

ठरल्याप्रमाणे जिन्नस किंवा सेवा मिळाली नाही तर ती नाकारण्याचा खंबीर-पणा आपण जोपर्यंत दाखवू शकत नाही तोपर्यंत गिऱ्हाअिकांना संतोष मिळणे कठीण. योग्य तक्रारींचा पाअूस पडला तरच त्याचा काहीतरी अुपयोग होणार. आपण अेक-मेकाशी बोलताना सरकारी कारभारावर खूप टीका करतो. ठिकठिकाणच्या गैर-व्यवस्थेवर कोरडे ओढतो. पण त्याबाबत जरूर तेथे मात्र मूग गिळून बसतो. आपल्या धुसफुशीला काही विधायक स्वरूप प्राप्त होतच नाही.

सामान्यतः कोणीही जबाबदार अधिकारी रास्त तक्रारीकडे दुर्लक्ष करणार नाही. पण त्याच्यापर्यंत तक्रार पोचली तर पाहिजे! लोकांच्या अडचणींना, गैर-सोयींना, अन्यायाला योग्य प्रकारे वाचा फुटायला हवी. लोकमत बोलके व्हायला पाहिजे. त्याचा आवाज वरपर्यंत जायला हवा. अेकमेकांतील कुजबूज काय कामाची? व्यक्तींना स्वतंत्रपणे फारसे करता येणार नाही, तरी त्यांनी तारतम्य बाळगून जरूर तेथे आणि अिष्ट त्या प्रकारे तक्रार मांडायलाच हवी. अेकट्या व्यक्तीच्या सोयी-गैरसोयीचा हा प्रश्न नाही. त्याला व्यापक सामाजिक महत्त्व आहे. सार्वजनिक कर्तव्य-बुद्धी आणि अव्यापारेषु व्यापार ह्यांतील फरक मात्र लक्षात ठेवला पाहिजे.

माझ्या काही मित्रांनी ह्या बाबतीत केलेला अुपक्रम अनुकरणीय आहे. आपल्या हातून आपल्या कुवतीप्रमाणे थोडीफार सेवा घडावी ह्या तळमळीचा तो सुपरिणाम आहे. सार्वजनिक स्वरूपाच्या तक्रारी संबंधित ठिकाणापर्यंत पोचविण्यासाठी त्यांनी अेक छोटेसे मंडळच काढले आहे. प्रत्येक आठवडचाला ह्या मंडळाची सभा भरते त्या वेळी सभासदांनी जमविलेल्या आणि त्यांच्याकडे आलेल्या तक्रारींची छाननी करण्यात येते. त्या तक्रारींचा तपशील जमा करण्यात येतो. अमक्या ठिकाणचा रस्त्यावरील दिवा जळून गेलेला आहे, अमक्या ठिकाणची पाटी पुसून गेल्यामुळे वाचता येत नाही, अमका सार्वजनिक नळ फुटल्यामुळे आजूबाजूला चिखल होतो, अमक्या कचेरीतला अमुक कारकून अुर्मटपणे वागतो, अमक्या कचेरीत कामाला फार अुशीर लागतो, अशा कितीतरी तक्रारी ह्या मंडळाने संबंधित अधिकाऱ्यांपुढे मांडून त्या दूर करण्यात यश मिळविले आहे. मंडळाने आपल्या नावाचे नोटपेपर छापून घेतले आहेत. त्यावर तक्रार लिहून पाठवली, म्हणजे तिचे निवारण होण्यास प्राधान्य मिळते; तक्रार नाहीशी झाल्यावर आभाराचे पत्र पाठविण्यासही मंडळ विसरत नाही. त्यामुळे मंडळाच्या तक्रारी खोटचा असणार नाहीत, असा विश्वास निर्माण झाला आहे. तक्रार निवारण्यासाठी केवळ सेवेच्या हौसेने केलेली ही साधी संघटना कितीतरी अुपयुक्त कार्य करू शकते.

अन्याय सहन करणारांना न्याय आपोआप मिळत नाही, त्यांची रीतसर मागणी योग्य त्या न्यायालयात करावी लागते. भलत्या कोर्टात फिर्याद दाखल करून चालत नाही. अडचण, गैरसोय, पंचायत, फसवणूक, दिरंगाअी अित्यादींच्या तक्रारीसही तेच लागू आहे. ह्या तक्रारीही योग्य त्या जागी, योग्य प्रकारे दाखल कराव्या लागतात, तरच त्यांचे निवारण होअू शकते. अनास्था, अनुत्साह, आळस आणि भीती ह्यांनी समाजाला ग्रासले आहे. दाद मागण्यास लागणारे किमान मनोधैर्यही कित्येकांजवळ नसते. त्यामुळे तक्रार कुठे, कशी नोंदावी हा पुढचा प्रश्न अुपस्थित होत नाही. तक्रारींसाठी कचेऱ्यांतून ठेवलेल्या पेटचा आणि कम्प्लेंट बुके ह्यांचा अुपयोग फारसा केला जात नाही. असंतोषाच्या मानाने प्रत्यक्ष तक्रारी फारच थोडचा गुदरल्या जातात-साहजिकच कर्तव्यशून्यांचे फावते, बेजबाबदारांना मैदान मोकळे मिळते, गैरकारभार आणि गैरव्यवस्था ह्यांना आळा बसत नाही; व्यक्ती अधिकच असहाय होअू लागतात. ती मुकी मेंढरे बनतात. फिर्यादच नसल्यावर दादपूस अशक्य आहे. ह्यासाठी तक्रारींना हे आवाहन !

:२३:

## सुट्टीत शेतकऱ्यांचे पाहुणे व्हा!

पुणे शहरापासून १७ किलोमीटर अंतरावर असलेल्या चिंचवड गावाशेजारी आमच्या अेका मित्राने शेती केली आहे. पवना नदीकाठच्या आपल्या शेतात त्याने नदीचे पाणी पंपाने खेचून खेळवले आहे, आणि धान्याप्रमाणे द्राक्षांचीही लागवड केली आहे; कोंबड्या पाळल्या आहेत. ही शेती पाहण्यासाठी आम्ही काही मित्र-मंडळी गेलो होतो. "अुन्हाळ्याच्या सुट्टीत अशा शेतावर काही दिवस राहण्याची सोय झाली, तर किती बरे होअील!" असे कोणीतरी म्हणाले आणि त्यावर चर्चा सुरू झाली.

"अिथं जागा भरपूर आहे. खाण्यापिण्याची पंचाअीत नाही. कुणी राहण्यास आले, तर त्यांची सोय करण्याची माझी तयारी आहे. त्यामुळे आम्हांलाही नव्या मंडळींचा परिचय होअील, नव्या विषयांवर गप्पा मारायला मिळतील," असे शेत-करी मित्राने सांगितले.

त्यानंतर काही दिवसांनी आम्ही अुरुळीला गेलो; तेथील शेतकरी मित्रानेही अशीच तयारी, नव्हे अुत्सुकता दर्शविली.

अुन्हाळ्याच्या सुट्टीत शहरापासून दूर, शांत अशा ठिकाणी जाअून राहण्याची अिच्छा शहरी लोकांना होत असली तरी त्याप्रमाणे प्रत्यक्ष जाणे फारच थोड्या जणांना शक्य होते. बहुतेकांचे मनातले बेत मनातच राहून जातात. थंड हवेच्या ठिकाणी हॉटेलात जाअून राहणे परवडत नाही; सरकारी हॉलिडे कॅम्पसमध्येही जागा मिळणे कठीण जाते आणि त्यामुळे पालट म्हणून कुठे जाण्याची अिच्छा असूनही त्याच त्या वातावरणात, कंटाळ्यामध्ये सुट्टी घालवावी लागते. कुटुंबातली अेखादी व्यक्ती फार तर काही दिवस परगावी जाअून येते. सुट्टीत नातेवाअीकांना राहण्यासाठी बोलावण्याची पद्धत आता बंद पडली आहे. जागेचा तुटवडा आणि महागाअी ह्यांचा तो अपरिहार्य परिणाम आहे. सुट्टीमध्ये मुलांना अेकमेकांकडे राहण्यास पाठविणे अशक्य होअून बसले आहे.

शहराच्या दाटीतून आणि रोजच्या कटकटीतून थोडा काळ तरी बाहेर पडण्याची गरज तीव्रतेने भासत असल्यामुळे, बाहेर पडण्याचे नवे मार्ग आता शोधावयास हवेत. ग्रामीण भागातून कितीतरी ठिकाणी शेतमळे निर्माण झाले आहेत आणि तेथे अनेक सोयी अुपलब्ध झाल्या आहेत. वीजपुरवठ्यामुळे आणि अेंजिनांच्या वापरामुळे खेडे आणि शहर ह्या दोन्हींचे कित्येक फायदे तेथे अेकत्रित झाले आहेत. निसर्गाचे सान्निध्य, हवापाणी, भाजीपाला, धान्यपुरवठा अित्यादी खेडेगावाची वैशिष्ट्ये तेथे मनमुराद अुपभोगण्यास मिळू शकतात. वाहतुकीच्या साधनांमुळे शहरही दूर नसते. त्यामुळे शहरी लोकांना अशा शेतमळ्यांवर अुन्हाळ्यात जाअून राहणे सोयीचे आणि आनंदाचे झाल्याविना राहणार नाही. शहरी लोकांचा शेतकरी जीवनाशी संबंध अुरलेला नाही, तो त्यामुळे प्रस्थापित होण्यास मदत होअील. शेतकऱ्यांचे व खेडेगावांतील लोकांचे जीवन शहरी लोकांना जवळून अवलोकन करण्यास मिळेल आणि बरेचसे गैरसमज दूर होतील. भारतापुढील समस्यांचे प्रात्यक्षिक त्यांना पाहावयास मिळेल, बऱ्याच नव्या गोष्टी शिकावयास मिळतील आणि दृष्टिकोन अधिक वास्तव होण्यास मदत होअील. शेतावरील लोकांनाही शहरी लोकांकडून नव्या गोष्टी शिकायला मिळतील. त्यांनाही नेहमीच्या वातावरणापेक्षा थोडे नवे वातावरण अनुभवण्यास मिळेल. शहरी लोकांचा खेडेगावांतील लोकांशी जेवढा जास्त संबंध येअील, तेवढे सर्वांच्याच दृष्टीने श्रेयस्कर ठरेल. शेतावर जाअून राहणाऱ्या शहरी लोकांना तेथील गोष्टींची गोडी लागण्याचाच अवकाश, ते दरवर्षी आल्याखेरीज राहणारच नाहीत. गायी-म्हशींच्या वासरांशी खेळणे, तट्टावर बसणे, पाण्यात डुंबणे, मोट हाकणे, वाफ्यांना पाणी देणे, फवाऱ्याने औषध अुडविणे, पक्षी पाहणे, झाडांवर चढणे, धार काढणे, जमिनीवरून अनवाणी चालणे ह्यातील सौख्याची कल्पना अनुभवाखेरीज येणारच नाही.

प्रारंभी सांगितलेल्या चिंचवड आणि अुरुळी येथील शेतवाड्यांप्रमाणे अनेक शेतवाड्या ठिकठिकाणी आहेत; आणि त्यावर अेखाद-दुसऱ्या कुटुंबाची राहण्याची सोय सहज होअू शकेल; असलेली सोय वाढविता येअील. अेकेका कुटुंबाला अेक आठवडा, ह्या हिशेबाने अशा शेतवाडीवर अुन्हाळ्यात पाच-सात आणि दिवाळीच्या-नाताळाच्या सुट्टीत तीन-चार कुटुंबांना सहज राहता येअील. ज्या शेतवाड्यांचे मालक ही सोय करण्यास तयार असतील, त्यांनी आपली नावे आणि अुपलब्ध सोयी अेखाद्या मध्यवर्ती ठिकाणी नोंदण्याची व्यवस्था झाली, तर अेकाच केंद्रात सर्व ठिकाणचा तपशील पाहण्यास मिळून अिच्छुकांची सोय होअील. आर्थिक आणि व्यावहारिक दृष्टीने ह्या प्रश्नाकडे सर्वांनीच पाहिले, तर हा अुपक्रम यशस्वी होअू शकेल.

पाश्चिमात्य देशात अशा तऱ्हेचे अुपक्रम चालू आहेत. तेथील व्यवहारांची माहिती येथे अुपयुक्त होअील. अेका कंपनीने शहरी लोकांना शेतवाडीवर राहण्याची सोय करून देण्याचा व्यवसायच आरंभला आहे. तिच्या पटावर सुमारे ३०० शेतवाड्या आहेत. ह्या कंपनीने त्या सर्वांचा तपशील अेकत्रित करून माहितीपत्रके तयार केली

आहेत. प्रत्येक पत्रकाची किंमत सुमारे अेक रुपया ठेवली असून दरसाल अशी सुमारे १,००,००० माहितीपत्रके ती कंपनी रवाना करते. ज्या शेतकऱ्याला आपली शेतवाडी ह्या यादीत समाविष्ट व्हावी असे वाटते, तो त्याप्रमाणे कंपनीला विनंतीपत्र पाठवतो, कंपनी मग आपला प्रतिनिधी धाडून त्या शेतीवाडीची प्रत्यक्ष पाहणी करवते; आणि खात्री पटल्यावरच त्या शेतवाडीला पटावर दाखल करून घेण्यात येते. तेथे येअून राहणाऱ्यांकडून शेतकऱ्याला जे भाडे मिळणार, त्यातून काही ठराविक रक्कम आणि कमिशन कंपनीला मिळावे, अशी अट असते. ह्या भाड्यात पाहुण्यांच्या राहण्याचा आणि जेवणखाणाचा खर्च समाविष्ट असतो. मोठ्या माणसांपेक्षा लहान मुलांना कमी आकारणी केली जाते. कंपनीची भूमिका मध्यस्थाची असते. शेतकरी आणि पाहुणे ह्यांनी अेकमेकाला पत्करले, म्हणजे तिचे काम संपते. अशा रीतीने, शेतवाडी. वरील पडून राहिलेल्या जागेतून शेतकऱ्याला अुत्पन्न मिळते आणि शहरी लोकांना माफक खर्चात सुट्टी आनंदात घालविता येते. आरामात वेळ जातो, भरपूर व सकस अन्न खाण्यास मिळते आणि ग्रामीण राहणीचा आस्वाद मनमुराद लुटायला सापडतो.

यात्रेला जाणारांची सोय करणाऱ्या यात्रा-कंपनीची कल्पना प्रारंभी नवलाअीची, धाडसाची वाटली. परंतु आता यात्रा-कंपन्या आणि प्रवासी-कंपन्या कितीतरी लोकांना दूरदूरचे प्रवास घडवीत आहेत आणि अेक प्रकारे भारताच्या अेकात्मतेच्या भावनेस हातभार लावीत आहेत. गरज निर्माण झाली म्हणजे तिच्या पूर्तीसाठी यंत्रणा निर्माण होते, त्याचे दुसरे अुदाहरण मंगलकार्यालयांचे देता येअील. शेतवाडीवर शहरी लोकांची सुट्टीत राहण्याची सोय करण्याची संघटनाही कल्पक आणि योजनाचतुर लोक हाती घेतल्याविना राहणार नाहीत. शहरे आणि खेडी ह्या दोन गटांतील अंतर कमी करण्याचे श्रेय त्यांना मिळणार आहे.

☘ ☘

: २४ :

## *अंध परंपरेच्या यात्रेत सुशिक्षितही सामील !*

शृंगेरीचे श्रीशंकराचार्य पुण्यातील आपल्या सात दिवसांच्या वास्तव्यानंतर निरोप घेताना म्हणाले, "पुण्यात सर्वत्र धर्मश्रद्धा असलेली पाहून मला आनंद वाटला."

धर्मश्रद्धा मोजण्याचे कोणतेही साधन नाही आणि धर्मश्रद्धेची व्याख्या करणेही सोपे नाही. परंतु ज्या प्रकारची धर्मश्रद्धा फैलावत आहे तिचे मूल्य किती, हा प्रश्नच आहे.

जीवनात यशस्वी झाल्यासारखे दिसणारे सुशिक्षित लोकही देवदर्शन, महाराजांचे दर्शन, स्वामींचा प्रसाद, यात्रा, नवस, अुपासतापास अित्यादींचा काडी-आधार घेत असलेले आढळतात. अशा गोष्टींना पूर्वी सुशिक्षितांत फारशी प्रतिष्ठा नव्हती; आज अुलटा प्रकार दिसत आहे. जुने संत, स्वामी, महाराज, बाबा ह्यांना चांगले दिवस आले आहेत; आणि मागणी तसा पुरवठा ह्या न्यायाने नव्या संतमंडळींची प्रॅक्टिसही लवकर बसत आहे. अंधश्रद्धेचे तण बंगल्यांतूनही पसरत चालले आहे. समंजस वाटणारे लोकही 'देवाचे' काहीतरी करू लागले आहेत.

"माझ्या नशिबात अमेरिकेचा प्रवास आहे काय ?" असे सध्याचे तरुण, सामुद्रिकाला आणि ज्योतिष्याला विचारतात. पूर्वीचे लोक, "माझ्या नशिबात काशीयात्रा आहे का ?" असे विचारीत असत. ही यात्रा फार धोक्याची असे आणि म्हणूनच यात्रेकरूने परत आल्यावर मावंदे ( मोठे जेवण ) घालावयाची पद्धत होती. आगगाड्या, बसेस, विमाने अित्यादींची सोय झाल्यावर काशीयात्राच काय पण बद्रीनाथ, केदारनाथ, अमरनाथ ह्या यात्राही लोक हौसेने करू लागले. साठीच्या समारंभाप्रमाणे ह्या यात्रेचीही अेक फॅशनच पडली असून ते अेक 'प्रतिष्ठे'चे चिन्ह झाले आहे. वेदशास्त्रशून्य पंड्यांनी आणि त्यांच्या हस्तकांनी यात्रेकरूंना 'त्राहि भगवान्' करून सोडावे, भिकाऱ्यांनी वेढून टाकावे आणि सुशिक्षित यात्रिकांनी हा बाजार अुघड्या डोळ्यांनी चालू द्यावा हे दुर्दैव होय.

सर्व जातींच्या आळशी, अैतखाअू आणि फुकटचा लोकांना हा अेक सोपा धंदाच होअून बसला आहे. अनेक स्वार्थी लोकांनी मुख्य देवळाच्या भोवती देवदेवतांची स्थापना करून आपल्या पोटापाण्याची निश्चिती केली आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्राच्या ठिकाणी देवळेच देवळे, मूर्तीच मूर्ती, याचकच याचक झाले आहेत. अनेक जातींचे लक्षावधी लोक देवळात आणि देवळाबाहेर दान मागण्याचा धंदा करीत आहेत.

"अज्ञेय पुण्यापलीकडे यात्रांपासून कोणताही तादृश व्यावहारिक फायदा नसल्यामुळे अशा यात्रांची प्रतिष्ठा वाढणे श्रेयस्कर नाही. पुराणातील फलश्रुतीला किंवा हरदासी-भिक्षुकी अतिशयोक्तीला खरे मानून साधारण स्थितीतल्या माणसांनी तीनतीनदा महायात्रा किंवा अुठल्याबसल्या आळंदी-पंढरी अित्यादींच्या वाऱ्या कर-करून काळाचा व पैशाचा अपव्यय आणि अैतखाअूंची चंगळ करणे हे आपल्या देशाच्या सध्याच्या सांपत्तिक हलाखीत अत्यंत अुधळेपणाचे आहे," असे श्री. त्रि. ना. अत्रे ह्यांनी आपल्या 'गावगाडा' पुस्तकात ५० वर्षांपूर्वी लिहिले ते आजही खरे आहे. लोकांत ज्ञानप्रसार झाल्यावाचून ही बाब त्यांच्या खात्रीस येणार नाही, ही त्यांची कल्पना फोल ठरली आहे; अुलट शिक्षणाचा दुरुपयोगच केला जात आहे. ज्यांनी समाजाचे नेतृत्व करावयाचे, असे लोक अंधश्रद्धा, फलज्योतिष ह्यांस बळी पडत चालले आहेत आणि समाजाच्या दडपणामुळे सरकारही त्यास प्रोत्साहन देत आहे. अुद्योगधंद्यास आवश्यक त्या सोयी, सवलती, साधने प्राप्त करून देण्याच्या अगोदरच अनुत्पादक, नैराश्यजनक यात्रांच्या सोयीकडे लक्ष पुरविण्यात येत आहे. त्यांच्यासाठी खास आग-गाड्या आणि बसेस सोडायला हरकत नाही, पण अिकडे कामगारांना कामाच्या जागी वेळेवर पोचविण्याची वाहतुकीची व्यवस्था नसताना, कामासाठी जाणाऱ्या अुतारूंची बेसुमार गर्दी होत असताना अंधश्रद्धेला पोसण्याचे हे अुपक्रम चालू आहेत. आगगाड्यां-तील जागा व्यापून, रिझर्व्ह डब्यांतून प्रवास करून, मावंदे घालून सुशिक्षित लोकही आपल्या ह्या कृतीने आर्थिक अभ्युदयास खीळ घालीत आहेत. ह्यात खर्ची पडणारा पैशाचा ओघ बचतीकडे, अुत्पादक गोष्टींकडे वळेल तर किती बरे होअील! आग-गाड्या आणि बसेस ह्यांतील अेकूण अुतारूंपैकी कितीजणांचा प्रवास धनोत्पादक नव्हता, सामाजिक प्रगतीस पोषक नव्हता ह्याची आकडेवारी गोळा करणे बोधप्रद ठरेल.

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे ह्यांची भागवतधर्मावरील प्रवचने सुप्रसिद्ध आहेत. ह्यांसंबंधी त्यांनी व्यक्त केलेले विचार आजही लागू पडणारे आहेत. न्यायमूर्ती म्हणतात, की आम्ही पूर्वीपासून देवावर सर्वपरी भार ठेवीत आलो आहो. तशा प्रकारे, निदान तितक्या मानाने अितर लोकांनी केलेले आढळत नाही. अितर लोक लौकिकार्थ आपली औद्योगिक अथवा सांपत्तिक स्थिती सुधारण्यासाठी चळवळीत पडतात. ह्याअुलट, देवाचा सहवास व्हावा, त्याच्याशी लडिवाळपणे बोल बोलावे, त्याला आळवावे अेतदर्थ प्रयत्न करण्यातच आपला अैतिहासिक काळ गेला आहे. हजारो वर्षांपासून आमच्या लोकांची समजूत ही, की आपल्या दुःखाचा व संकटाचा

भार सर्वपरी देवाच्या डोकीवर घालावा म्हणजे त्याला काकळूत येअून तोच त्याचा परिहार करतो.

मनाची ही प्रवृत्ती अितकी हाडीमासी मुरली आहे, की ती आमचे भाग्य होअून राहिली आहे, आणि आमचा अुदय झाला तर तद्द्वाराच व्हावयाचा असे दिसते. हाच येथील जणू हवापाण्याचा गुण आहे ! हा अुपजत अंगस्वभाव टाकून देता येत नाही, तेव्हा तो शुद्ध मार्गानेच जाअील अशी योजना केली पाहिजे; असे त्यास वळण दिले पाहिजे. 'अवघे देखे जन ब्रह्मरूप' हे तुकोबांचे वचन घेअून सर्व मनुष्यांमध्ये दिव्य भाग जो आहे, त्याचेच अवलोकन आपण करावे, असे न्यायमूर्तींनी प्रतिपादले आहे; मानवसेवा हीच अीश्वरसेवा असे सुचविले आहे.

भारतामधील नवी धरणे, विद्युत्-योजना, कारखाने हे बघण्यास मुद्दाम निघणारे फारच थोडे असतात. त्यामुळे ह्या नव्या तीर्थस्थानांचे दर्शन घडविण्यास यात्रा-कंपन्या अुत्सुक नसतात. सुशिक्षितांची ग्रंथखरेदी कमी झाली असून त्यांची टाळ-झांजा-चिपळ्यांची खरेदी वाढली आहे. शिक्षणामुळे धर्माचरण सुधारावे म्हटले, तर तसेही घडत नाही. त्यांचे तथाकथित धर्माचरण अशिक्षित लोकांच्या धर्माचरणापेक्षा कमी प्रतीचे असते. कारण, त्यात हेतूपेक्षा सौकर्यावर भर असतो आणि त्यासाठी ते भ्रष्टा-चारास जास्त लवकर तयार होतात; त्यांच्या ओळखीपाळखीही जास्त असतात.

कॉलऱ्याची लस टोचून न घेता खोटे सर्टिफिकेट घेअूनच यात्रेला जाणे, क्षेत्राच्या म्युनिसिपॉलिटीची किरकोळ दस्तुरीही मोठ्यांच्या नावांचा दुरुपयोग करून चुकविणे, बारीत अुभे राहावे न लागता दर्शन घडावे ह्यासाठी वशिल्याने पास मिळविणे अित्यादी गोष्टी करणारे वर पुन्हा पंड्यांना आणि त्यांच्या हस्तकांना नावे ठेवून स्वतःच्या श्रेष्ठत्वाची प्रौढी मिरवितात.

सध्या सुशिक्षितांमध्ये बोकाळत चाललेली धर्मप्रवृत्ती निरोगी नसल्यामुळे धर्मप्रवृत्तीला शुद्ध मार्गाने जाण्याचे वळण लावण्याचे तिच्यात सामर्थ्य नाहीच मुळी. पुरचुंडीची जागा प्लॉस्टिकच्या पिशवीने घेतली आहे अेवढेच. जुनी पुटे काढून टाका-वयाची तर त्याला रसायनही जालीमच हवे.

: २८ :

## सत्यनारायण - पूजा आणि समारंभ

लग्नकार्य पार पडल्यानंतर सत्यनारायण करण्याची पद्धत काही नवीन नाही; पण त्याचा अुद्देश मात्र आता पूर्वीअितका मर्यादित राहिलेला नाही. विवाह, समारंभाला ज्यांना बोलाविता आले नसेल, अशांना तीर्थप्रसादाला बोलावले जाते; हेतू हा, की त्यांनाही वधूवरांची ओळख होण्याची संधी मिळावी. तो अेक छोटासा रम्य समारंभच असतो. अशाच अेका प्रसंगी सत्यनारायणाच्या व्रतासंबंधी बोलणे निघाले. "आपण अितर ठिकाणी जायचा आळस केला, तरी तीर्थप्रसादाला मात्र गैरसोय सोसूनही आपण जातो," असे बहुतेकांनी मान्य केले. सत्यनारायणाची ही काय जादू आहे?

सत्यनारायणाच्या व्रताचा अितिहास त्याच्या पूजेच्या कथेमध्ये प्रारंभालाच सांगितलेला आहे. "मनुष्यलोकातील सर्व दुःखे कोणत्या लहान अशा अुपायांनी नाहीशी होतील?" असे भगवान विष्णूंना नारदमुनी विचारते झाले. तेव्हा भगवंतांनी कुणालाही माहीत नसलेला अेक सोपा अुपाय सांगितला. तो अुपाय म्हणजेच सत्य-नारायणाचं व्रत. "ह्या व्रतामुळं सर्व अिच्छा पूर्ण होतात. हे व्रत दुःख, शोक ह्यांचा नाश करणारे असून धनधान्याची समृद्धी करणारे, त्याचप्रमाणे सौभाग्य व संतती देणारे, सर्व कार्यात विजयी करणारे आहे. कलियुगात सर्व जीवांच्या दुःखनाशाचा हाच अेक सोपा अुपाय आहे." असे ते म्हणाले. मनातील सर्व फले प्राप्त होण्याचे आश्वासन देणारे सत्यनारायणाचे हे अत्यंत सुलभ व्रत अेवढे लोकप्रिय न झाले तरच नवल! साहजिकच, खेड्यांतून आणि शहरांतून, झोपड्यांतून, चाळींतून आणि बंगल्यांतून सत्यनारायणाचे व्रत पसरत आहे.

हे व्रत पूर्वी कुणी केले होते आणि त्यामुळे त्यांचा कसा फायदा झाला, ह्याच्या कथा पोथ्यातून सांगितलेल्या आहेत. सत्यनारायणाचे व्रत करण्याचा मनाशी निश्चय

करणाऱ्या ब्राह्मणाला भरपूर भिक्षा मिळाली; सत्यनारायणाचे पूजन केल्यानंतर तो सर्व दुःखातून मुक्त होऊन समृद्ध झाला; आणि प्रत्येक महिन्याला व्रत केल्यामुळे तो अखेर पापमुक्त होऊन मोक्षाला गेला! ह्याउलट साधु वाण्याची गोष्ट. त्याने संततीसाठी सत्यनारायणाची प्रार्थना केली, परंतु अिच्छापूर्ती झाल्यावर व्रत आचरले नाही. तेव्हा सत्यनारायणाने त्याला केदेत टाकले. अंगध्वज राजाने सत्य-नारायणाला नमस्कार केला नाही, त्याचा प्रसादही घेण्याचे नाकारले,तशी त्याचे शंभर मुलगे नाश पावले! स्तुतिप्रिय, त्याचप्रमाणे शीघ्रकोपी आणि खुनशी दाखविलेला हा सत्यनारायण, त्याला शरण जाणारावर पुन्हा संतुष्ट होऊन अिच्छित वर देतो, अशाही कथा सांगितलेल्या आहेत.अशा असंभवनीय कथांनी समाजाला ग्रासून टाकले आणि सत्यनारायणाचे सर्व लोक अुपासक बनले. ही परंपरा अजून चालू आहे. अभाविकांच्या हातूनही सत्यनारायण प्रसंगोपात आपोआप घडतो, अितका त्या परंपरेचा प्रभाव आहे.

अिच्छित कार्य सिद्धीस जावे, म्हणून कित्येकजण सत्यनारायण बोलतात आणि नवस फळाला आल्यावर तो फेडतात. आधी न बोलताही हाती घेतलेले कार्य पार पडले, अिष्ट हेतू साध्य झाला, म्हणजेसुद्धा सत्यनारायणाची पूजा करण्याची प्रथा आहे. सत्यनारायण न करण्यापेक्षा केलेला बरा, निदान त्याच्या प्रसादाच्या सेवनात कसूर करू नये, ह्या दृष्टीने त्याच्याकडे सर्व लोक पाहतात. तीर्थप्रसादाला जाण्याचे कुणी टाळीत नाही सत्यनारायणाची पूजा सूर्यास्तसमयी केलेली विशेष चांगली, असे लिहिलेले आहे. पण आता शहरातून तरी ती सकाळीच आटोपून घेण्यात येते. पूर्वी सत्यनारायणाची कथा अैकायला बांधव आणि मित्र ह्यांना आमंत्रण असावयाचे आणि तेहि भक्तिभावाने सबंध कथा श्रवण करीत असत. आता ती अैकायला घरचीसुद्धा मंडळी तयार नसतात. मित्रमंडळींना तीर्थप्रसादालाच संध्याकाळी बोलावणे असते. शिक्षणाचा प्रसार, जागेची अडचण, शहरातील अंतरे, वेळेचा अभाव अित्यादी कारणांमुळे ही तडजोड क्रमप्राप्तच होते; सोयीलाच प्राधान्य मिळते.

सत्यनारायणाच्या पूजेला आता सामाजिक स्वरूप प्राप्त होअू लागले आहे; तेच स्वरूप महत्त्वाचे होत आहे. लोकांच्या भावनेचा अुपयोग करून घेअून त्यांना तीर्थप्रसादाला बोलावले जाते आणि तेही सर्वजण येतात. मित्रमंडळींना आपल्या घरी अेकत्र आणण्याची ही नामी संधी असते. निमंत्रितांना तीर्थ आणि प्रसाद दिले तरी पुरते; वरती कॉफी दिली म्हणजे खूप केले, असे वाटते. काही ठिकाणी प्रसादापेक्षा तीर्थच जास्त असते, तर काही ठिकाणी तीर्थप्रसादापेक्षा फराळाचे जिन्नस मुबलक असतात. निमंत्रितांना त्यामुळे साहजिकच आनंद होतो. मुंबअी येथील बिर्ला मातोश्री सभागारातील सौ. सुहासिनी मुळगावकरांच्या प्रयोगांना जशा थाटाने प्रेक्षक जातात, तशाच प्रकारे स्त्री-पुरुष तीर्थप्रसादाला येतात आणि हास्यविनोदात धुंद होतात. अेवढ्या गर्दीत सत्यनारायणाच्या प्रयोजनाची चौकशी करायला, यजमान-दंपतीला शुभेच्छा देण्याला सवड तरी कुणाला असते? सत्यनारायण हा दुःखाचे

सुख करणारा परीस असो वा नसो, सामाजिक भावना वाढीस लागण्यास तो मदत करीत आहे, हा काही लहान फायदा नाही. म्हणून त्याच्या सामाजिक समारंभांचे स्वागतच करायला हवे. मात्र, त्या समारंभाच्या योजनेत सुधारणेला बराच वाव आहे, त्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

बूट बाहेर काढून आत येणारा ज्या हाताने ते काढतो त्याच हाताने सत्य-नारायणाला फुले वाहतो, तीर्थ प्राशन करतो आणि प्रसाद घेतो. हे सर्व अमंगल नाही काय ? ज्यांची पुरेशी श्रद्धा नाही आणि पुरेशी अश्रद्धाही नाही, असे लोक अेखादी अप्रिय गोष्ट करून टाकायची, त्याचप्रमाणे दर्शनाचा फार्स करतात.

देवासमोर पैसे ठेवण्याचा अुद्देश धर्मकार्याला हातभार लागावा हाच असतो. तेव्हा सार्वजनिक सत्यनारायणाच्या तीर्थप्रसादाला जाणारांनी त्याला यथाशक्ती जरूर मदत करावी; फुकटात पुण्य पदरात पाडू नये. पण घरगुती सत्यनारायणापुढे पैसा टाकण्याची कितपत आवश्यकता आहे ? त्या परंपरेचे विडंबन चालू आहे. श्रीमंत लोकसुद्धा सत्यनारायणास निघताना मुद्दाम तांब्याचे नाणे बरोबर घेतात.

तीर्थ आणि प्रसाद देण्याच्या पद्धतीत सुधारणेला बराच वाव आहे. तीर्थ प्राशन करण्यास अुत्सुक नसणारालाही लाजेकाजेखातर ते तळहातावर घ्यावे लागते आणि ओला चिकट झालेला हात, कुठेतरी पुसावा लागतो. त्यापेक्षा प्रसादच तीर्थयुक्त केला तर ?

जेवणातले द्रोण गेले, पण सत्यनारायणाच्या प्रसादाचे ते छोटे द्रोण अजून कायम आहेत. प्रसाद देणाराला ते सोयीचे वाटले, तरी घेणाराची काय कथा ? बहुतेक लोक प्रसाद ग्रहण करून द्रोण तसेच बाजूला सारून ठेवतात; मागाहून येणारांना हे द्रोण काळजीपूर्वक बाजूला सारूनच बसावे लागते. हात धुण्याची सोय केली तरच तिचा फायदा घेणे शक्य होणार. प्रसादासाठी वाटी, चमचा वापरायला काय हरकत आहे? घरी नेण्यासाठी प्रसाद देतात, तो वेडयावाकडया फाडलेल्या रद्दी कागदाच्या पुडीतून. ह्या सर्वात स्वच्छता, औचित्य, सौंदर्यदृष्टीही काहीच आढळत नाही.

सत्यनारायणाचा हेतू, ते व्रत करणाराची कामनापूर्ती हा असतो आणि निमंत्रितांच्या शुभेच्छाही त्याला हव्या असतात. अुत्सव-प्रियतेला वाव देणारे हे व्रत अधिक सामाजिक फल कसे देअील, ह्याकडे लक्ष देण्याची वेळ आता आली आहे. तेव्हा, समारंभ घडवून आणणारांनी तो त्या दृष्टीने यशस्वी करण्याचा जाणतेपणानं प्रयत्न करायला हवा.

: २६ :

## *आअीच्या कडेवरील मुलाची खाऊकडे झेप !*

अधिक पगाराच्या आकर्षणाने आपले कितीतरी तरुण अिंग्लंडमध्ये, अमेरिकेत जाअून स्थायिक होत आहेत; तेथेच विवाहबद्ध होअून राहात आहेत. त्यांनी जरी स्वत:चा धर्म प्रत्यक्ष बदलला नाही, तरी आपल्या पत्नीच्या धर्माप्रमाणे तेथे आचार करणे त्यांना हिताचे वाटते. मग, अुघडपणे धर्माचे लेबल बदलून अेखाद्याला अिथेच चांगली नोकरी मिळाली, तर काय हरकत आहे ? त्याच्या शिक्षणावर देशाने केलेला खर्च वाया तरी जाणार नाही. " ख्रिस्ती होण्याच्या अटीवर मला मोठी नोकरी मिळणार असेल, तर माझी तयारी आहे," असे अरुण म्हणत होता. त्याला सुहासने विचारले, " चांगल्या पगारासाठी मुसलमान होशील का ?" अरुणने अुत्तर दिले, " मुसलमान होण्यासाठी मला दोन लाख रुपये तरी हवेत !" दोन कॉलेज-विद्यार्थ्यां-मधील हा संवाद आहे.

धर्म बदलल्यामुळे पैसा आणि त्यामुळे प्रतिष्ठा मिळाल्याची कितीतरी अुदाहरणे आहेत. आपल्या पसंतीचा नवरा किंवा नवरी हस्तगत करण्यासाठी कित्येकांनी धर्मपरिवर्तन केले आहे. घटस्फोट सुलभतेने मिळविण्यासाठीही धर्मांतराचा अुपयोग होतो. दुसऱ्या धर्माची तत्त्वे आपल्या स्वत:च्या धर्मापेक्षा अधिक चांगली आहेत, असे पटून धर्मांतर करणारे नाहीत असे नाही. परंतु, बहुसंख्य धर्मांतरांचे प्रमुख कारण, दरिद्री देशात तरी, अैहिकच असते. पैशाप्रमाणे कधीकधी प्रेमही धर्मांतराच्या मुळाशी असते. धर्म बदलल्यामुळे श्रीमंती प्राप्त झाली तर त्याचे अभिनंदनच केले जाते. काही महिन्यांपूर्वी अेका सुशिक्षित हिंदू मुलीचा अेका धनाढ्य घराण्यातील मुसलमान तरुणाशी विवाह झाला तो किती थाटाने, दिमाखाने, वाजत-गाजत ! राष्ट्रीय अेकात्मतेला पोषक म्हणून त्याचे स्वागत झाले !

लहान मुलामुलींच्या धर्मांतराचे कारण आर्थिकच असते. ज्या अनाथ, पोरक्या अपेक्षित मुलामुलींना समाज पोसण्यास तयार नसतो किंवा असमर्थ असतो, अशांना ख्रिस्ती मिशन्समध्ये आसरा मिळतो. त्यांची तेथे जोपासना केली जाते. ख्रिस्ती धर्माच्या शिकवणीनंतर त्यांना बाप्तिस्मा दिला जातो. त्यांच्या अितर शिक्षणाचीही व्यवस्था करण्यात येते. त्यामुळे त्यांचे नशीब अुदयास येअू शकते. मिशन्सच्या ह्या सर्व कार्यास भरपूर आर्थिक पाठबळ असते. मुलांपेक्षा मुलींच्या शिक्षणाकडे स्वाभाविकपणेच विशेष लक्ष पुरविले जाते; मुलींची बोर्डिंगे आणि शिक्षणसंस्था ह्यांवर बराच खर्च केला जातो. त्यांतून बाहेर पडणाऱ्या मुलींना चांगल्या नोकऱ्या सहज मिळू शकतात; आणि त्या मुली घरात पैसा आणू लागतात. त्यांचा सामाजिक दर्जा वाढतो राहणी सुधारते. आपापल्या नोकरीत त्या अग्रेसर होतात; त्यांचे मोहक बोलणे, चालणे, माणुसकी, मनमिळाअूपणा, शिष्टाचार ह्यांची अितरांवर छाप पडते. वरिष्ठही त्यांच्यावर खूष असतात. अितर धर्मीयांच्या खाजगी अिस्पितळातूनही स्टाफ आणि सिस्टर्स ख्रिस्तीच नेमल्या जातात ते अुगीच नाही.

त्या सर्वांचा विवाहाचा प्रश्न मात्र सुटणे अवघड असते. कारण सुविद्य, सुस्थितीमधील ख्रिस्ती तरुणींना त्यांच्या शिक्षणाला आणि पगाराला अनुरूप असे स्वधर्मीय तरुण फारसे आढळत नाहीत. त्यामुळे कित्येकींच्यावर अविवाहित राहण्याची पाळी येते. नोकरीच्या निमित्ताने त्यांची अनेक तरुणांशी गाठ पडते; आणि धर्माचे अंतर तुटून त्या अेकमेकांत तारुण्यसुलभ प्रेम निर्माण होते. ह्या परिस्थितीत धर्मापेक्षा काम आणि अर्थ प्रभावी ठरले तर नवल नाही. अशा कारणाने हिंदू धर्मात परत येअून लगोलग विवाहबद्ध होणाऱ्या ख्रिस्ती तरुणींची संख्या वाढत आहे. त्यांचे 'शुद्धीकरण' हे त्यांचा विवाह सुलभ करण्याचे केवळ साधन असते. त्यांच्या शारीरिक आणि भावनिक गरजांपुढे धर्माची बंधने टिकत नाहीत. धर्मांतराने राहणीत विशेष बदल होत नाही. धर्मांतराची सामाजिक भीतीही कमी झाली आहे; धर्म बदलणाराचे समाजातून अुच्चाटन होत नाही.

प्रत्येकजण कुठल्यातरी धर्मात जन्म घेतो आणि वाढतो. विशेष कारणाखेरीज आपला धर्म बदलण्याची कुणी अिच्छा करीत नाही; पण धर्म आड येअू लागला, तर मात्र त्याची अडचण दूर करण्यास मनुष्य तयार होअू शकतो. आंतरधर्मीय विवाह करणारांनी आपापला धर्म पाळावयाचे आधी ठरविले असले, तरी कालांतराने दोघांपैकी अेकजण दुसऱ्याचा धर्म स्वीकारतो अशी अुदाहरणे आहेत. अपत्यांच्यासाठी तरी ते आवश्यक ठरते.

अेकीकडे सुशिक्षितांचे पाश्चात्यीकरण चालू असताना महाराष्ट्रीय ख्रिस्ती समाजात महाराष्ट्रीय संस्कृतीबद्दल वाढती आपुलकी दिसून येत आहे. आपले आधुनिकत्व दाखविण्यासाठी हिंदू मुलींना कुंकू, मंगळसूत्र नको; तर ख्रिस्ती मुलींत त्यांची लोकप्रियता वाढत आहे. फ्रॉकपेक्षा साडी त्यांना पसंत पडत आहे. मिस्पेक्षा कुमारी, मिसेस्पेक्षा सौभाग्यवती म्हणवून घेण्यात त्यांना आनंद वाटतो. आता मुला-

मुलींची नावेही ख्रिस्ती साधुसंतांची ठेवीत नाहीत; ठेवलीच तर त्यांच्या जोडीला महाराष्ट्रीय नावेही ठेवतात आणि तीच वापरतात. अशा रीतीने ख्रिस्ती समाज कुंपणाबाहेर पडून महाराष्ट्रीय जीवनाशी समरस होऊ पाहात आहे. धार्मिक कर्मकांडांचा लोप होत आहे, त्याचाही परिणाम त्याला पोषक होत आहे.

रोजच्या व्यावहारिक, सामाजिक जीवनातील धर्माचे महत्त्व कमी होत गेल्यावर धर्म ही ज्याचीत्याची वैयक्तिक बाब अुरते. धार्मिक अुत्सव हेही आता सामाजिक अुत्सव बनत आहेत; आणि सर्व धर्मांचे लोक त्यात मोकळेपणाने भाग घेअू लागले आहेत. गेल्याच दिवाळीत अेका मुसलमान दुकानदाराने सत्यनारायणाच्या तीर्थप्रसादास आपल्या गिऱ्हाअिकांना बोलाविले होते. कित्येक हिंदू सुशिक्षितांच्या घरी येशू ख्रिस्ताच्या तसबिरी आणि पुतळे मोठ्या सन्मानाच्या जागी ठेवलेले दिसून येतात. सुजाण माणसे सहिष्णू होतात; अितकेच नव्हे, तर अितर धर्मांतील चांगले ते घेण्यास, त्यातील आदरणीय देवदेवतांना आणि साधुसंतांना मानण्यास तयार असतात अशा परिस्थितीत, धर्मभेदाला किंवा धर्मांतराला नसते महत्त्व देणे अिष्ट ठरत नाही. भारतात ह्यापूर्वी झालेली कितीतरी धर्मांतरे परकी, परधर्मीय सत्ताधाऱ्यांनी घडवून आणलेली होती. ती भीती आता अुरलेली नाही. धर्मांतर हा ज्याचा-त्याचा खुषीचा सौदा आहे.

आअीच्या कडेवरील मूल तिला सोडण्यास तयार नसते. अेखाद्या बाअीने त्या मुलाला खाअू दाखवून आपल्याकडे बोलावले, तरी ते जात नाही; आअीलाच चिकटून बसते. पण आअीबद्दलची ही ओढ खाअूच्या लालचीपुढे कायम टिकत नाही; आणि खाअू खाण्यापुरते तरी ते मूल दुसरीच्या कडेवर जाण्यास तयार होते. हळहळू खाअूचे आकर्षण प्रभावी होत जाते आणि बिचाऱ्या आअीला काहीही करता येत नाही. खाअू देणारी बाअी लांबून दिसली, तरी त्या मुलाची आअीच्या कडेवरून खाली अुतरण्याची धडपड सुरू होते. आपल्या मुलाला साधे लाह्या, चुरमुरेही देअू न शकणाऱ्या आअीला दुसरीच्या अैपतीपुढे हार खाण्याची पाळी येते. अैहिक कारणासाठी होणाऱ्या धर्मांतराची कहाणी बहुधा अशीच असते.

अितर सर्व धर्मांपेक्षा आपला धर्म श्रेष्ठ, ह्या शिकवणीमुळे 'धर्म बदलणारे ते सर्व बाटलेले' अशी समजून सर्वच धर्मीयांत दिसूत येते. त्यामुळे धर्मांतराची कारणे लक्षात न घेता त्यांवर अविवेकी टीका केली जाते. धर्मांतरामुळे अेखाद्याचा अैहिक लाभ झाला म्हणजे त्याच्याबद्दल मनात वाटणारी असूया ह्या टीकेखाली कधीकधी दडलेली असते. धर्मलंड, अनाचारी, भोगविलासी लोकही धर्म बदलणारांची नालस्ती करून स्वधर्मनिष्ठेचे प्रदर्शन करू पाहतात; मग गरिबांची काय कथा ? वास्तविक, धर्मपरिवर्तन करणारा मनुष्य– मग तो कोणत्याही धर्मातून, कोणत्याही धर्मांत प्रवेश करो – नव्या धर्माचे पालन सहेतुक व अधिक कसोशीने करण्यास प्रवृत्त होतो, असे अनुभव सांगतो. हे सर्व लक्षात घेअून ह्या प्रश्नाकडे वास्तवतेने पाहिले पाहिजे. धर्म अर्थ आणि काम ह्या तिहीत अर्थ हाच प्रमुख ठरतो, आणि त्याला बाकीचे बळी पडतात. ह्यासाठी आर्थिक अभ्युदय आधी हवा, हे अर्थकारण धर्मवीरांनी समजून घेतले पाहिजे.

: २७ :

# विवाह-समारंभाला लग्नसराअीच कशाला ?

मेजरसाहेब आपल्या मुलीचा विवाह जमविण्यासाठी मुद्दाम रजा घेअून आले होते. तिच्या नव्या बिऱ्हाडासाठी त्यांनी दूरदृष्टीने आधीच ब्लॉक मिळवून ठेवला होता, त्यामुळे मुलगी पसंत पडायला वेळ लागला नाही. पण विवाह-समारंभासाठी मंगल-कार्यालय काही मिळेना ! सर्व कार्यालयांचे सबंध सीझनचे बुकिंग केव्हाच झालेले होते. मेजरसाहेबांची रजा तर संपत आली होती, पुन्हा दोन वर्षे मिळण्याची शक्यता नव्हती. तेव्हा त्यांनी अेक युक्ती केली. ज्या दिवशी कुठल्याच पंचांगात विवाहमुहूर्त दिलेला नाही अशा दिवशी कार्यालय मिळू शकत होते. तेव्हा कार्य अुरकण्याच्या दृष्टीने त्यांनी सोयीस्कर असा दिवस आणि वेळ स्वतःच निश्चित करून गुरुजींच्या कडून त्याची घटिका–पळे काढून मुहूर्त तयार केला आणि त्याप्रमाणे निमंत्रण-पत्रिका छापल्या. त्या दिवशी गावात अितर कुठेच विवाह-समारंभ नसल्याकारणाने त्यांना बँड, सनअी, हारगोटे, दूध, भाजीपाला, आचारी, वाढपी सर्व काही बेतात मिळाले. रिक्षा–टॅक्सींनी अडवून भाडे न मागितल्यामुळे निमंत्रितही खूष झाले.

वर्षातील काही महिन्यांतील काही दिवशीच विवाहाचे मुहूर्त पंचांगात दिलेले असतात; चातुर्मासात तर विवाहाचा विषयसुद्धा काढायचा नसतो ! लोकसंख्येच्या वाढीबरोबर विवाहांची संख्याही वाढत आहे, पण मुहूर्तांची संख्या मात्र त्याप्रमाणे वाढत नाही. साहजिकच लग्नसराअीत विवाहांची गर्दी अुडते; आणि महागाअीत आणखी भर पडते ! मंगलकार्यालये मिळणे कठीण जाते आणि शास्त्रा-पेक्षा, औचित्यापेक्षा सोयीकडे लक्ष देणे अपरिहार्य ठरते. प्रत्यक्ष विवाहविधीच्या, आधीच ‘ विवाहनिमित्त भोजन-समारंभ ’ आयोजित केला जातो; पूर्वी अक्षता. पडल्यावरच भोजनाचे पक्के निमंत्रण केले जाअी. आता दुपारी जेवून जाणारी

कित्येक मंडळी संध्याकाळी विवाह-समारंभाला येतही नाहीत; योजिल्याप्रमाणे विवाह होअील असे ते गृहीतच धरतात.

वर्षातील काही महिने विवाहाला वर्ज्य करणे आणि काही काळ, त्यातले काहीच दिवस विवाहाला योग्य मानणे आता अधिकाधिक गैरसोयीचे होअू लागले आहे. साहजिकच त्यातून मार्ग काढण्यात येत आहेत. जुन्या पंचांगाच्या अभिमान्यांना टिळकपंचांगात अेखादा जास्त मुहूर्त आढळला, तर त्याचा फायदा घेण्यास ते तयार असतात. तीच गोष्ट टिळक पंचांगाच्या अभिमान्यांची. कुठल्यातरी पंचांगात मुहूर्त असल्याशी कारण! विजयादशमी, पाडवा, स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक-दिन हे अुत्सवाच्या सुट्टीचे दिवस असल्याकारणाने, मंगलकार्यासाठी आता शुभ दिवस गणले जाअू लागले आहेत; पंचांगात त्या दिवशी मुहूर्त नसला तरी चालतो. तथापि लोकांना सोय हवी असते; त्याचप्रमाणे शास्त्र आणि परंपरा ह्यांचा आधारही हवा असतो. ग्रहयोगाची अेरवी अितकी चेष्टा करणारे कित्येक लोकही आपल्या घरातील विवाहासाठी सोयीस्कर शुभ वेळ निवडतात असे आढळते.

लग्नसराअी नसताना अेखादा विवाह अगदी योग्य कारणासाठीही घाअीने अुरकण्यात आला तरी तो चिकित्सेचा आणि कुजबुजीचा विषय बनतो, अशी अजून कित्येक ठिकाणी परिस्थिती आहे. तो प्रेमविवाह असला म्हणजे तर विचारायलाच नको! बाराही महिन्यात केव्हाही विवाह करण्यास सममाजिक मान्यता मिळाली म्हणजे अपवादांचे प्रमाण अितके वाढेल, की रूढी बदलून तीच 'शास्त्रात् बलीयसी' होअील. लग्नसराअीमधील गैरसोयींमुळे त्याला पोषक वातावरण निर्माण होत आहे. लग्नसराअीत आगगाड्यांतील गर्दी वाढते आणि प्रवास असह्य होतो. बाराही महिने विवाह होअू लागले, तर हा त्रास कमी होअील. कापड-चोपड स्वस्त मिळेल. कार्य अधिक समाधानकारकपणे पार पाडता येतील. विवाह ठरल्यावर प्रत्यक्ष विधीसाठी लग्नसराअीची वाट पाहावी लागणार नाही; त्याचप्रमाणे सोयीचे नसताही घाअीने विवाह अुरकण्याची जरुरी पडणार नाही.

विद्युत्गृहातील जनरेटर्संची जास्तीत जास्त अुत्पादनक्षमता सतत कामास यावी लागते. ह्या विजेच्या मागणीमधील भारी चढअुतार– नियमन करून – नष्ट करावा लागतो. आठवड्याचे सातही दिवस आणि दररोजचे चोवीसही तास मागणी सम राखण्याचा प्रयत्न केला जातो. अुदाहरणार्थ, संध्याकाळनंतर काही तास दिवे जास्त जळतात त्या वेळी विजेची यंत्र चालविण्यावर बंधने घातली जातात. सर्व मोठ्या गिरण्यांनी अेकाच ठराविक दिवशी सुट्टी घेतली नाही म्हणजे त्यांची विजेची मागणी सहाअैवजी सात दिवसांवर विभागली जाते; त्यामुळे अितर मागणी पुरविता येते. शाळेच्या अिमारतीत आता दुपारप्रमाणे सकाळी आणि रात्रीही शाळा भरते; म्हणजे त्या अिमारतीची अुपयुक्तता ३०० टक्के होते. सुट्टीत नाटके आणि विवाहसमारंभ ह्यांना जागा देअून अुत्पन्न मिळविले जाते, तो फायदा वेगळाच.

: २७ :

## विवाह-समारंभाला लग्नसराअीच कशाला ?

मेजरसाहेब आपल्या मुलीचा विवाह जमविण्यासाठी मुद्दाम रजा घेअून आले होते. तिच्या नव्या बिऱ्हाडासाठी त्यांनी दूरदृष्टीने आधीच ब्लॉक मिळवून ठेवला होता, त्यामुळे मुलगी पसंत पडायला वेळ लागला नाही. पण विवाह-समारंभासाठी मंगल-कार्यालय काही मिळेना ! सर्व कार्यालयांचे सबंध सीझनचे बुकिंग केव्हाच झालेले होते. मेजरसाहेबांची रजा तर संपत आली होती, पुन्हा दोन वर्षे मिळण्याची शक्यता नव्हती. तेव्हा त्यांनी अेक युक्ती केली. ज्या दिवशी कुठल्याच पंचांगात विवाहमुहूर्त दिलेला नाही अशा दिवशी कार्यालय मिळू शकत होते. तेव्हा कार्य अुरकण्याच्या दृष्टीने त्यांनी सोयीस्कर असा दिवस आणि वेळ स्वतःच निश्चित करून गुरुजींच्या कडून त्याची घटिका–पळे काढून मुहूर्त तयार केला आणि त्याप्रमाणे निमंत्रण-पत्रिका छापल्या. त्या दिवशी गावात अितर कुठेच विवाह-समारंभ नसल्याकारणाने त्यांना बँड, सनअी, हारगोटे, दूध, भाजीपाला, आचारी, वाढपी सर्व काही बेतात मिळाले. रिक्षा–टॅक्सींनी अडवून भाडे न मागितल्यामुळे निमंत्रितही खूष झाले.

वर्षातील काही महिन्यांतील काही दिवशीच विवाहाचे मुहूर्त पंचांगात दिलेले असतात; चातुर्मासात तर विवाहाचा विषयसुद्धा काढायचा नसतो ! लोकसंख्येच्या वाढीबरोबर विवाहांची संख्याही वाढत आहे, पण मुहूर्तांची संख्या मात्र त्याप्रमाणे वाढत नाही. साहजिकच लग्नसराअीत विवाहांची गर्दी अुडते; आणि महागाअीत आणखी भर पडते ! मंगलकार्यालये मिळणे कठीण जाते आणि शास्त्रा-पेक्षा, औचित्यापेक्षा सोयीकडे लक्ष देणे अपरिहार्य ठरते. प्रत्यक्ष विवाहविधीच्या, आधीच 'विवाहनिमित्त भोजन-समारंभ' आयोजित केला जातो; पूर्वी अक्षता. पडल्यावरच भोजनाचे पक्के निमंत्रण केले जाअी. आता दुपारी जेवून जाणारी

कित्येक मंडळी संध्याकाळी विवाह-समारंभाला येतही नाहीत; योजिल्याप्रमाणे विवाह होईल असे ते गृहीतच धरतात.

वर्षातील काही महिने विवाहाला वर्ज्य करणे आणि काही काळ, त्यातले काहीच दिवस विवाहाला योग्य मानणे आता अधिकाधिक गैरसोयीचे होऊ लागले आहे. साहजिकच त्यातून मार्ग काढण्यात येत आहेत. जुन्या पंचागाच्या अभिमान्यांना टिळकपंचांगात अेखादा जास्त मुहूर्त आढळला, तर त्याचा फायदा घेण्यास ते तयार असतात. तीच गोष्ट टिळक पंचांगाच्या अभिमान्यांची. कुठल्यातरी पंचांगात मुहूर्त असल्याशी कारण ! विजयादशमी, पाडवा, स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक-दिन हे अुत्सवाच्या सुट्टीचे दिवस असल्याकारणाने, मंगलकार्यासाठी आता शुभ दिवस गणले जाअू लागले आहेत; पंचांगात त्या दिवशी मुहूर्त नसला तरी चालतो. तथापि लोकांना सोय हवी असते; त्याचप्रमाणे शास्त्र आणि परंपरा ह्यांचा आधारही हवा असतो. ग्रहयोगाची अेरवी अितकी चेष्टा करणारे कित्येक लोकही आपल्या घरातील विवाहासाठी सोयीस्कर शुभ वेळ निवडतात असे आढळते.

लग्नसराअी नसताना अेखादा विवाह अगदी योग्य कारणासाठीही घाअीने अुरकण्यात आला तरी तो चिकित्सेचा आणि कुजबुजीचा विषय बनतो, अशी अजून कित्येक ठिकाणी परिस्थिती आहे. तो प्रेमविवाह असला म्हणजे तर विचारायलाच नको ! बाराही महिन्यात केव्हाही विवाह करण्यास सममाजिक मान्यता मिळाली म्हणजे अपवादांचे प्रमाण अितके वाढेल, की रूढी बदलून तीच 'शास्त्रात् बलीयसी' होअील. लग्नसराअीमधील गैरसोयींमुळे त्याला पोषक वातावरण निर्माण होत आहे. लग्नसराअीत आगगाड्यांतील गर्दी वाढते आणि प्रवास असह्य होतो. बाराही महिने विवाह होअू लागले, तर हा त्रास कमी होअील. कापड-चोपड स्वस्त मिळेल. कार्य अधिक समाधानकारकपणे पार पाडता येतील. विवाह ठरल्यावर प्रत्यक्ष विधीसाठी लग्नसराअीची वाट पाहावी लागणार नाही; त्याचप्रमाणे सोयीचे नसताही घाअीने विवाह अुरकण्याची जरुरी पडणार नाही.

विद्युत्गृहातील जनरेटर्सची जास्तीत जास्त अुत्पादनक्षमता सतत कामास यावी लागते. ह्या विजेच्या मागणीमधील भारी चढअुतार– नियमन करून – नष्ट करावा लागतो. आठवड्याचे सातही दिवस आणि दररोजचे चोवीसही तास मागणी सम राखण्याचा प्रयत्न केला जातो. अुदाहरणार्थ, संध्याकाळनंतर काही तास दिवे जास्त जळतात त्या वेळी विजेची यंत्र चालविण्यावर बंधने घातली जातात. सर्व मोठ्या गिरण्यांनी अेकाच ठराविक दिवशी सुट्टी घेतली नाही म्हणजे त्यांची विजेची मागणी सहाअैवजी सात दिवसांवर विभागली जाते; त्यामुळे अितर मागणी पुरविता येते. शाळेच्या अिमारतीत आता दुपारप्रमाणे सकाळी आणि रात्रीही शाळा भरते; म्हणजे त्या अिमारतीची अुपयुक्तता ३०० टक्के होते. सुट्टीत नाटके आणि विवाहसमारंभ ह्यांना जागा देअून अुत्पन्न मिळविले जाते, तो फायदा वेगळाच.

ह्याच व्यावहारिक दृष्टीने कार्यालयांची अुपयुक्तता वाढविण्यासाठी विवाह-समारंभ वर्षभर होत राहिले पाहिजेत. कोणतेही कार्यालय लग्नसराअीत महाग भाड्याने घेतले जाअून अितर वेळी रिकामे राहण्यापेक्षा वर्षभर तेथे कार्ये होत राहणे श्रेयस्कर होय. कार्य करणाराप्रमाणे कार्यालयाचाही त्यात फायदा आहे.त्यामुळे कार्यालये धुण्यापुसण्यास अवधी मिळून ती अधिक स्वच्छ आणि प्रसन्न बनतील; लग्नसराअीत त्याला अवसरच मिळत नाही; पहिले वऱ्हाड बाहेर पडायच्या आधीच दुसरे वऱ्हाड आत घुसू पाहात असते !

पुराणमतवादी लोकही मुला-मुलींनी आपले विवाह स्वतःच जमविण्यास संमती देअू लागले आहेत. आंतरजातीय विवाहांना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होत आहे. शास्त्रापेक्षा सोयीलाच महत्त्व द्यावे लागत आहे. साहजिकच बाल-विवाहांच्या काळी रूढ असलेले संकेत प्रौढ विवाहांच्या काळी अव्यवहार्य ठरत आहेत. प्रेमविवाह करणारांना तर विवाहाचा समय ठरविण्याची सोय जरूर असायला हवी; विवाहोत्सुकांना लग्नसराअीची दीर्घ काळ वाट बघावी लागणे हिताचे नाही.

विवाह केवळ लग्नसराअीतच नव्हे, तर बाराही महिने व्हावेत, हे पटले तरी त्याला वर्षभर शुभ दिवस हवेत. कुंडलीत सप्तमस्थान हे विवाहाप्रमाणे धंद्यातील भागीदारीचेही स्थान आहे, असे मानतात. धंद्यातील भागीदारी करण्याकरता जर वर्षातील बहुतेक दिवस चालतात, तर विवाहाच्या बाबतीत अितकी अडचण का यावी ? गुरु-शुक्राचा अुदय असणे, पण अमावास्या, गंडयोग, मृत्युयोग वगैरे अनिष्ट योग नसणे– अेवढ्या आवश्यक गोष्टी पाहिल्या तर शुभ दिवस हवे तेवढे मिळतील. होराशास्त्रींनी समाजाच्या अडचणींची जाणीव दाखविली आणि विवाहासाठी प्रत्येक महिन्यातले– चातुर्मासातलेसुद्धा शुभ दिवस प्रसिद्ध केले तर त्याचा फायदा घेण्यास लोक अुजळ माथ्याने पुढे येतील आणि महिन्यातून पंधरावीस दिवस तरी विवाह होअू लागतील. आमचे होराशास्त्री समाजाभिमुख होअून ही समयसूचकता दाखवितील काय ? त्यामुळे त्यांच्या शास्त्राची बूज राखली जाअून लोकांचीही मोठी सोय होअील.

: ६ :

# सब घोडे बारा टक्के नसतात !

मुंबईत लहानाची मोठी झालेल्या आणि आता आर्ट अिन्स्टिटयूटमध्ये शिकत असलेल्या नीलाची 'टीन अेजर'ची तरी जात सांगावी लागत नाही. शोल्डर लेंग्थ कापलेले व कपाळावर झुलपेवजा फ्रिंज असलेले शिस्तवार अस्ताव्यस्त केस, पायात तंग चुडीदार व त्यावर रंगीबेरंगी फुले असलेला सैलसा अेलाअिन क़मीज, झिरमिरीत चुन्नी; कानात प्लास्टिकच्या बांगडीवज़ा अिअर-रिंग्ज, गळयात त्याच रंगाच्या टपोऱ्या मण्यांची लांबलचक माळ, अशा थाटात ती कधी वावरते; तर कधी लालचुटुक स्लॅक्स आणि त्यावर साधाच सफेद लांबट ब्लाअुज किंवा आखूडसा पुरुषी शर्ट, अशा कॅज्युअल पोषाखात दिसते. बीटल्स, नाहीतर व्हेंचर्सची टयून्स सतत गुणगुणते. ट्विस्ट-फ्रग नृत्याचे कोणतेही सेशन ती सहसा चुकवीत नाही.

माझ्या अेका मित्राची ही आधुनिक मुलगी आपल्या वृद्ध आजीची नर्सिंग होममध्ये मनोभावे सेवा करताना मला दिसली,तेव्हा वाटले की तिची दृष्ट काढायला सांगावी. बेशुद्धावस्थेमुळे आजीला नाकावाटे रबरी नळीतून दूध घालावे लागे,अितकी ती अत्यवस्थ होती. नीला आजीच्या शुश्रूषेसाठी अिन्स्टिटयूटमधून परस्पर नर्सिंग होममध्ये दररोज जाअून तिच्या चेहऱ्यावरील मच्छर तासन् तास हाकीत बसायची.

आजीची शक्ती टिकावी ह्यासाठी तिला लिव्हरसूप द्यावे, असे डॉक्टरांनी सुचविले. कोणतीच गोष्ट निषिद्ध न मानणाऱ्या नीलाला त्यात काहीच चमत्कारिक वाटण्याचे कारण नव्हते. पण तिच्या मनात आले, 'आजीला घरात अंडे आणलेलेही खपत नाही. लिव्हरसूप घेण्याला तिने अेरवी कधीच मान्यता दिली नसती; तिला विचारण्याचे धाडसही कुणाला झाले नसते. आता तिला काहीच कळू शकत नाही अशा वेळी लिव्हरसूप पाजणे मनाला पटत नाही. तिच्या भावना निद्रित असल्या तरी मला त्या माहीत आहेत; त्या आपण कशा दुखवाव्या ?'

नीलाने डॉक्टरांना हे सर्व सांगितले, तेव्हा त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. तिच्या सुज्ञ समंजसपणावर त्यांचा अेकदम विश्वासच बसेना.

माधवरावांच्या पत्नी अशाच आजारी झाल्या होत्या; पण त्यांची प्रकृती आता खूपच सुधारली आहे. माधवरावांना मी म्हटले," तुम्ही गेली दोन वर्षे सुमित्राबाओं-च्यासाठी हाडांची काडे करीत आहा. घरातील स्वैपाकासकट सर्व कामे अुरकून नोकरीला जाता. तुमच्या तपश्चर्येचे चीज झाले आहे. हे सर्व कष्ट तुम्हांला खूपच संतोष देत असतील."

त्यावर ते म्हणाले, " खरे म्हणजे मी आमच्या कुमारला सर्व श्रेय देतो. माझा सगळा पगार तिच्या दुखण्यावर खर्च होतो. कुमार पैसे पाठवितो, त्यातून घरखर्च चालतो. तो नाहीतर त्याची बायको प्रत्येक शनिवार–रविवार अिथे येअून मला धीर आणि विश्रांती देतात. मला त्याच्या बायकोचेही कौतुक वाटते. तिने आपली सारी हौस आनंदाने बाजूला सारून हे व्रत स्वीकारले आहे. मंगळसूत्र गळ्यात न घालता पर्समध्ये ठेवणारी नोकरदार तरुणीही ' जेथे राघव तेथे सीता ' ह्याच परंपरेने जाणारी असू शकते. आपल्या अपंग सासूचा हात स्वतःच्या खांद्यावर घेअून तिला सांभाळीत रस्त्याने फिरायला न्यायला तिची फॅशन आड येत नाही."

ही अुदाहरणे अपवादच असे वाटेल. परंतु कुणाचीही खरी पारख प्रसंग आल्या-खेरीज होत नाही. प्रत्येकात काही चांगले गुण वास करीत असतातच; प्रकट व्हायला त्यांना संधी मिळायला हवी असते. तरुण पिढीला सरसकट दोष देणारांच्या लक्षात येत नाही, की सर्वजण अेकसारखे नसतात; व्यक्ती तितक्या प्रकृती असतात. तरुण पिढीला सर्रास नावे ठेवली जातात म्हणून काही त्यातील प्रत्येक व्यक्ती निषे-धाला पात्र होत नाही. काहीतरी कल्पना करून मत बनवून टाकण्याचा मोह बहुतेकांना होतो; कारण त्यामुळे स्वतःचे श्रेष्ठत्व अप्रत्यक्ष रीत्या सिद्ध होत असते !

प्रत्येक पिढीत काही व्यक्ती बेजबाबदार असतातच ; त्यांचे प्रमाण आणि स्वरूप कमीजास्त होत राहणे स्वाभाविक आहे. प्रत्येकाने आपला तारुण्यकाळ आठवावा, म्हणजे अशा समकालीन व्यक्ती त्याच्या नजरेसमोर येतील. स्वतःच्या कुटुंबियांच्या सौजन्याचा गैरफायदा घेणाऱ्या खुशालचेंडूच्याबद्दल कुटुंबियांना लाज वाटायची. त्यांना घराबाहेर हाकूनही दिले जाअी. निदान त्याबद्दल जाहीर चर्चा होत नसे. जो तो आपले दुःख गिळून टाकीत असे. आता तरुणांच्या वर्तनाबद्दल त्यांच्या पालकांना व्यक्तिशः कुणी दोष देत नाही– ती अेक सामाजिक समस्या झाली आहे, अशा भावनेने तिच्याकडे पाहिले जाते. तरुण पिढीच्या वागण्याबद्दल चर्चा चालते, त्यात चिंतेपेक्षा आणि अुपाययोजनेपेक्षा स्वतःच्या करमणुकीचाच भाग अधिक असतो. चघळत बसायला हा विषय सर्वांनाच आवडतो. पण त्यामुळे सत्प्रवृत्त अशा बहुसंख्य तरुणांवर अन्याय होतो. त्यांना स्वतःचे सद्‌गुण दाखविण्याची संधी मिळा-वयाच्या आधीच ते टाकाअू ठरविले जातात. विद्यार्थ्यांच्या समस्येवर अुपाययोजना

सुचविण्यासाठी परिसंवाद आयोजिले जातात. त्यांत वक्तव्ये करणारांपैकी कित्येक भाग्यवंत स्वतःच किती दोषी असतात, हे कोण प्रकट करणार ?

माणसाचा स्वभाव सहजी बदलत नाही; जो बदल होतो तो परिस्थितिजन्य असतो. पूर्वीच्या काळी लहानसहान खरेदीसाठीही पालकांवर अवलंबून राहावे लागत असे. पण त्या काळीही ज्यांना हातखर्चाला पैसे मिळत ते तरुण आणि आज ज्यांना असा पैसा मिळतो ते तरुण ह्यांच्या वृत्तीत मूलग्राही फरक नाही; त्यांच्या खर्चाच्या बाबी वेगळ्या असतील एवढेच. आता स्वतःच्या खिशात पैसे असणाऱ्या नवतरुणांची संख्या वाढत आहे ; आणि प्रत्येकी पैसेही अधिक उपलब्ध होत आहेत. ह्या वाढलेल्या क्रयशक्तीमुळे स्वच्छंदीपणा निर्माण झालेला दिसतो. ते सर्व काही वाया गेलेले नसतात; बदलत्या बहिरंगात ते मिसळून जाण्याचा प्रयत्न करतात. प्रवाहात ते ओढले जातात.

तरुणांचे अंतरंग समजून न घेता, प्रत्येकाच्या गुणावगुणाची पारख न करता, सब घोडे बारा टक्के दोषी ठरवून निर्भर्त्सनेचे शासनही करून टाकले जाते, हे बहुसंख्य तरुणांना बोचणारे शल्य आहे. पंढरीच्या यात्रेतील सर्वजण सारखेच भाविक नसतात. त्यांतले काही तर धडधडीत ढोंगी असतात. पण त्यांच्यावरून सर्वच यात्रेकरूंना सरसकट ढोंगी ठरविणे किती अन्यायाचे होईल? दिंडीमध्ये टिळे-माळा-मुद्रा असणारे काही बकध्यानी असतात, म्हणून बाकीचेही सर्वजण चोर ठरत नाहीत!

काही व्यक्तींच्यावरून सबंध व्यक्तिसमुदायासंबंधी मत बनविणे चुकीचे आहे. त्याचप्रमाणे, व्यक्तिसमुदायासंबंधी प्रसृत असलेल्या मतांवरून त्यांतील व्यक्तींच्याविषयी ग्रह करून घेणे चुकीचे आहे. नीला आणि कुमार ह्यांच्यासारखे जे आढळतील, त्यांचे कौतुक करा, त्यांना प्रोत्साहन मिळू द्या. त्यांच्या बहिरंगावरून त्यांच्या अंतरंगाची कल्पना करून टाकू नका. तरुणांना गैरसमज दूर करण्यास संधी तरी मिळू द्या. तरुण पिढीबद्दल आस्था वाटत असेल, तर अनुचित टीकेपेक्षा प्रसंगोचित प्रशंसेनेच ती व्यक्त करा. त्यातच सर्वांचे हित आहे.

: २९ :

# शिकवी नातू आजोबाला

अिस्तंबुल (टर्की) येथील नगरपालिकेच्या म्युझियममध्ये प्रेसी पेपिरस ह्या नावाचा ६,००० वर्षांपूर्वीचा अेक लेख ठेवलेला आहे. अितके जुने लिखाण सबंध जगात अितर कुठेही अुपलब्ध नाही. त्या लिखाणाचे पहिलेच वाक्य आहे, "काय करावे, मुले आअी-बापांचे अैकेनाशी झाली आहेत." पुढची पिढी मागच्या पिढीचे अैकत नाही, त्याचा हा जुन्यात जुना पुरावा आहे. नव्या पिढीविरुद्ध जुन्यांची तक्रार ही काही नवीन घटना नाही. पुढच्या पिढीने न अैकणे, त्याबद्दल जुन्या पिढीने त्रागा करणे, नवी पिढी जुनी झाली की तिनेही तशीच तक्रार करायला लागणे हा क्रम अव्याहत चालू आहे.

ज्यांनी जास्त पावसाळे पाहिले आहेत, अशांना जगरहाटीचा अनुभव जास्त असतो हे अुघड आहे. त्यांच्या त्या ज्ञानाला अवश्यमेव मान द्यायला हवा. वृद्धांची सेवा का करावी, ह्याविषयी कौटिल्याची सूत्रे अतिशय अुद्बोधक आहेत. तो म्हणतो, "विनयस्य मूलं वृद्धोपसेवा। वृद्धसेवाया विज्ञानम्।!" (शिक्षणाचे मूळ वृद्धांची सेवा. वृद्धांच्या सेवेपासून अनुभवजन्य ज्ञान मिळते.) जे ज्ञान अनुभवावर अवलंबून आहे, ते अनुभवी माणसापासूनच मिळविले पाहिजे. परंतु ज्याचा स्वतःला अनुभव नाही अशा बाबतीतही मागच्या पिढीतले लोक आग्रह धरू लागले. नव्या पिढीचा अनुभव वेगळा असला म्हणजे संघर्ष अटळ असतो. पूर्वजांच्या अनुभवावर आधारलेले ज्ञान कितीही मोलाचे असले तरी ज्ञानात आता अितक्या गतीने भर पडत आहे की कालचा ज्ञानवंत आज अडाणी ठरण्याची पाळी येत आहे!

चंद्राचे ग्रहण सुटावे म्हणून अुपास, प्रार्थना आणि दानधर्म करायला सांगणारांची आता चेष्टाच होते. काही विषयांच्या बाबतीत प्राध्यापकांपेक्षा हुषार

विद्यार्थी अधिक माहितगार असणे शक्य असते. अेखाद्या आधुनिक सिनेमा थिअेटरच्या रचनेचे काम जुन्या अेंजिनिअरकडे आले तर बांधणीमधील आर. सी. सी. चे गणित आणि अेअरकंडिशनिंग ह्यासाठी त्याला नवीन तज्ज्ञांचीच मदत घेणे जरूर पडते. वैद्यक शास्त्रातील नवे शोध, अुपकरणे आणि चिकित्सा ह्यांचा बिनचूक वापर करणे अेखाद्या जुन्या धन्वंतऱ्यापेक्षा ते ज्ञान मुद्दाम संपादन करून आलेल्या त्याच्या मुलाला किंवा नातवालाच साधेल. कित्येक नामवंत डॉक्टर व सर्जन आपले ज्ञान व पद्धती अद्ययावत राखण्यासाठी वरचेवर अिंग्लंड-अमेरिकेला जाअून येतात ते काही अुगीच नाही !

औद्योगिक, आर्थिक व सामाजिक परिवर्तनामुळे नव्या परिस्थितीत नवे संकेत निर्माण होतात. आपल्या गरजा कमीत कमी राखणे, सुखसोयींना गर्ह्य मानणे, दारिद्र्याचा अभिमान बाळगून अैपत वाढल्यावरही सवयींना मुरड न घालणे अशा जमान्यात वाढलेली पिढी शास्त्रीय प्रगतीमुळे प्राप्त होणाऱ्या सुखसोयींना नावे ठेवते. घरात वीज घेतली तरी कमी अुजेडाचे दिवे लावले जातात आणि विजेचे अेकही अुपकरण घेतले जात नाही. पंखा विकत घेतला तरी तो चालू करणे जिवावर येते. ‘ठेविले अनंते, तैसेचि राहावे’ हे नव्या पिढीला पटत नाही. तिला कष्टाचे महत्त्व वाटते ते सुखप्राप्तीसाठी, अितर कष्ट कमी करण्यासाठी. येनकेन प्रकारेण अुत्पन्न वाढवून राहणी सुधारण्याची तिची अीर्ष्या असते. जुन्या पिढीला ते साहजिकच पसंत पडत नाही. अशा परिस्थितीत, अेखादा तरुण आपल्या वडिलांचे सर्वस्वी अैकू लागला तर त्याला स्वतःच्या सामाजिक वर्तुळातून बाहेरच पडावे लागेल, आणि कदाचित आपल्या पत्नीचीही नाराजी सहन करावी लागेल; कौटुंबिक स्वास्थ्यावरही त्याचा परिणाम होअील. मनुष्यस्वभाव बदलला नाही तरी नीतीच्या कल्पना बदलत आहेत; पाप आणि पुण्य हे शब्दच नव्या पिढीला माहीत नाहीत. स्त्रियांचा कौटुंबिक व सामाजिक दर्जा का व कसा बदलला आहे, हे मागच्या पिढीला समजणेही अशक्य आहे. माणसाच्या वयावरून त्याची पिढी ठरविली जाते. पण नवेपण संपून जुनेपण सुरू होण्याची वेळ सेवानिवृत्तीच्या वयाप्रमाणे ठराविक नसते. काही तरुणांचे विचार पुराणकालाला साजेसे असतात. तर काही वृद्ध आपल्या आधुनिकतेने तरुणांनाही लाजवतात. सर्वसाधारणपणे काय आढळते, ते आपण येथे पाहात आहोत.

वृद्धाचा अनुभव हा ज्ञानप्राप्तीचा अेकमेव मार्ग नाही. अनेक मार्गांपैकी तो अेक आहे आणि त्याचे महत्त्व तुलनात्मक दृष्टीने घटत चालले आहे. पुस्तके छापली जाअू लागल्यापासून आणि शास्त्रीय प्रगती व औद्योगिक क्रांती ह्यांची युती झाल्यापासून ज्ञानप्राप्तीची साधने द्रुत गतीने वाढत आहेत; गुरुजनांचे महत्त्व वाटेनासे झाले आहे. सबंध जगभर मान्यता पावलेल्या ‘दि अेन्सायक्लोपीडिआ ब्रिटॅनिकाची’ च गोष्ट पाहा. ह्या २४ खंडांच्या ग्रंथाच्या १९६३ च्या आवृत्तीमधील ३,६०,६२,४३३ शब्दांपैकी १,०३,१६,४०३ शब्द नवीन आहेत आणि १७,००० लेखांत दुरुस्तीं व सुधारणा करावी लागली आहे. अशा परिस्थितीत ‘बाबावाक्यं प्रमाणम्’ न मानता

ताजे ज्ञान आत्मसात करून नवीन करू पाहणारे कर्तृत्ववान ठरतात. नवी पिढी जुन्या चाकोरीतून जाण्यातच समाधान मानू लागली म्हणजे प्रगती खुंटलीच म्हणून समजावे. मग ते व्यापाराचे क्षेत्र असो, कारखानदारीचे असो वा वैयक्ति राहणीचे असो. संशोधकसुद्धा जुने झाले म्हणजे आपली चाकोरी सोडण्यास तयार नसतात. नव्या संशोधकांना वाव दिला तर तो अधिक फलदायी ठरतो असा अनुभव आल्यामुळे रशियाने आता जुन्यांना बाजूला सारून तरुणांना संशोधनशाळांचे नेतृत्व देण्यास प्रारंभ केला आहे. जेथे शास्त्राचा आधार नसेल तेथे मात्र परंपरा सोडण्याचे कारण नाही.

मुले आईबापांचे अैकेनाशी झाली आहेत, ते कोणत्या बाबतीत— हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. जो अनुभव मागच्या पिढीला आहे आणि चालू पिढीला नाही, त्याच्या बाबतीत जुन्यांच्या सांगण्याकडे दुर्लक्ष करणे, त्यांची हेटाळणी करणे चुकीचे ठरेल. पण सर्वच बाबतींत त्यांचे अैकायचे ठरविले तर प्रगती मुळीच होणार नाही. काही बाबतीत त्यांचे न अैकणे हेच समाजाच्या आणि देशाच्या व्यापक हिताचे असते. वृद्धांच्या परवानगीची आणि संमतीची वाट पाहात बसणे कित्येकदा चुकीचे ठरते. वाढत्या वाहतुकीस अडथळा करीत असलेली पूजास्थाने हलविण्याचे धैर्य ज्यांनी प्रथम दाखविले त्यांनी केवढे तरी सामाजिक हित केले. धार्मिक भावना दुखविल्या जातात ह्याचे महत्त्व जाणूनही व्यापक सामजिक हिताकडे त्यांनी पाहिले. अर्थात प्रत्येक पिढीने आणि तिच्यातील प्रत्येक घटकाने अैकण्याच्या व न अैकण्याच्या बाबी विवेकपूर्वक तपासायला हव्यात. त्या बाबतीत तारतम्याची अतिशय आवश्यकता असते.

केवळ जुने म्हणून अनादर दाखविणे म्हणजे आधुनिक होणे नव्हे. नव्या पिढीला प्रयोग करून पाहण्याची संधी मिळाली म्हणजे त्यातून नवे अनुभव निर्माण होतात; आणि जुन्या अनुभवांत नव्यांची भर पडते. ह्या दृष्टीने वृद्धांनी तरुणांच्या अुपक्रमां-कडे पाहणे जरुरीचे आहे. "हा काळ अुलट आला, शिकवी नातू आजोबाला" असे मेळ्यांतील अेका अुपहासात्मक गाण्याचे पालुपद होते. वास्तविक ज्यांच्याकडून शिकायला मिळेल असे नातू लाभणे आजोबांना भूषणावहच वाटेल. ज्ञानाची साधने वाढली, ज्ञान वाढले, तरी माणूस न सुधारता तो हिणकस होत चालला अशी जुन्यांची तक्रार असते. श्रद्धा, पापभीरूपणा, शिस्त, संयमाचे वर्तन अित्यादींचा अभाव त्यांना जाणवतो. नव्या पिढीने ह्याची दखल घेतली तर दोन पिढ्यांतील अंतर कमी होअील. जुन्या-नव्यांची, दोघांचीही पातळी वाढेल आणि समाजाची अुन्नती त्वरेने होत जाअील. जुने आणि नवे ह्यांच्यातील बरेवाअीट ठरविताना पूर्वग्रहदूषित दृष्टी अुपयोगाची नाही. "सन्तः परीक्ष्यान्यतरत् भजन्ते" असे कालिदासाने बऱ्याच वर्षांपूर्वीच लिहून ठेवले आहे.

: ३० :

# परीक्षांचा फास आणि काळाची पावले

दर वर्षी अेकदा परीक्षांचा हंगाम सुरू होतो आणि अेकामागूनअेक परीक्षा होत जातात. त्यापाठोपाठ परीक्षांचे निकाल जाहीर व्हायला लागतात. विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे हेच ते दिवस! अेखादा अरुण पेपर चांगले गेले नाहीत म्हणून अर्ध्या परीक्षेतून अुठून येतो आणि गळफास लावून घेतो, तर अेखादा अरविंद निकालाच्या दिवसापर्यंत कसाबसा जीव धरून राहतो; पण तो दिवस अुजाडायच्या आधल्या रात्री निकालाच्या धास्तीने विहिरीत अुडी टाकतो. वास्तविक तो यशस्वी झालेलाही असू शकतो. परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यावर त्याचा धक्का सहन न होअून अेखादा विजय चालत्या आगगाडीपुढे आडवा पडतो, तर अेखादा चंदू तोंड चुकविण्यासाठी बेपत्ता होतो, तो कायमचाच! प्रत्यक्ष आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कित्येक सहस्रपट विद्यार्थ्यांची तीव्र निराशा होत असली पाहिजे. आत्महत्यांना वृत्तपत्रांतून प्रसिद्धी मिळते आणि त्यावर साहजिकच चर्चा होते.

"हल्लीच्या तरुणांत सहनशक्तीच अुरलेली नाही. अेखाद्याच अपयशानं ते गर्भगळित होतात आणि भ्याडासारखे आत्महत्या करतात. शरीर आणि मन किती कणखर असायला हवं! अेखाद्या नकटचा पोरीनं लग्नाला नकार दिला तरी त्यांना जगणं अशक्य वाटतं. आमच्या काळात असं नव्हतं. काय करावं ह्या तरुण पिढीला!" असे अुद्गार जुन्या पिढीतील लोकांकडून अैकायला मिळतात.

वस्तुस्थिती काय आहे? पूर्वी मॅट्रिकही न होणारांना नोकरी मिळत असे; मॅट्रिक पास झाल्यावर तर मोठी नोकरी लागायची. पदवीधरांची गोष्ट तर विचारायलाच नको. अनेक वेळा नापास झालेले विद्यार्थीही अशा रीतीने आयुष्यात 'यशस्वी' ठरत. आपला मुलगा कॉलेजात गेला, पास झाला, अेवढ्यावर तेव्हा वडील खूष

असत. आता नुसते पास होण्याला काहीही किंमत अुरलेली नाही. जीवनस्पर्धा अतिशय तीव्र झाली आहे. अेस्. अेस्. सी. ची परीक्षा अुत्तीर्ण होणारालाही कॉलेजात प्रवेश मिळणे कठीण झाले आहे. "किती टक्के मार्क मिळाले?" हा प्रश्न आता महत्त्वाचा ठरतो. अेफ्. वाय्. बी. अेस्सी. ( अिंटर सायन्स ) च्या परीक्षेत पहिला वर्ग मिळाल्याविना अेंजिनिअरिंग किंवा मेडिकल कॉलेजात शिरकावच होअू शकत नाही. पास होअून पुरत नाही; पहिल्या ठराविक अनुक्रमात यावे लागते. थर्ड क्लास विद्यार्थ्यांनाही पूर्वी नोकऱ्या मिळत; पदवी-परीक्षेचीही त्यांना आवश्यकता नसे. आता फर्स्ट क्लास मार्क मिळाल्याखेरीज कॉलेजातही प्रवेश नाही, अशी स्थिती आहे.

"तुला चांगली नोकरी हवी असेल, चांगली बायको मिळायला हवी असेल, तर तुला अेंजिनिअर किंवा डॉक्टर व्हायला हवं. नुसता पास झालास तर तुला कारकून म्हणूनसुद्धा कुणी नेमणार नाही." असे तरुणांना आता घरोघर बजावले जाते. आपण चांगल्या रीतीने अुत्तीर्ण झालो नाही तर आपल्याला आयुष्यभर त्याचे परिणाम भोगावे लागतील, हे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबलेले असते. साहजिकच परीक्षेत अपेक्षेप्रमाणे यश मिळाले नाही किंवा मिळणार नाही असे वाटले तर ते अेकदम नाअुमेद होतात. त्यांच्या डोळ्यांपुढे काजवे चमकायला लागतात.

व्यावसायिक कॉलेजांत प्रवेश मिळायला आवश्यक तेवढे गुण न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना बी. अे., बी. अेस्सी., बी. कॉम्., अेल्अेल्. बी. अित्यादींकडे वळणे भाग पडते. आपले काही वर्गमित्र आता मोठे होणार आणि आपण मात्र काहीतरी शिकले पाहिजे म्हणून केवळ कॉलेजात जात राहणार ह्या जाणिवेने त्यांना मनस्वी नैराश्य प्राप्त होते. हल्लीच्या स्पर्धामय जीवनाचा चटका अितक्या लहान वयात त्यांना कसा करपून टाकतो ह्याची कल्पना तरी मागच्या पिढीला आहे का ?

सुशिक्षित मुलींची संख्या आता झपाट्याने वाढत आहे. प्रत्येक मुलीला स्वतः-पेक्षा जास्त शिकलेला पती हवा असतो. बी. अे. ( ऑनर्स ) मुलीला साधा बी. अेस्सी. चालत नाही. विवाहाच्या बाजारात बी. अी. आणि अेम्. बी. बी. अेस्. झालेल्या तरुणांना विशेष भाव असतो. पण फर्स्ट क्लास विद्यार्थीच त्या पदव्या मिळवू शकतात. साहजिकच, केवळ पास होअू शकणाऱ्या तरुणांना कल्पनेप्रमाणे वधू मिळू शकत नाही. अेम्. अे. पास झालेल्या अमुक्या तरुणाला बी. अे. मध्ये पहिला वर्ग मिळविलेली तरुणी आपल्यापेक्षा कमी लेखते. म्हणजे पहिला वर्ग मिळाला नाही की चांगली नोकरी नाही, वधूही नाही ह्या भीतीने तरुण पार हिरमुसले होअून जातात.

ह्या सर्व दुष्परिणामांची काही अंशी तरी जबाबदारी जुन्या पिढीला टाळता येण्याजोगी नाही. आपल्या मुलामध्ये परीक्षेत यशस्वी होण्याची, पहिला वर्ग मिळविण्याची अीर्ष्या जरूर अुत्पन्न केली पाहिजे. पण तसे घडले नाही तर त्यामुळे मुलाची काय मनःस्थिती होअील ह्याचाही नीट विचार केलेला असायला हवा. "तरुणांना आता कितीतरी नवी क्षेत्रे अुपलब्ध आहेत. अेखाद्या परीक्षेतल्या नंबरावर सर्वस्वी अवलंबून राहण्याचे कारण नाही. अन्य मार्गानेही पुढे येण्याला भरपूर वाव आहे.

नोकरी मिळाली नाही तरी व्यवसाय, व्यापार, कारखानदारी ह्यात कुठेही प्रवेश मिळू शकतो; त्यात अुत्कर्षाच्या आड कुणीही येअू शकत नाही." अशा तऱ्हेचे विचार आपल्या मुलात योग्य वेळीच रुजवले तर कितीतरी तरुणांचे आत्मघात टळू शकतील !

परीक्षेचा निकाल लागल्यानंतर मुलावर तोंडसुख घ्यावयाचे, ह्यात काय अर्थ आहे ? त्यापेक्षा, आधीपासूनच त्याच्या मनाची तयारी करून ठेवली म्हणजे निकालाचा धक्का त्याला सोसता येअील आणि त्याच्यातील अुत्साह टिकून राहील. प्रत्यक्ष अुदाहरणे दाखवून पण अप्रत्यक्ष रीतीने हे सर्व केले पाहिजे. अुपदेशाचा वास त्याला येता कामा नये. वडील आणि मुलगा ह्यांचे नाते अेकमेकांशी मोकळेपणाने बोलण्याचे पहिल्यापासून असले म्हणजे त्यात काहीही अवघड नाही.

माझ्या माहितीचे अेक सुशिक्षित अेंजिनिअर आहेत. त्यांचा मुलगा अेफ्. वाय्. बी. अेस्सी. मध्ये आहे. त्या परीक्षेत त्याला चांगले गुण मिळण्यावर त्याला अेंजिनिअरिंग कॉलेजात प्रवेश मिळणे अवलंबून आहे. तो अेंजिनिअर झाला तरच त्यांची फर्म पुढे चालवायला तो अुपयोगी पडणार आहे. अितके असूनसुद्धा त्यांनी आपल्या मुलाच्या मनावर दडपण येअू न देण्याची समजूतदारपणे आणि कौशल्याने दक्षता घेतली आहे. स्वतःचे मोठे अिस्पितळ असणाऱ्या अेका लेडी डॉक्टरना अेकुलती अेक मुलगी आहे. ती डॉक्टर झाली, तर तिला आपोआपच मोठी प्रॅक्टिस मिळणार आहे. पण आपल्या मुलीवर तो अभ्यासक्रम लादण्याचा त्यांचा विचार नाही. मात्र तिला तसे कळूही न देता, तिच्यात डॉक्टरी व्यवसायाची आवड निर्माण करण्यात त्यांनी यश मिळविले आहे. तरीसुद्धा, " तिच्या विकासाच्या आड येणारा आग्रह मी धरणार नाही ! " असेच त्या म्हणतात. अशा अुदाहरणांचे अनुकरण व्हायला हवे.

काळाची पावले आपण वेळीच ओळखली पाहिजेत. परीक्षेत वर नंबर आला म्हणजे चांगली नोकरी मिळायची आणि आपोआप बढती होत जायची असे स्वास्थ्याचे दिवस आता ह्यापुढे अुरणार नाहीत. लायकी टिकून राहण्याला महत्त्व प्राप्त होणार आहे. परीक्षेत यशस्वी झालेल्यांना मोठी नोकरी मिळाली तरी ती टिकणे प्रत्यक्ष कामावर अवलंबून राहणार आहे. कारकून कर्तृत्ववान असेल तर बँकेचा चेअरमनही होअू शकेल. फोरमन कारखान्याचा प्रमुख बनू शकेल. प्रोफेसराअितका पगार मेकॅनिकलाही मिळायला लागेल. अशा परिस्थितीत शिक्षणक्रमाची निवड करताना रूढ कल्पना बाजूस सारण्याची तयारी हवी. प्रगतीची अेखादी वाट बंद झाली, तर दुसऱ्या वाटेने जाण्याची तत्परता बाळगायला हवी. आर्थिक आणि औद्योगिक विकासाबरोबर अुत्कर्षाचे मार्गही वाढत आहेत. जुन्या पिढीतील बहुतेकांना त्याची कल्पना नसते. ते नव्या वाटा दाखवू शकत नसले, तरी निदान त्यांनी नव्या वाटांनी जाअू पाहणाऱ्या तरुणांच्या आड तरी येअू नये. कालच्या आणि आजच्या परिस्थितीपेक्षा अुद्याची परिस्थिती फार वेगळी होणार आहे, आणि आजच्या तरुणांना अुद्याच्या परिस्थितीतच आयुष्य काढावयाचे आहे.

: ३१ :

# नियमभंगाचे बाळकडू पाजू नका !

अेका शाळेतील मुलांची सहल अेका तलावावर नेण्यात आली होती. त्यांच्याबरोबर काही शिक्षक व शिक्षिका होत्या. तलावातील पाणी पिण्यासाठी साठविलेले होते. शेजारीच वॉटर वर्क्स होते. तलावाजवळ अेक पाटी लावलेली होती, "ह्या तलावाचे पाणी केवळ पिण्यासाठी आहे. तलावात प्रवेश करण्याची सक्त मनाअी आहे." ती पाटी मोठ्यांदा वाचून व तिच्याकडे दुर्लक्ष करून अेका शिक्षकाने मुलींना गुडघाभर पाण्यात अुभे केले व त्यांचे फोटो काढले. त्यांपैकी अेका मुलीने ही हकीकत घरी गेल्यावर आपल्या वडिलांना सांगितली. पिण्याच्या पाण्याच्या तलावात मुलींना अुभे करणे त्यांना आवडले नाही व त्यांनी मुख्याध्यापिकेकडे ह्या गैरशिस्तीबद्दल तक्रार केली. मुख्याध्यापिका आपल्या तक्रारीची दखल घेअून बेशिस्त शिक्षकाची कानअुघाडणी करतील अशी त्यांची अपेक्षा; पण "दोन मिनिटं पाण्यात अुभं राहिल्यामुळे तुमच्या मुलीला सर्दी तर नाही ना झाली ? मग का तक्रार ?" असा अुलट प्रश्न त्यांना विचारण्यात आला, तेव्हा ते स्वत: खरोखरच सर्द झाले !

शाळा-कॉलेजांतून नोटिसा काढण्यात येतात, "अमुक तारखेच्या आत अमुक केले नाही, तर अमुक शिक्षा होअील, फॉर्म दिला जाणार नाही." अित्यादी अित्यादी. पण त्या नोटिशीप्रमाणे कृती कधीच केली जात नाही. भित्री मुले त्या नोटिशीप्रमाणे वागतात, बाकीची वागत नाहीत. पण त्यांचे त्यामुळे काहीच नुकसान होत नाही. नोटिशी निरर्थक असतात, असा समज प्रसृत होतो आणि तो काही गैर नसतो. चालक आपल्याला काहीही करणार नाहीत अशा खात्रीमुळे विद्यार्थी नोटिसांकडे लक्ष न देण्यास प्रवृत्त होतात.

अेका शिक्षणसंस्थेतील ग्रंथालयात प्रवेश करतेवेळी प्रत्येकाला ओळखपत्र दाखवावे लागते. अेखाद्या विद्यार्थ्याने ते आणले नाही, तर ग्रंथपाल त्याला प्रवेश नाका-

रीत नाही. पण ह्या सवलतीचा दुरुपयोग करून काही विद्यार्थी ओळखपत्र न आणता प्रवेश मिळविण्याची प्रथाच पाडू लागतात. अखेर ग्रंथपालासच स्वतःच्या लाचारीचा राग येऊन तो त्या विद्यार्थ्याला प्रवेश नाकारण्याचे धैर्य दाखवितो, पण दोनच मिनिटात तो विद्यार्थी प्रिन्सिपलची लेखी परवानगी आणून विजयी मुद्रेने ग्रंथालयात प्रवेश करतो. आणि पुढे मुद्दामच प्रवेशपत्रिका न आणता ग्रंथपालास हिणवीत ग्रंथालयात दररोज जात राहतो. प्रिन्सिपलसाहेब स्वतःची लोकप्रियता टिकविण्यासाठी ग्रंथपालाची शिस्तप्रियता बळी देतात. नियमभंगाकडे दुर्लक्ष करणे त्यांना सोयीचे वाटते. पण त्यामुळे तरुण पिढीच्या बेशिस्तीला अुत्तेजनच मिळते. परीक्षेत कॉपी करताना कुणी विद्यार्थी पर्यवेक्षकाला दिसला, तर तिकडे न फिरकण्याच्या युक्तीने कटुता टाळली जाते; कॉपी करताना कुणाला पकडण्यात आले, तर पकडणारालाच जाब विचारण्यात येतो!

फीमध्ये सवलत मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविले जातात. अशा अर्जावर विद्यार्थीच पालकांची सही करतात. फीमध्ये सवलत मिळालेली पालकांना कळवीत नाहीत; आणि त्या पैशाचा विनियोग सिनेमा, होटेलसारख्या चैनीकडे करतात. फीमधील सवलतीमुळे पालकांवरील आर्थिक ताण मुळीच कमी न होता, विद्यार्थ्यांना मात्र बिनहिशेबी खर्च करायला संधी सापडते. त्याची मग त्यांना चटकही लागते. संस्थेच्या चालकांना हे सर्व माहीत असूनही ते तिकडे कानाडोळा करतात. पालकांच्या सहीच्या ठिकाणी सही आहे ना, अेवढेच ते पाहतात. अधिक चौकशी करून स्वतःचे काम वाढविण्यापेक्षा मुळीच चौकशी न करणे त्यांना सोयीचे वाटते. पण तरुण पिढी बिघडण्याला त्यामुळे प्रोत्साहन मिळते, त्याचे काय?

"मोटारी, सायकली अित्यादी पोर्चमध्ये ठवण्यास सक्त मनाअी आहे." अेका मध्यवर्ती पोस्ट ऑफिसच्या पोर्चवर तांबड्या अक्षरांची मोठी थोरली पाटी आहे. पण प्रत्यक्षात काय आढळते?– पोर्चमध्ये अुभ्या केलेल्या वाहनांमुळे त्यातून मार्ग काढणे अशक्य होअून जाते. पोर्चचा तबेला झालेला असतो. ही अगदी मामुली बाब आहे. केलेले नियम पाळण्याकडे दुर्लक्ष करणे हे अितके नित्याचे झाले आहे, की, त्याबद्दल खेद-खंत कुणाला वाटत नाही. नियम करताना मात्र ते कडक करायचे; पण त्यांच्या अंमलबजावणीच्या बाबतीत मात्र अतिशय ढिलेपणा करायचा. असेच सर्वत्र आढळते. त्यामुळे नियम न पाळणाऱ्यांची— पळवाट काढणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे, नियमभंगाचे बाळकडू लहानपणापासूनच मिळत आहे. नियम पाळणाराचे नुकसान होणे, त्याच्या पदरी अवहेलना येणे, त्याला कष्ट आणि दारिद्र्य भोगावे लागणे आणि नियम मोडणारांचा अुत्कर्ष होअून त्यांना मानमान्यता मिळणे ही प्रवृत्ती आपल्या देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत घातुक आहे. आणि दारूबंदीचा कायदा, हुंडाबंदीचा कायदा, आता प्रत्यही धाब्यावर बसविले जात आहेत, त्याची चर्चा वृत्तपत्रांतून दररोज चालू आहे. याचा परिणाम तरुण मनावर हितकारक होत नाही.

बालपणी आणि तरुणपणी शिस्त लागली तर ती अंगी बाणते आणि ती स्वाभाविक होऊन जाते.परंतु शिस्तीचा अभावच सर्वत्र दिसू लागला आणि चलतीचाच तो राजमार्ग झाला तर शिस्तीला काय किंमत राहणार ? ह्यासाठी शाळा-कॉलेजांतून नियमांच्या पालनाकडे विशेष लक्ष पुरविण्यात आले पाहिजे, चालकांनी ते आपले आद्य कर्तव्य मानले पाहिजे. पालकांनी चालकांना पाठिंबा दिला पाहिजे. “ विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून आम्ही सहानुभूतीने वागतो.” असा युक्तिवाद कित्येक चालकांनी केलेला ऐकू येतो. त्यात काही तथ्य असेलही, पण बहुसंख्य विद्यार्थ्यांवर त्याचा अगदी विपरीत परिणाम होतो. जी गोष्ट अमलात आणता येईल, तेवढीच सक्तीची करणे आणि मग मात्र सवलती न देणे, हे सहज शक्य आहे. त्यामुळे नियमां-बद्दल आदर टिकून राहील. युनिफॉर्मची सक्ती करावयाची, ७५ टक्के विद्यार्थी युनिफॉर्म घालतात म्हणून समाधान मानावयाचे आणि अेन्. सी.सी.च्या कँपला जाताना मात्र सर्वांकडून युनिफार्मची अपेक्षा करावयाची हे पटत नाही ! ही अपेक्षा फोल ठरल्यावर विद्यार्थ्यांना दोष देण्याला पुन्हा चालक तयारच !

विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीला चालकही जबाबदार असतात, हे कटु सत्य आहे. स्वतःच्या बचावासाठी आणि सवंग लोकप्रियतेसाठी शिक्षणसंस्थांचे चालक नव्या पिढीला बळी देत आहेत. वसतिगृहातील विद्यार्थ्यांवर त्यांची विशेष देखरेख असायला हवी. पण ती कुठेच आढळून येत नाही. शिक्षकवर्ग अध्यापनात गर्क असता तर गोष्ट वेगळी. पण आपले काम सोपे करण्यासाठी बेशिस्तीकडे कानाडोळा करणारांपैकी फारच थोड्यांना ही सबब सांगता येईल. अगदी क्षुल्लक गोष्टींतही जागरूक राहण्याची आवश्यकता आहे, हे शिक्षणसंस्थांच्या चालकांना पटले तरच नव्या पिढीची योग्य अशी घडण होईल.अभ्यासक्रमात सांगितलेले धडे न संपवता पगार घेणे काय, आणि काम टाळून मजुरी चोपून घेणे काय, सारखेच! त्याचा विद्यार्थि-मनावर अनिष्ट परिणाम झाल्याविना राहात नाही. विद्यार्थ्यांना नाखूष न करता जेवढे करता येईल तेवढेच करावयाचे आणि शक्य तितक्या विद्यार्थ्यांना वरच्या वर्गात घालून वर्षअखेर गाठावयाची, असेच कित्येक ठिकाणी आढळून येते. समाजाच्या खऱ्याखुऱ्या हिताकडे लक्ष द्यावयाचे म्हणजे कष्ट घेऊनही अप्रीती पत्करावी लागते. असे लोक अव्यवहारी ठरतात. जबाबदारीच्या जागांवरील लोकही त्यामुळे स्वहितापलीकडे बघेनासे होतात. शिक्षकवर्ग त्यापासून किती अलिप्त राहू शकणार ? त्याला वरून कितीसा पाठिंबा मिळणार ? अशा रीतीने विद्यार्थी बेशिस्त होण्यास प्रोत्साहन मिळत असून नव्या पिढीला अनिष्ट वळण लागत आहे. आपल्या डोळ्यांदेखत हजारो तरुण बिघडत आहेत,हा विचार किती शिक्षकांच्या मनात येत असेल,कुणास ठाऊक! पालकच शाळेत येऊन शिक्षकांचे योग्य निर्णयही दमदाटीने किंवा वाममार्गाने फिरवून घेऊ लागल्यावर सत्प्रवृत्त गुरुजी मनस्तापाने अक्षरशः करपून जातात !!

— समाप्त —

REFBK-0017291



# श्री. वा. काळे

श्रीयुत श्रीपाद वामन काळे हे १९३५ पासून 'अर्थ' या पाक्षिकाचे संचालन व संपादन करीत आहेत. पण अर्थव्यवहार हा अेकच त्यांच्या आवडीचा विषय नाही. अनेक सामाजिक व्यवहारांतील व्यक्तीव्यक्तींचे संबंध परस्परांना अधिकाधिक आनंददायक कसे होतील आणि अेकेका व्यक्तीला आपापले दैनंदिन जीवन अधिक सुखसमृद्ध कसे करता येअील हा त्यांच्या चिंतनाचा आणि नित्याच्या लेखनाचा विषय आहे.

ते स्वतः क्रिकेट, टेनिस अित्यादी खेळांचे जाणते भोक्ते खेळाडू असल्याने अेकंदर जीवनच खिलाडूपणे कसे जगावे हे ते अुत्तम जाणतात, आणि आधुनिक जीवनाची घडी आपण कशी कौशल्याने बसवावी हे ते अेखाद्या समजूतदार सन्मित्राच्या सराअीतपणे सांगू शकतात.

आधुनिक जीवनातील शास्त्रीय प्रगतीमुळे आपल्या व्यक्तिगत दैनंदिन जीवनक्रमाला देखील अेक प्रकारची गती आलेली आहे. पूर्वीचा आपला संथ जीवनप्रवाह आता वेगाने धावू लागला आहे. या वेगवान जीवनक्रमात व्यक्तीव्यक्तींचे परस्पर संबंधही अधिक गुंतागुंतीचे होणे अपरिहार्य आहे.

या परस्पर संबंधांमध्ये गोडी कशी राखावी, कोणताही प्राप्त व्यवहार चातुर्याने कसा साधावा, आणि हे करीत असताना सभोवतालचे वातावरण प्रसन्न करण्यास आपण प्रत्येकाने कसा हातभार लावावा ही गोष्ट श्रीयुत श्री. वा. काळे यांच्याकडून शिकण्याजोगी आहे.

ही गोष्ट ते हसतखेळत आपल्या छोटेखानी स्फुट लेखांमधून अनेक अुदाहरणांनिशी किर्लोस्कर मासिकाद्वारे वेळोवेळी सांगत आले आहेत.

'कौटुंबिक हितगुज' ह्या त्यांच्या यापूर्वीच्या स्फुट लेखसंग्रहाप्रमाणेच प्रस्तुतचा 'नवी घडी– नवे जीवन' हा संग्रहही सहज जाता जाता असे खूप काहीसे सांगेल, की जे वाचकांना अगदी हवेहवेसे वाटेल !